'माझ्या गोष्टी' : गोष्ट पहिली

# चित्रकार रंगा

साने गुरुजी

संपादक

यशवन्त हडप, एम्. ए., डी. एड्.

प्रिन्सिपॉल, ट्रेनिंग कॉलेज, मौनी विद्यापीठ, गारगोटी, जि. कोल्हापूर.

आदर्श वाङ्मय प्रकाशन

मुंबई नं. १८.

संक्षिप्त छात्रावृत्ति : सन १९५६

किंमत सव्वा रुपया

•

या छात्रावृत्तीचे एकमेव विक्रेते
**चित्रशाळा प्रकाशन विभाग,**
सदाशिव पेठ, पुणें २.

मुद्रक : ( पृष्ठें आरंभींचीं १ ते ८ व ९३ ते ९६ ) **द. शं. गांगण** यांनीं अक्षर मुद्रणालय, ४३८ अ सदाशिव, पुणें येथें व ( पृष्ठ १ ते ९२ ) **कृष्णाजी नारायण सापळे** यांनीं रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग-रस्ता, दादर, मुंबई येथें छापलीं.

प्रकाशक : **शंकर रामचंद्र हडप**, आदर्श वाङ्मय प्रकाशन, गव्हर्न्मेंट हाउसिंग कॉलनी नेबरहुड, ब्लॉक नं. ३६, मुंबई १८.

साने गुरुजींच्या शब्दांत—

# ' चित्रकार रंगा '

' माझ्या गोष्टी ' म्हणून दहा भाग मी लिहिणार आहें. त्या गोष्टी परभृत नसतील; माझ्याच असतील. त्यांतील ही पहिली गोष्ट मी आज देत आहें. ध्येयोपासक महान राष्ट्राला ती आवडो. मला तर ती अत्यंत प्रिय आहे. पाहिलेलें, ऐकलेलें, अनुभवलेलें येथें आहे.

साने गुरुजींच्याच शब्दांत सांगायचें तर '...चित्रकार रंगामध्यें चित्रकलेच्या द्वारां महान ध्येयें मूर्त करण्याची धडपड मीं दाखविली आहे. मी लहानपणापासून भारताचा, मानवतेचा उपासक आहें. भारत मला प्राणाहूनहि प्रिय कां ? तर सारे धर्म नि संस्कृति तेथें आहेत म्हणून. भारत म्हणजे मानवजातीचें पुंजीभूत पूज्य प्रतीक ! प्रान्तीयता, जातीयता, धर्मान्धता या गोष्टी मला कधींहि शिवल्या नाहींत. माझ्या लिहिण्यांतून हेंच ओतलें जात असतें... चित्रकार रंगा नवभारताचें चित्र उपासणारा आहे. दहा हजार वर्षांच्या परंपरेंतून आलेलीं ध्येयें घेऊन त्यांना नवीन रंगरूप देणारा तो रंगा या ध्येयाशीं एकरूप झाला. देवाघरीं गेला. त्याच्या ध्येयाशीं आपण सारे एकरूप होऊंया. तदनुरूप वागूंया. आपण सारेच नवभारताचे भाग्यविधाते शोभूंया.' —**साने गुरुजी.**

प्रस्तुत कादंबरी ही याच नांवाच्या गुरुजींच्या कादंबरीची संक्षेपकथा आहे. पण कोहिनूर हिऱ्याला पैलू पाडल्यानें त्याचें वजन आणि आकारमान जरी कांहींसें कमी झालें, तरी त्याचें तेज, सौंदर्य आणि मोल पूर्वीपेक्षां वाढतें. तसाच मूळ कथानकांत तंत्रदृष्टीनें अधिक बांधेसूदपणा, अधिक सुसंगति व कथानकाला आटोपशीरपणामुळें अधिक शोभविणारा, खुलविणारा संक्षेप असें मन लावून पैलू पाडण्याचें काम फक्त श्री. वि. वा. हडप यांनीं केलें आहे. लोक म्हणतात कीं, ह्यामुळें या कोहिनूर हिऱ्याची शोभा आणि सौंदर्य वाढलें आहे.

तथापि हा संक्षेप करतांना गुरुजींची भाषा, विचार, ध्येयवाद यांना जराही धक्का लागलेला नाहीं. मोत्यांचें पीक पिकविणाऱ्या शेतांत कुठें कुठें चुकूनमाकून डोकावणारें तण तेवढें उपटून टाकलें आहे. पण तसें करतांना रोपांना जराही इजा होऊं दिलेली नाहीं. उलट शेत अधिक भरघोंस व्हावें अशी पूर्ण खबरदारी घेतली गेली आहे.

‘ चित्रकार रंगा ’सारख्या दहा ‘ माझ्या गोष्टी ’ लिहिण्याचा गुरुजींचा मानस होता. तो कस्तुरी मृग आतां आपणापाशीं नाहीं ! परंतु त्याच्या नाभी-कमळांतील कस्तुरीचा विचारसौरभ मात्र अनेकांच्या मनांत दरवळतो आहे. त्या सौरभाच्या आधारानें गुरुजींची चिरकाल आठवण म्हणून ‘ चित्रकार रंगा ’नंतरच्या त्याच जीवनप्रवाहांतील कथानकांतून कांहीं ‘ माझ्या गोष्टी ’ संपादून वाचकांपुढें ठेवणार आहें. त्यांतली ‘ भारत–मंदिर ’ ही यापुढची दुसरी गोष्ट.

श्री मौनी विद्यापीठ,<br>
गारगोटी, जि. कोल्हापूर.<br>
ता. १ मार्च १९५६.

संपादक

# पूज्य साने गुरुजींचें जीवनदर्शन

पूज्य साने गुरुजी यांचा जन्म कोंकणांत रत्नागिरी जिल्ह्यांत पालघर येथें ता. २४।१२।१८९९ रोजीं झाला. पांडुरंग ऊर्फ पंढरी हें त्यांचें पाळण्यांतील नांव. घरची गरिबी. बाळपणीं गरिबींतच प्राथमिक शिक्षण गांवच्या शाळेंत झालें. गरिबी म्हणजे कशी ! ती त्यांची दत्तक आई शोभावी ! घराण्याला कर्जबाजारही होता.

पुढील इंग्रजी शिक्षणासाठीं पंढरीला सोईच्या परगांवीं जावें लागलें. पण तेव्हांदखील गरिबीबरोबर अडचणींची सोबत कायमचीच होती.

हा पंढरी औंधला विद्यार्थ्याला अन्न वाढून मिळतें असें कळल्यावरून औंधला गेला. आणि तोंच औंधला बाहेरच्या विद्यार्थ्यांना अन्नदान बंद झालें. माधुकरी मागण्याची पाळी आली. पण या पंढरीला माधुकरी मागण्याचा कंटाळा.

मग थोड्या दिवसांनीं विद्येसाठीं आणि विद्येकरितां पोटासाठीं पंढरीला पुण्याला जावें लागलें. त्याला मॅट्रिक करण्याचें भाग्य लाभलेली शाळा नूतन मराठी विद्यालय. सन १९१८ सालीं पंढरी मॅट्रिक झाला. नंतर न्यू पूना कॉलेजांत पदवीचें शिक्षण झालें. प्रा. सोनोपंत दांडेकर, प्रा. पोतदार, प्रा. लागू असे नामवंत गुरु त्याला लाभले. अर्थात् गुरु चांगले असले तरी सारेच शिष्य ' साने गुरुजी ' निपजणें शक्य नसतें.

बी. ए. झाल्यावर पंढरी अमळनेरला जाऊन त्याचे तेथील हायस्कुलांत साने गुरुजी झाले. तेथेंच ते पुढील सालीं एम्. ए. झाले. विद्यार्थीदशेंत जो सर्वांचें सर्वदा मंगल चिंतण्याचा आणि पाहण्याचा गुण, तो अधिकाधिक विकसित होऊं लागला. त्याचा सुगंध सर्वत्र दरवळूं लागला. बाळपणीं आप्त-सहाध्यायी-सौंगडी यांच्याविषयींच नव्हे तर सभोंवारच्या सर्व लोकांविषयीं त्यांना अलोट प्रेम वाटे. किंबहुना त्या दिव्य प्रकाशानें त्यांच्या आयुष्याचा नंदादीप सतत तेवत होता.

नदीची महानदी व्हावी तशी गुरुजींच्या जीवनाची नंदादीपाची ज्योत अधिक त्यागानें, सेवेनें आणि व्यापक समाजसेवेच्या–राष्ट्रसेवेच्या रूपानें अधिकाधिक तेवूं लागली ती सन १९३० सालीं गांधीजींची मिठाच्या सत्याग्रहाची दांडीयात्रा सुरू झाली तेव्हांपासून. त्यांनीं शाळेचा निरोप घेतला आणि चळवळींत उडी घेतली.

त्यांचा पहिला तुरुंगवास धुळ्याच्या बंदिशाळेंत. या तुरुंगांत असतांनाच गुरुजी आपल्या 'गोड गोष्टी' तेथील सत्याग्रहींना सांगत. त्याच आज आपल्या सततच्या आवडत्या अवीट गोड गोष्टी. गुरुजींचें बरेंचसें लेखन अशा संवयीच्या विश्रांतींतच झालें आहे.

पण सरकारला गुरुजींचा आणि तुरुंगांतील सत्याग्रही यांचा हा गोड संगम आवडला नाहीं. सरकारनें त्यांना धुळ्याहून त्रिचनापल्लीच्या बिन-मराठी तुरुगांत नेऊन डांबलें. पण गुरुजींना मात्र नदींतून समुद्रांत पोहायला उतरल्यासारखा तो तुरुंगवास तेथील तामीळ–तेलगू–मल्याळी–कानडी अशा अपरिचित भिन्नभाषी राजबंद्यांशीं जिव्हाळा जोडण्यांत उपयोगी पडला. त्या भाषांची ओळख करून घेतली. 'प्रांतभारती'ची पुढें विकास पावलेली कल्पना त्यांच्या अंतःकरणांत त्रिचनापल्लींतच अंकुरली. टागोरां-च्या विश्वभारतीसारखी.

पुढें गांधी–अर्विन करार झाला; आणि त्यानुसार गुरुजींची सुटका झाली. तोंच पुन्हां सरकार उलटलें. चळवळ पेटली. पुन्हां कॉंग्रेसच्या प्रचाराबद्दल अटक. धुळें, नासिक अशी तुरुंगयात्रा सुरू. नासिकच्या तुरुंगांत असतांनाच त्यांची अमर 'श्यामची आई' अवतरली.

सन १९३४ सालीं गुरुजी अज्ञातवासांत खेडोपाडीं हिंडत होते. त्या यात्रेंत त्यांनीं स्त्रीजीवनाची ओळख करून घेतली. ओव्या मिळविल्या. तो लोकगीताचा ठेवा 'स्त्रीजीवन' म्हणून आज आपल्याला ग्रंथरूपानें उपलब्ध आहे.

त्याच अज्ञात भ्रमणांत गुरुजी पुण्यांत कांहीं काळ होते. ते कुठेंहि गेले तरी विद्यार्थ्यांची आई शोभायचेच. पुण्यांतही ते आपल्या कॉलेजांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची आई होते. ते त्या विद्यार्थी बाळगोपाळां-

साठीं जेवण बिन्हाडीं तयार करून ठेवायचे. ' भारतीय संस्कृति ' हा अमर ग्रंथ त्यांनीं याच काळांत लिहिला. तसेंच आणखीही पुष्कळ अमोल वाङ्मय लिहिलें. आज गुरुजींचे सुमारें ऐशीं ग्रंथ जे मराठीचे लहानमोठे अलंकार शोभत आहेत, त्या सुंदर अलंकारांची घडण अशा धांवत्या घाईतच झाली आहे.

सन १९३६ सालीं गुरुजींनीं फैजपूर कॉंग्रेसचा साऱ्या खानदेशभर हिंडून प्रचार केला. त्या खेडेगांवीं कॉंग्रेसच्या घवघवीत यशांत या प्रचाराचा मोठाच वांटा आहे. सन १९३८ सालीं त्यांनीं ' कॉंग्रेस ' साप्ताहिक काढलें. सरकारनें त्यांच्याकडून ४००० रुपयांचा जामीन मागून तें बंद पाडलें, यापेक्षां त्यांची थोरवी सांगायला निराळा पुरावा नकोच.

सन १९३८ मध्यें अमळनेरच्या प्रताप गिरणींतील कामगारांचा न्याय्य लढा गिरणी मालकाशीं लढवितांना गुरुजींवर जलसमाधी घेण्याची पाळी आली होती. बाळासाहेब खेर मध्यस्थ पुढें आले. त्यांनीं उभयपक्षीं समजूत घालून लढा मिटविला. म्हणून गुरुजींचे प्राण वांचले. अमळनेरच्या शेत-कऱ्यांवर म्युनिसिपालिटीनें टोल-कर बसाविला, तोही गुरुजींनीं असेच प्राण पणाला लावून रद्द करून घेतला.

सन १९४१ मध्यें गुरुजींना पेण येथील भाषणाबद्दल अटक झाली. दीड वर्ष सक्तमजुरीची शिक्षा झाली. त्यांतून सुटतात तों नऊ ऑगस्टचा ' चलेजाव ' लढा देशभर पेटलाच होता. त्यांत पुन्हां एप्रिल १९४३ मध्यें स्थानबद्ध. पुढें १९४५ मध्यें त्यांतून त्यांची सुटका झाली. या लढ्यांत अनेक सत्याग्रही वीर, बालवीर त्या स्वातंत्र्ययुद्धांत धारातीर्थीं बळी पडले. त्यांची रोमहर्षक जीवनगीतें साऱ्या महाराष्ट्रभर गाऊन गुरुजींनीं महाराष्ट्र अधिक जागृत केला.

सन १९४६ मध्यें पंढरपूरचें विठ्ठल मंदिर हरिजनांना मोकळें व्हावें म्हणून या महापुरुषानें प्राणांतिक उपोषण आरंभिलें. कै. मावळंकर, पूज्य ठक्करबाप्पा अशी थोर मंडळी मध्यें पडली. त्यांनीं हट्टी बडवे मंडळीची समजूत घालून हरिजनांना मंदिरप्रवेशाला मान्यता मिळविली, म्हणून गुरुजी आपणांला त्या प्राणांतिक उपोषणांतून लाभले.

आपला भारत तारीख १५ ऑगस्ट सन १९४७ रोजीं स्वतंत्र झाला. पण त्या स्वातंत्र्यासभोंवार निर्वासितांच्या प्राणसंकटांतील किंचाळ्या कोणालाहि ऐकवेनाशा झाल्या. गांधीजींप्रमाणेंच गुरुजींना त्यामुळें अपार दुःख झालें. दोघांनाही जीवन नीरस वाटूं लागावें, असाच तो एकंदर दारुण प्रकार होता.

त्या दुःखाच्या आगींतच सन १९४८ मध्यें महात्माजींचा वध झाला. भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या महापुरुषाचा बळी भारतानें–भारताच्याच एका उग्र भयकर विचारसरणीच्या माणसानें–घेतला !

स्वातंत्र्य मिळूनही भारत सुखी होईना. असें कां ? याचा विचार करतां करतां गुरुजींना समाजवादाचा तारक प्रकाश दिसूं लागला. त्यांनीं मुंबईत ‘ साधना ’ साप्ताहिक सुरू केलें व प्रचार सुरू केला. लेखन, भाषणें, प्रवास असें हें प्रचाराचें ओझें शरिरांतील सर्व शक्ति झिजेपावेतों गुरुजींनीं वाहिलें तें आयुष्याच्या अगदीं अखेरीपावेतों.

त्या असह्य दगदगीनें गुरुजींच्या रक्तदाबाचा विकार अतिशय बळावला. झोंप येईना; चैन पडेना; वेदना सहन होईनात. अशा स्थितींत गुरुजींनीं आपल्या या नश्वर देहांत आतां समाजाच्या–राष्ट्राच्या सेवेंत झिजण्याइतकें त्राण उरलेलें नाहीं असें पाहिलें आणि आत्मार्पण करण्याच्या अंतिम निर्धारानें एके दिवशीं मृत्यु येण्याला भरपूर पुरतील इतक्या झोंपेच्या विषारी गोळ्या सेवन केल्या. त्यांतच त्यांची जीवनयात्रा ता. १०।६।५० रोजीं पहांटे ४ वाजतां आटोपली.

# चित्रकार रंगा

## बाल्य : : : १

काशीचें हें पहिलें बाळंतपण. ती माहेरीं आली होती. तिचे दिवस भरत आले होते. आईबापांचें तिच्यावर फार प्रेम होतें. तिची प्रत्येक हौस पुरविली जाई. माहेरीं श्रीमंती होती अशांतला भाग नाहीं. काशीचे वडील वामनराव एका सावकराकडे मुनीम होते. त्यांचें लहानसें घर होतें. फुलांचा त्यांना फार नाद. किती तरी फुलझाडें घराभोंवतीं होतीं. काशी आणि तिचा मोठा भाऊ काशिनाथ, दोघेंच भावंडें. काशिनाथ पुण्याला नुकताच नोकरीला लागला होता. मागल्या वर्षी त्याचें लग्न झालें होतें. त्याची पत्नीहि माहेरीं बाळंतपणाला गेली होती. तिचें माहेर तिकडे लांब सांगलीकडे होतें.

"काशी, दादाचें पत्र आलें आहे." काशीची आई म्हणाली.

"वैनी बाळंत झाली वाटतें?" काशीनें विचारलें.

"हो. मुलगी झाली. देवाला गूळ ठेव जा. आणि सर्वांना दे."

"इश्श, मुलगी झाली नि गूळ का वांटायचा? आई, बर्फी आणायला सांग ना ग बाबांना!"

देवाला गूळ ठेवण्यांत आला. परंतु मागून वामनरावांनीं बर्फी आणून सर्वांना वांटली. सर्वांचीं तोंडें गोड झालीं.

"काशी, तुला मुलगी होणार कीं मुलगा?" शेजारच्या रमाकाकूंनीं येऊन विचारलें.

"तिला नक्की मुलगा होणार. मान बघा कशी बारीक झाली आहे." शेवंताबाई म्हणाल्या.

काशी लाजली. ती तिथून उठून गेली. ती झोंपाळ्यावर जाऊन बसली.

शिवरात्र गेली. शिमगा आला. होळीपुनवही गेली. आज रंगपंचमीचा दिवस.

"बाबा मला रंग आणून द्या. पिचकारी आणून द्या." काशी म्हणाली.

आईबापांना लेकीचे हे डोहाळेसे वाटले.

काशीला वडिलांनीं रंग आणून दिले. पिचकारीही आणली. आणि काशी रंग खेळूं लागली. आज शेजारीपाजारीं ती सर्वत्र गेली. गडीमाणसें, मित्रमैत्रिणी, सारीं एकमेकांच्या अंगावर रंग उडवीत सुटलीं. अशी रंगपंचमी त्या आळींत कधीं झाली नव्हती.

“काशी, पुरे आतां. तूं दमून गेलीस हो! ये घरीं.” आई म्हणाली. काशी घरीं आली. आंघोळ करून, पातळ बदलून पडून राहिली. तिचा डोळा लागला. परंतु पोट दुखायला लागलें. सुईण आली. तयारी झाली. आणि दिवे लागतांना काशी नीटपणें बाळंत झाली. मुलगा झाला. आनंदाचे पेढे वांटण्यांत आले. मुलीची बर्फी, मुलाचे पेढे!

बारशाचा समारंभ झाला. बाळाचें नांव श्रीरंग ठेवण्यांत आलें. महिना दोन महिने हां हां म्हणतां गेले. काशी बाळाला घेऊन आतां सासरीं जाणार होती.

वसंतऋतूचा बहर होता. झाडांना नवीन पालवी फुटली होती. आंबे, फणस, काजू, करवंदें, जांभळें, कोकंब सर्व फळांना जसा ऊत आला होता. सृष्टीचें रंगवैभव जिकडेतिकडे दिसून येत होतें.

गांवाबाहेर नदीकाठीं ग्रामदेवतेचें देऊळ होतें. जगदंबेची खणानारळांनीं ओटी भरायला आज काशी लहानग्या श्रीरंगाला घेऊन गेली होती.

श्रीरंगाला सारीं रंगा म्हणत. किती सुंदर होता रंगा! देवीची ओटी भरण्यांत आली. तिच्या पायांवर बाळाला घालण्यांत आलें. नारळ फोडून सर्वांना प्रसाद देण्यांत आला. मंडळी परत निघाली. जातां जातां नदीकांठीं जरा बसली.

आकाशांत आज रंगपंचमी होती. ढगांवर रंग पडून अनेक रमणीय प्रकार तिथें दिसत होते. नदीचें पाणीही लालसर पिवळसर दिसत होतें. लहानगा रंगा वरच्या रंगसृष्टीकडे टपोऱ्या काळ्या भोर डोळ्यांनीं पाहात होता.

“चला आतां जाऊं.” अमळशानें आई म्हणाली.

आजीनें नातवाला घेतलें. तो झोंपी गेला. सारीं घरीं आलीं. बाळाला अंथरुणावर ठेवण्यांत आलें.

“आई, झोंपेंत हंसतो आहे बघ बाळ.” काशी बाळाला झोंपेंत हंसतांना पाहून म्हणाली.

“अग, मुलें झोंपेंत अशींच हंसतात. तूंही लहानपणीं झोंपेंत हंसायचीस नि जागेपणीं रडायचीस.” आई म्हणाली.

काशी सासरीं जायला निघाली. शेजारच्या धोंडोपंतांबरोबर ती आज जाणार होती. आईनें बरोबर लाडू वगैरे दिले. म्हणाली, "बाळाला जप. बाळकडू घालीत जा. तिन्हीसांजा मीठमोहऱ्या काढीत जा, अंगारा लावीत जा."

देवांच्या, मायबापांच्या पायां पडून, शेजारीं सर्वांना विचारून काशी मोटारींत बसली. तिचे डोळे भरून आले.

"ये हो! बाळाला सांभाळ." आई म्हणाली.

"पत्र पाठव." वडील म्हणाले.

पों पों करीत मोटार निघाली. मोटारच्या मुक्कामावर आनंदराव आले होते. काशीनें त्यांच्याजवळ बाळ दिला. दोघांचीं जीवनें एकत्र जोडणारा तो प्राणमय दुवा. आनंदरावांनीं बाळाकडे पाहिलें. त्याचे डोळे, त्याचें काळेंभोर जावळ, ती सुंदर मूर्ति पाहून पित्याला कृतार्थ वाटलें. काशी खालीं उतरली. हमालानें सामान घेतलें. सारीं घरीं आलीं. शेजारच्या आयाबाया आल्या. मित्र आले. सर्वांनीं बाळाला पाहिलें. किती गोड बाळ!

रोज बाळ वाढत होता. त्याचें रडूं थांबायची एक युक्ति असे. रंगीत खेळणीं, रंगीत फुगे, रंगारंगांचीं फुलें दाखवलीं कीं त्याचें रडें थांबायचें. रंगाला फुलपांखरें, पांखरें म्हणजे केवढी गंमत!

बाळाला आतां पाय फुटले. तो रांगूं लागला. लौकरच उभा राहूं लागला. चालूं लागला. तो कोळसे घेई नि रेघोट्या ओढी. आईला पुसतां पुसतां भुई थोडी होई. एके दिवशीं तर मजाच झाली. रंगा खेळत होता. तोंच तेथें एक विंचू आला! रंगानें पटकन् नांगी धरून तो पकडला.

"आई, ही बघ गंमत." असें म्हणत आईला दाखवायला तो आला.

"टाक टाक, अरे तो विंचू." आई घाबरून ओरडली. तेव्हां बाळानें एकदम टाकला. तशी नांगी वर करून ती काळी सावळी मूर्ति तरतर करीत निघाली.

रंगा मोठा झाला. पांच वर्षांचा झाला. त्याला रंगीत पुस्तक देण्यांत आलें. पाटी आली, पेन्सील आली. रंगा शाळेंत जाऊं लागला. तो पाटीवर चित्रें काढी. मास्तर रागें भरत नि छडी मारीत. त्यानें एकदां छडी मारणाऱ्या मास्तरांचेंच चित्र काढलें.

रंगा आणखी मोठा झाला. तो आतां चौथींत होता. चौथी झाल्यावर काय? मामाकडे पुण्याला त्याला शिकायला ठेवावें असें काशीच्या मनांत होतें. परंतु निराळ्याच घटनेनें ती इच्छा पुरी होणार होती. एका तापाची सर्वत्र सांथ आली.

घरोघर माणसें आजारी पडलीं. रंगाचे वडील आनंदराव अंथरुणांत तापानें फणफणत होते. तिकडे काशीचे आईबाप तापाला बळी पडले. ती वार्ता ऐकून काशी रड रड रडली. अश्रू पुसून ती पतीची सेवाशुश्रूषा करीत होती.

"काशी, यांतून मी बरा नाहीं होणार. रंगाला जप. तो गुणी मुलगा आहे. तूं पुण्याला काशिनाथकडे जा. तुझा भाऊ तुम्हांला सांभाळील. तूं एकुलती तर त्याची बहीण. कोठें आहे रंगा?" आनंदराव म्हणाले.

"तो झोंपला आहे." काशी म्हणाली.

त्या दुखण्यांत आनंदरावही हा लोक सोडून गेले. काशी आणि तिचा रंगा, मायलेकरें उघडीं पडलीं.

दिवस जात होते. काशी रडत बसे. पतीची, आईबापांची तिला राहूनराहून आठवण येई. रंगा जवळ असला म्हणजे ती दुःख लपवी. ती हंसे, आनंदी दिसे. माझा बाळ सुखी असो, त्याला कशाची ददात नसो, असें ती मनांत म्हणे. तो निजला म्हणजे त्याच्या डोक्यावर हात ठेवून ती विश्वंभराची प्रार्थना करी.

• • •

## मामाकडे : : : २

थोडे दिवस गेले. काशी रंगाला घेऊन पुण्याला भावाकडे आली होती. शनिवार पेठेंतील एका वाड्यांत तें बिऱ्हाड होतें. घरांतील सारें काम आतां काशीच करी. तिला परिस्थितीची जाणीव होती. ती सारे अपमान सहन करी. सारीं बोलणीं सहन करी. मुलाला घेऊन ती कोठें जाणार! भावाचाच काय तो तिला आधार होता.

पुण्याच्या इंग्रजी शाळेंत रंगा जाऊं लागला. त्याची चित्रकला तेथें प्रगट होऊं लागली. शाळेंत अनेक मुलांच्या वह्यांमध्यें तो चित्रें काढी.

त्या दिवशीं रविवार होता. मामा घरीं होते. ते रंगाची चांचणी पाहूं लागले. पाहातात तों पस्तीस मुलांत रंगाचा नंबर बत्तिसावा!

"तुझा बत्तिसावा नंबर? हा गाढवा, दिवसभर करतोस तरी काय?" मामा रागें भरले.

तोंच तिकडून आई आली. तिनें तें ऐकलें. पाहते तों रंगा रडत होता.

"शंभरदां सांगितलें तुला कीं अभ्यास कर म्हणून. बत्तिसावा नंबर. लाज

नाहीं वाटत तुला काट्यां ? भिकमाग्या कुठला. ऊठ, पुस्तक घेऊन बस. का घालूं पाठींत लाटणें. रडायला काय झालें ?" आई संतापानें म्हणाली.

रंगाच्या वर्गात एक मुलगा होता. त्याचें नांव पंढरी. पंढरीही पोरका होता. चुलत्याकडे तो शिकायला होता. त्याचेही हाल असत. एके दिवशीं तो रडत रडत शाळेंत आला.

"पंढरी, काय झालें तुला ?" रंगानें विचारलें.

"काकूनें मारलें. न जेवतां शाळेला पाठवलें." पंढरी डोळे पुशीत म्हणाला.

"तूं उपाशी आहेस ?"

"हो रंगा."

मधल्या सुटींत रंगा त्याला घेऊन घरीं आला.

"आई, तुझ्या कानांत सांगायचें आहे." तो आईला म्हणाला.

त्यानें हळूच आईला सारें सांगितलें.

"ये बाळ, ये हो ! पोळी भाजी खा. ये." आई पंढरीला म्हणाली.

रंगाच्या आईनें पंढरीला खाऊं घातलें. दोघे मग मित्र हंसत खेळत शाळेंत गेले. परंतु मामीला तें आवडलें नाहीं. तिच्या तोंडाचा पट्टा सुरू झाला.

"स्वतःच्या मुलांला घेऊन इथें आल्यात. आतां मुलाच्या मित्रांना जेवायला वाढा. हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ! फुकाचा मोठेपणा नि चांगुलपणा मिरवायला काय जातें ! 'ये हो बाळ, जेव पोटभर.' हा मेल्यांनो ! कुणाचें घर, कुणाचें अन्न ! मला नाहीं हो हें सहन व्हायचें. मला एका शब्दानें तरी विचारलेंत का त्या पोराला देऊं का खायला म्हणून ? मी मालकीण कीं तुम्ही ? भिकेला लावाल तुम्ही आम्हांला. आणि हा पोरगा तरी कसला विधुळा. नंबर म्हणे बत्तिसावा. तरी आईचे लाड सुरूच आहेत. आणि आतां मुलाच्या मित्रांचे लाड. सारें जग जणुं तुमचें. तरी बरें. घर ना दार. तों ही ऐट."

आईचे ती कटकट ऐकून डोळे भरून आले. असे दिवस जात होते.

आज रविवार होता. रंगाचा आज वाढदिवस होता. आईनें देवांना गूळ ठेवला. रंगाला अंगारा लावला. दुसरें ती माऊली काय करणार ?

"रंगा, तेल आण जा. हे घे बारा आणे. नीट सांभाळून आण. लौकर ये." मामीनें सांगितलें.

हातांत ॲलिमिनमची बरणी घेऊन रंगा निघाला. जुना बाजार भरलेला होता. रंगा चित्रें बघत निघाला. एका पुस्तकविक्र्याजवळ फारच सुंदर एक मासिकाचा

अक होता. त्यांत काश्मीरचे देखावे होते. दुसरींही चित्रें होतीं. झोंक्यावर झोंके घेणाऱ्या एका मुलाचें चित्र होतें. रंगा चित्रांत रंगला. तो तेल वगैरे विसरला.

" या अंकाची काय किंमत ? " त्यानें विचारलें.

" रुपया."

" बारा आण्याला देतां ? "

" आण बारा आणे."

रंगानें तो अंक विकत घेतला. तो नदीकिनारीं जाऊन बसला. तीं चित्रें तो पुन्हा पुन्हा बघत होता.

नंतर तो उठला. ती रिकामी बरणी हलवीत घराकडे वळला.

" किती रे उशीर ! " आई लेक आलेला पाहून त्रासून म्हणाली.

" आई !"

" काय ?"

" मीं तेल नाहीं आणलें. हें चित्रांचें पुस्तक आणलें. तूं रागावूं नको. बाबा वाढदिवशीं मला रंगाची पेटी देणार होते. खरें ना आई ?"

" चित्रें विकत आणलींस ? काय बाई तरी पोर. चुलींत घालत्यें दे तीं चित्रें. असा ठेवा लाडावून. उद्यां तुरुगांत जायचीं हीं लक्षणें आहेत." मामी ओरडली.

आईनें रंगाला मारमार मारलें.

तोंच मामा बाहेरून आले.

" काय, काय आहे हें ?" त्यांनीं विचारलें.

मामीबाईनीं तिखटमीठ लावून सारें सांगितलें.

" थांब, आज तुझी गय नाहीं." असें म्हणून टेबलावरच्या रुळानें मामा मारूं लागले.

" दादा, मीं त्याला आधींच मारलें आहे. तूं आणखी नको मारूं त्याला. कुठें जाईल तो पोर ?" आई काकुळतीला येऊन म्हणाली. तिला तें पाहवेना.

" त्याला मारूं नको म्हणतेस. मी का दुष्ट आहें ? ज्याचें भलें करायला जावें, त्यानेंच चावायला यावें. असो. अधिक कशाला बोलूं ? " मामा संतापले.

" वन्सं, तुम्ही इथून जाच कशा. रोज उठून मेलीं भांडणें. तुम्ही सुखी, आम्ही सुखी." मामी कडाडल्या.

" दादा, तुझीही अशीच इच्छा आहे का ? " आईनें विचारलें.

" हो. मलाही असेंच वाटतें. जाच तूं तुझ्या पोराला घेऊन."

" ठीक. आजवर आधार दिलांत त्याबद्दल मी ऋणी आहें. दादा, पृथ्वी ओस नाहीं. परमेश्वरानें कुठें तरी आमच्यासाठीं घांस ठेवलाच असेल. जो पांखरांना पोसतो, कीडमुंगीला सांभाळतो, तो आम्हांला दूर नाहीं लोटणार. मी कुठें तरी खोली शोधतें, तोंवर इथें राहूं दे. तुझी बहीण कुठेंतरी मोलकरीण होईल. परंतु इथें नाहीं हो राहणार. नको तुम्हांला भार, आमचें ओझें. कोणाचीं भांडीं घाशीन, धुणीं धुवीन; दळीन, कांडीन. मला त्यांत कसला कमीपणा ? "

काशीताईनें रंगाला पोटाशीं धरलें. तिच्या डोळ्यांतील धारांचा त्या बाळराजाला अभिषेक होत होता.

" आई, तूं नको रडूं. मी चित्रें काढीन नि तुला पैसे आणून देईन. आपण इथून जाऊं." रंगा म्हणाला.

" बघा कसा चुरु चुरू बोलतो आहे तो ! जा, खुशाल जा. " मामी म्हणाली.

जेवणें झालीं. रंगा जेवला नाहीं. त्याची आईही जेवली नाहीं. रात्र झाली. सारीं झोंपलीं. रंगा आईजवळ झोंपला होता. तिला झोंप येईना. तिच्या एकुलत्या बाळाचा आज वाढदिवस होता. आज बाळाचे वडील असते तर केवढा आनंदाचा सोहळा झाला असता. आज रंगाला रंगाची पेटी हवी होती. परंतु आज त्याला मरेमरेतों मार मात्र मिळाला होता.

" माझा गुणांचा बाळ. मरतांना ते म्हणाले होते, ' बाळ गुणी आहे. त्याला जप.' रंगा, राजा, आतां नाहीं हो कधीं तुझी आई तुला मारणार ! ते आकाशांतून बघत असतील. त्यांचा आत्मा तुझ्याभोंवतीं घुटमळत असेल. त्यांचीच का ती मूर्ति ? होय. नका, असें रागानें नका बघूं ! हें काय ? क्रोध जाऊन तोंडावर करुणा ओथंबली. नका रडूं. बाळाला आतां नाहीं कधीं मारणार. मी कैदाशीण नाहीं होणार. त्याची प्रेमळ माता बनेन. आम्ही उद्यांपासून स्वतंत्र राहूं. बाळाचा आत्मा फुलेल. खरेंच हंसेल. रंगा, ते बघ तुझे वडील हंसताहेत. तुला आशीर्वाद देत आहेत. गेली, ती मूर्ति गेली. तें का स्वप्न होतें कीं भास होता ?"

काशी अंथरुणावर पडली होती. ती असा विचार करीत होतीः ' उद्यां कुठें जायचें ? पृथ्वी मोठी आहे म्हणून म्हटलें खरें. परंतु रात्रीं डोकें कुठें टेकायचें ?'

असा विचार करतां करतां मुलाच्या अंगावर प्रेमानें हात ठेवून ती दुःखी दुर्दैवी माता मग केव्हांतरी झोंपली.

• • •

## आधार मिळाला : : : ३

एका भल्या मोठ्या वाड्यांतील एका लहानशा खोलींत काशी नि तिचा बाळ रंगा दोघें राहात होतीं. रखमाबाईंची तिला मदत मिळाली. त्या वाड्यांतील एक दोन घरचें कामही तिला मिळालें.

रखमाबाई तशीं अधांतर कामें आणीत. दोघीजणी सहकार्यानें कामें करीत. मीठ वाटणें, मिरच्या कुटणें, हळद दळणें, भाजणी करणें, मसाला कुटणें, पापड घालणें, अशीं नाना कामें असत. भांडीं नि धुणीं दोन तीन ठिकाणीं होतींच. कधीं रंगाही आईला मदत करायचा. असे मायलेकरांचे दिवस कष्टांत परंतु समाधानांत जात होते.

त्या वाड्यांत एक शिक्षक राहात होते. त्यांना वासुकाका म्हणत. तिशीपस्ताशीच्या वयाचे होते. त्यांच्या पत्नीचें नांव सुनंदा. त्यांना मूलबाळ नव्हतें. वासुकाकांकडे कितीतरी मुलें यायचीं, जायचीं. कोणाला वाचायला पुस्तक देतील, कोणाला गणित सांगतील, कोणाला रंगें भरतील, असें चालायचें. रविवारीं ते मुलांना गोष्टी सांगत. कधीं ते मुलांना खायला खाऊ द्यायचे. त्यांच्या खोलींत तीन तसबिरी होत्या. लोकमान्य, जवाहरलाल आणि गांधीजी, या तीन थोर पुरुषांच्या त्या तसबिरी होत्या. हीं वासुकाकांचीं दैवतें. त्या त्या दैवताचा वाढदिवस खोलींत साजरा होई. वासुकाकांची ती प्रशस्त खोली म्हणजे नवभारताच्या निर्मितीची जागा होती. थोर विचार घेणारी, व्यापक दृष्टि ठेवणारी नवीन पिढी तिथें तयार होत होती.

एके दिवशीं वासुकाकांचें लक्ष रंगाकडे गेलें. त्या दिवशीं रंगा नळावर होता. तेही होते. रंगाला बादली उचलत नव्हती. आईनें पाणी भरून ठेवायला सांगितलें होतें.

“ इतकी कशाला भरलीस ? अर्धी न्यायची. थांब मी नेऊन देतों.” वासुकाका म्हणाले.

“ तुम्ही कशाला ? मी नेईन. टेंकीत टेंकीत नेईन.” रंगा म्हणाला.

परंतु वासुकाकांनीं ती बादली उचललीच. रंगाच्या खोलींत त्यांनीं ती नेऊन ठेवली. त्यांनीं खोली पाहिली. भिंतीवर चित्रें होतीं. तिथें रंग होते. खालीं जमिनीवर चित्रांची वही होती.

“ तूं का काढलींस हीं चित्रें ? अरे वा ! एवढासा आहेस, पण चित्रें छान काढतोस. माझ्याकडे येत जा. मी तुला चित्रांचे संग्रह दाखवीन. येशील ना ?

ये. कितीतरी मुलें येतात. आणि तुझी आई कुठें गेली रे ? कामाला गेली वाटतें ?"

"हो."

"तुझें जेवण ?"

"आईनें भाकरी भाजून ठेवली आहे. ती खाऊन जाईन."

"मी भाजी देऊं आणून ? चल आमच्याकडे. भाजी घेऊन ये. ओळखही होईल. तुझें नांव रंगा ना ?"

"तुम्हांला काय माहीत ?"

"तुझी आई तुला हांका मारते, त्या कानीं पडतात. तूं आईला मदत करतोस. चांगला आहेस तूं मुलगा. चल आमच्याकडे."

दार ओढून घेऊन रंगाला घेऊन वासुकाका आपल्या जागेंत आले.

"ये रंगा. किती दिवस तुला बोलवीन बोलवीन म्हणत होतें." सुनंदा म्हणाली.

"अग त्याला भाजी दे वाटींत. त्याच्या आईनें भाकरी भाजून ठेवली आहे."

"जेवायलाच राहूं दे नाहींतर ?" सुनंदा म्हणाली.

"पण भाकरी फुकट जाईल." रंगा म्हणाला.

"बरें तर; पुन्हां कधीं ये. ही घे भाजी."

रंगा भाजी घेऊन गेला. त्याची शाळेंत जाण्याची वेळ होत आली. जेवून तो शाळेंत गेला. आज त्याला आनंद झाला होता. तो पोटांत मावत नव्हता.

रंगाची नि वासुकाकांची चांगलीच गट्टी जमली. इतर मुलांच्याही तेथें ओळखी झाल्या. पंढरीही तेथें यायचा. वासुकाका मुलांना कधीं कधीं पोहायला नेत. रंगा, पंढरी दोघे पोहायला शिकले. रंगाला आतां कांहीं कमी नसे. पुस्तकें, रंग, कुंचले, सारें मिळे. वासुकाका त्याला निरनिराळीं चित्रें दाखवीत. त्यांतील फरक समजावून सांगत.

रंगाच्या आईला समाधान होतें. मुलाला मार्गदर्शक भेटला म्हणून ती देवाचे आभार मानी. परंतु तेवढ्यांत एक निराळीच घटना झाली. अलीकडे काशी एका श्रीमंताकडे स्वयंपाकाला जात असे. श्रीमंताची राणी माहेरी गेली. श्रीमंतच एकटे घरीं असत. त्यांना वाढून काशी रात्रीं घरीं येई. एके दिवशीं सायंकाळीं काशी स्वयंपाक करीत होती. तो रंगेल श्रीमंत तिच्याकडे बघत होता. काशीच्या लक्षांत ती गोष्ट आली.

"काय पाहिजे ?" तिनें विचारलें.

"तुम्हीच." तो म्हणाला.

शब्दावरून शब्द वाढला. धन्याचा हलकटपणा पाहून काशी चिडली. रागानें घरीं निघून आली.

रंगा तेव्हां वासुकाकांकडे वाचीत बसला होता.

"रंगा, तुझी आई लौकरशी आज घरीं आली ! बरें वाटत नाहीं कीं काय ?" वासुकाकांनीं विचारलें.

"आई आली ! मी बघून येतों." असें म्हणून रंगा निघाला.

रंगा घरीं आला. आई रडत होती. त्यानें आईच्या गळ्याला मिठी मारली. तिनें त्याला पोटाशीं घेतलें. कोणी बोलत नव्हतें. रंगानें विचारलें, "आई, काय झालें ! आई ?"

"काय सांगू बाळ ? आपण दुर्दैवी आहोंत. कशाला आलास या अभागी आईच्या पोटीं ? जा तूं आपला अभ्यास कर. शहाणा हो. जा."

रंगा रडत वासुकाकांकडे आला. त्यानें आई रडत आहे म्हणून सांगितलें. सुनंदा काशीकडे गेली. दोघी बोलत होत्या. काशीनें सारें सांगितलें.

सुनंदा, काशी, वासुकाका तिथें बराच वेळ बोलत होतीं.

"काशीताई, तुम्ही घाबरूं नका. उद्यांपासून त्याच्याकडे जाऊं नका." वासुकाका म्हणाले.

"महिन्याचा पगार ?" काशीताईला प्रश्न पडला.

"जाऊं दे पगार. तुम्ही काळजी करूं नका. मी देईन पैसे. पैशासाठीं तुम्ही परत याल अशी त्या चांडाळाची कल्पना असेल. पुन्हा त्याचें तोंड पाहूं नका. नका रडूं. तुमचा मुलगा मोठा कलावान् होईल. नांव मिळवील."

"पण उद्यांपासून आतां काम कुठें हो बघूं ?"

"तुम्ही सेवासदनांत काम कराल का ? तिथें कांहीं मुली श्रीमंत असतात. त्यांचें काम असतें. इतरही काम मिळेल. फावल्या वेळीं प्रौढ स्त्रियांच्या वर्गांत शिकालही. तुमची तिथें राहायाची व्यवस्था झाली तर रंगा आमच्याकडे राहील. रविवारीं यावें, भेटावें. मधूनही येतां येईल. बघा विचार करून. म्हणजे असले प्रसंग येणार नाहींत. खरें ना ?"

"होय. तुमचा आधार मिळाला, जगदंबेची कृपा."

"आपण कोण कुणाला कितीसे पुरणार ? खरी कृपा देवाची, जगदंबेचीच."

रंगा तेथेंच निजला होता.

वासुकाका म्हणाले, "निजूं दे. आतां उठवूं नका त्याला. मला तो परका नाहीं. आम्हांला मूल ना बाळ. रंगाच आमचा मुलगा."

"मी मेलें बिलें तर तुम्ही त्याला वाढवा." काशीताई म्हणाली.

"असें वेडेंवांकडें मनांत नका आणूं. तुम्ही मुलाचें वैभव बघाल. चांगले दिवस येतील. आशेनें रहा." वासुकाकांनीं धीर दिला.

काशीताई आपल्या खोलींत गेली. किती तरी वेळ तिला झोंप येईना. भावानें घालवलें. परंतु ज्यांची ओळख ना पाळख ते भाऊ बनले. देवाची दया. विचार करतां करतां तिचा डोळा लागला.

दुसऱ्या दिवशीं वासुकाका सेवासदनांत गेले. ते तेथें मागें फुकट शिकवित असत. पुढें त्यांची प्रकृति बिघडल्यामुळें ते जातनासे झाले होते.

"या वासुकाका, बरेच दिवसांनीं आलांत." व्यवस्थापक बाईनीं विचारलें.

"कामाला आलों आहें." असें म्हणून वासुकाकांनीं सारी हकीगत सांगितली.

"काशिबाईची करूं सोय. दोनचार मुलींचीं धुणीं मिळतील. स्वयंपाकघरांतही भाज्या चिरणें, निवडणें, काम देऊं. हरकत नाहीं. अशा भगिनींची नाहीं सोय लावायची तर कोणाची हो लावायची!"

वासुकाका आनंदानें घरीं आले. त्यांनीं काशीताईला सारें सांगितलें.

मग एके दिवशीं काशीताई सेवासदनांत राहायला गेल्या. त्यांचें सामान वासुकाकांच्या घरीं ठेवण्यांत आलें. रंगा त्यांच्याकडेच राहिला.

काशीताईंना प्रथम जरा जड गेलें. कारण कोणाची ओळख नाहीं. परंतु पुढें त्यांना समाधान वाटूं लागलें. त्या सारें काम नीटनेटकें करीत. पालेभाजी धुऊन चिरीत, लिंबाच्या फोडी कापायच्या झाल्या तर सारख्या कापीत. रस जमीनीवर पडूं नये म्हणून खालीं वाटी ठेवीत. तो रस चटणींत वगैरे ओतीत. मधल्या वेळीं बारा ते दोन त्या शिकत.

अशाच एके दिवशीं काशीताई नयनाच्या खोलींत बसल्या होत्या. त्यांच्या हातांत एक चित्र होतें. इतक्यांत नयना आली.

"कुणाचें हें चित्र? कुणी काढलें?" तिनें विचारलें.

"रंगानें."

"तुमचा तो रंगा?"

" हो."

" किती छान चित्र आहे, खरेंच किती छान ! मला नाहीं असें येणार. मला चित्रकलेचा नाद आहे. मी बाबांना म्हणत असतें मी मोठी चित्रकार होईन. जगांतील चित्रशाळा बघून येईन. खरेंच किती सुंदर हे रंग ! रंगाचीं आणखी चित्रें आणाल ? तो कोणते ब्रश वापरतो हो ?"

" मला काय माहीत ? रविवारीं माझ्याबरोबर याल ना तेव्हां पाहा."

" हो. बाईंना विचारून जाऊंच आपण. रंगाचीं चित्रें बघेन मी."

असा दोघींचा संकेत ठरला. ● ● ●

## ताटातूट : : : ४

" पंढरी, तूं पुढें काय करणार ?"

" रंगा, मला कांहींच करावेंसें वाटत नाहीं. मी या जगांत एकटा आहें. कुणासाठीं शिकूं ? माझ्यामुळें कुणाला आनंद होणार आहे ? जाईन मिलिटरींत. युद्ध आलें नि आमच्या कचेरीवर पडले बॉंब कीं खेळ खलास होईल."

" असें कां बरें म्हणतोस ? तुझें माझ्यावर प्रेम नाहीं ?"

" रंगा, आज आपण इथें आहोंत. उद्यां आपण कुठें असूं ? कशाला हीं प्रेमें, या मैत्री ? उद्यां आठवणी येऊन रडूं यायचें."

" बरें, आज आपण टिळक तलावांत पोहायला जायचें. येशील ?"

" हो. पोहायला मला आवडतें."

ते दोघे मित्र दुपारीं पोहायला गेले. सुटी होती. दोघांनीं उड्या मारल्या. एकमेकांना पकडीत होते, खेळत होते. जणूं निर्मळ मैत्रीच्या गंगेंत बुडत होते, वर येत होते.

" इथेंच आपण मेलों तर रंगा ?" पंढरी म्हणाला.

" वेडा आहेस तूं." रंगा त्याला म्हणाला.

" तुझी आई आहे. ती रडेल. मी विसरूनच गेलों."

" मरण्याचे विचार नकोत. चल पुन्हा सूर मारूं."

" मी आतां दमलों आहें."

" तर चल घरीं जाऊं."

दोघे मित्र बाहेर आले. पंढरी रंगाच्या घरीं आला. सुनंदाताईनीं दोघांना खायला दिलें. रंगानें आपलीं चित्रें पंढरीला दाखविलीं.

पण तिथेंही पंढरीचें मन कांहीं केल्या रमेना.

" रंगा, मी जातों. नाहीं तर घरीं बोलणीं खावीं लागतील."

" आई येईपर्यंत थांब."

" नको, जातों."

" थांब रे. माझ्यासाठीं घरचीं बोलणीं सहन कर."

" मायलेंकरांच्या भेटींत आमची अडगळ कशाला ?"

" माझ्या आईला तूंही आवडतोस."

" त्यांनीं मला खायला पोळी दिली नि त्यांना शिव्या खाव्या लागल्या."

" आई, त्या शिव्यांना आशीर्वाद मानी."

" थोर आहे तुझी आई."

" तुझी कशी होती ?"

" मला आठवत नाहीं. मी लहान असतांनाच आई वडील देवाघरीं गेलीं. अरे स्वतःच्या मुलांचें कोणतीही आई चांगलेंच करील. परंतु दुसऱ्यांच्या मुलांचेंही करील ती खरी माता. तुझी आई खरी माता आहे. तिची वत्सलता सर्वांसाठीं आहे. बरें, मी जातों रंगा."

पंढरी निघून गेला. वाड्याच्या दरवाजांत रंगा उभा होता. तो आईची वाट बघत होता. त्याला आई दिसली. तो धांवला. परंतु आज आई एकटी नव्हती.

" रंगा, ही नयना तुझीं चित्रें बघायला आली आहे. माझ्या हातांत बाळ, तुझें चित्र होतें. हिनें तें पाहिलें. तिला आवडलें. तीही चित्रकार आहे."

मग सारीं घरीं आलीं. रंगानें आपली चित्रशाला नयनाला दाखविली. नयना बघत होती. तिला तीं चित्रें फार आवडलीं.

नंतर रंगाच्या आग्रहावरून नयनानें पिशवींतून आपलीं चित्रें काढलीं. रंगा तीं पाहात होता.

" छान आहेत." तो म्हणाला.

सुनंदानें काशीताई, नयना, सर्वांना खायला दिलें. रंगाच्या पाठीवरून हात फिरवून आई निघाली.

" जातें मी रंगा !" नयना म्हणाली.

" आईबरोबर येत जा."

" अच्छा."

असे दिवस जात होते. रंगाची सर्वांगीण प्रगति होती. तोंच एक वादळ आलें. उन्हाळ्याची सुटी लागणार होती. आजपासून शाळा बंद व्हायच्या होत्या. रंगा पास झाला होता. वासुकाका सुटींत त्याला महाबळेश्वरला नेणार होते. असे किती बेत होते. परंतु तें सारें स्वप्न ठरायचें होतें.

वासुकाकांना शाळेच्या चालकांनीं कचेरींत बोलावून त्यांच्या हातीं एक लिफाफा दिला. काय होतें त्यांत ? पुढील वर्षापासून तुमची नोकरी नको, असें त्यांत होतें.

" माझी काय चूक झाली ? " वासुकाकांनीं विचारलें.

" तुम्ही अभ्यासाव्यतिरिक्त इतर शिकवतां. समाजवाद शिकवतां, इतर अनेक गोष्टी सांगतां. आम्ही धर्मनिष्ठ लोक. आमचीं मतें तुम्हांला माहीत आहेत." चालक म्हणाले.

" धर्म म्हणजे का अस्पृश्यता ? धर्म म्हणजे आम्ही तेवढे सज्जन, बाकी सारे दुर्जन, असें म्हणणें ? धर्म म्हणजे का मानवतेला तिलांजली, उदार भावना फेंकून देणें ? धर्म जोडीत असतो; तोडीत नसतो. धर्माचा खरा आत्मा सर्वांची धारणा नीट होण्यांत आहे. खरा धर्म सर्वांचे संसार सुंदर होण्यासाठीं झटेल. समाजवाद तुमच्या रूढीधर्माला मानीत नाहीं. अमुक जात श्रेष्ठ, अमुक मानववंश श्रेष्ठ असें मानीत नाहीं. मानव्याचा खरा धर्म समाजवाद मानतो. ईश्वर मानून मानवांचा संहार करण्यापेक्षां त्याला न मानणारा परंतु मानवांना जवळ घेणारा तोच खरा धार्मिक आहे."

" मला तुमच्याशीं वाद करायचा नाहीं. पण या शाळेंत तुम्ही नको."

" ठीक. तुम्हांला सद्बुद्धि सुचो. लहान मुलांचीं मनें द्वेषानें भरू नका. तीं निर्मळ मनें घाणीनें बरबटवूं नका. तें भयंकर पाप आहे." असें सांगून वासुकाका बाहेर पडले. शिक्षकांच्या बैठकींत चर्चा चालली. मुलांत कुणकुण गेली. कांहीं मुलें म्हणालीं, ' आपण त्यांना निरोप देऊं.'

परंतु त्यांना परवानगी मिळाली नाहीं. शाळा सुटली. वासुकाकांनीं सर्व शिक्षकांचा, चालकांचा निरोप घेतला. मुलांची त्यांच्याभोंवतीं गर्दी उसळली.

" आतां आम्हांला हरिजन कोण वाचून दाखवील ? "

" लेनिनच्या गोष्टी कोण सांगेल ? "

" सुंदर चित्रें आणून कोण दाखवील ? "

" खरा इतिहास कोण शिकवील ? "

मुलें म्हणत होतीं. तोंच तिकडून शाळेचे चालक आले. त्यांच्या तोंडावर संताप होता. वासुकाकांविषयींचें तें मुलांचें प्रेम पाहून त्यांना मत्सर वाटला.

ते म्हणाले, " जा रे घरीं. इथें काय आहे ? निघा."

" शेवटचे दोन शब्द मला त्यांना सांगूं दे." वासुकाका म्हणाले.

" इथें शाळेंत नको."

" सांगा, सांगा." मुलें गर्जलीं.

" मी त्यांना दोन शब्द सांगणार आहें. तुम्हांला करायचें असेल तें करा. वाटेल तर पोलीस बोलवा." असें म्हणून वासुकाकांनीं शेवटचे चार शब्द मुलांना सांगितले.

" प्रिय विद्यार्थ्यांनो, तुमच्या प्रेमानें मला निर्भय केलें आहे. शाळाचालकांनीं मला क्षमा करावी. मुलांनो, मी दुसऱ्या कोठल्या तरी शाळेंत जाईन. इथें तुम्हांला देत असे तें नवीन मुलांना देईन. तिथूनही कदाचित् मला हांकलतील. कारण आजकाल शिक्षणसंस्था जात्यंधतेचे अड्डे बनत आहेत. तुम्हां सर्वांना संकुचित, द्वेषी, मत्सरी बनवण्याचे प्रयत्न सर्वत्र होत आहेत. तुम्ही हें विष पचवून मृत्युंजय बना. राष्ट्राला प्रेमाचें अमृत द्या. सारे धर्म, जाति एकत्र नांदवायचा प्रयोग आपणांस करायचा आहे. भेदांत अभेद पाहायचा आहे. तुम्ही विचारानें, भावनेनें मोठे होत जा. सुखी होण्याचा एकच मार्ग आहेः उत्तरोत्तर वाढत जाणें, नवीन नवीन शिकणें, नवीन नवीन मैत्री जोडणें. तुम्हीं उर्दूही शिका. ती लिपी शिका. ईजिप्तपासून जावापर्यंतच्या अनेक देशांत तीच लिपी आहे. ह्या देशांशीं उद्यां स्वतंत्र झाल्यावर तुम्हांला संबंध जोडावे लागतील... इंग्रजी शिकण्यांत जसें पाप नाहीं तसें शेजारच्या भावांची, शेजारच्या देशांची भाषा शिकणें पाप नाहीं. त्यांच्या भाषा शिकणें हा शेजारधर्म आहे. कोणी चिनी शिका. रशियन शिका. उत्तरोत्तर पुढें जा. नवभारत तुम्हांला निर्मायचा आहे. मोठी जबाबदारी तुमच्यावर आहे. मी तुम्हांला किती सांगूं ? थोडी तों गोडी."

त्यांचा आवाज सकंप झाला. एका मुलानें केव्हां हार आणला जाऊन कोणास कळे ? त्यानें तो हार घातला. वासुकाका मुलांजवळ बोलत शाळेबाहेर पडले.

" बेशिस्त मनुष्या ! " संतापानें चालक ओरडले व निघून गेले. वासुकाका घरीं आले. रंगा, सुनंदा त्यांची वाट पाहात होतीं.

" काका, उशीरसा ?" रंगानें विचारलें.

" रंगा, आतां दुसरी नोकरी शोधायला हवी. मला शाळेंतून काढून टाकलें."

" आतां ?"

" आतां अर्ज लिहीत बसायचें. महाबळेश्वर आतां इथेंच. सुटीचा पगारही आतां मिळणार नाहीं."

" त्यांत माझा पुन्हां भार !"

" बाळ, तुझा का आम्हांला भार आहे ? काळजी नको करूं. कुठें तरी नोकरी मिळेल. नाहींतर वर्ग चालवीन. मला सारे विषय येतात. पुस्तकें लिहीन."

काशीताईही आतां घरीं आली होती. सुनंदा, काशीताई, वासुकाका, रंगा अशीं चौघें आनंदांत होतीं. रंगा चित्रें काढी, कधीं वाची, कधीं पंढरीबरोबर फिरायला जाई. वासुकाका पुस्तक लिहीत, कोठें अर्ज करीत. अखेर एकदांचें एका अर्जाला यश आलें.

" रंगा, अरे दुधगांवचें बोलावणें आलें आहे." वासुकाका म्हणाले.

" दुधगांव ?"

" हो. तिथें नुकतीच गिरणी झाली आहे. वाढतें आहे शहर. तिथें इंग्रजी शाळा आहे. या म्हणतात. जायचें का तिथें ? तेथील हवा सुंदर आहे म्हणतात. एका नदीचा धबधबा तिंथें पडतो, म्हणून दुधगांव."

रंगा म्हणाला, " तिथें सुंदर निसर्ग असेल. धबधबा मी बघेन. त्याचें चित्र काढीन."

" तूं का त्यांच्याबरोबर जाणार रंगा ?" आईनें विचारलें.

" तर काशीताई, तो कुठें राहणार ? तो माझ्याजवळच असूंदे. तुम्ही सेवा-सदनांत रहा. सुटींत घरीं या. रंगाची चिंता नका करूं. मला त्याचें ओझें नाहीं. त्याच्या गुणांचा विकास करणें हा माझा आनंद आहे. रंगा देशाचें नांव करील. तो मोठा कलावान् होईल. त्याच्या बोटांत अपूर्व देणगी आहे."

" तुम्हीच त्याचे खरे मायबाप." आई डोळ्यांत पाणी आणून म्हणाली.

बांधाबांध झाली. आवराआवर झाली. कांहीं सामान पुढें पाठवण्यांत आलें. कांहीं जुनें सामान मोलकरणीला देण्यांत आलें. जायचा दिवस उजाडला.

" रंगा, जपून राहा. काकांचें ऐकत जा. आईला पत्र पाठवित जा. माझी काळजी नको करूं." काशीताई त्याला जवळ घेऊन सांगत होती. तिनें लोंकरीचा एक उबदा विणला होता. तो त्याला तिनें जातांना दिला.

स्टेशनावर सारीं आलीं. गाडी तयारच होती. काशीताई खालीं फलाटावर उभी होती.

" जपा सारीं." ती म्हणली.

" रंगाची काळजी नका करूं." वासुकाका म्हणाले.

" सुटींत या. आणि अगोदर तुम्ही स्वतःची काळजी घ्या." सुनंदा म्हणाली.

शिट्टी झाली. गाडी हळुहळू निघाली आणि हळूहळू अश्रूही बाहेर पडले. रंगा आईकडे बघत होता. आईला वर बघवेना. गेली गाडी. आतां मात्र रंगाला रडूं आलें. त्याला हुंदका आला. ●●●

## आई गेली : : : ५

**रंगाला** दुधगांव आवडलें. नदीकांठचा देखावा नयनमनोहर असे. आजुबाजूला वृक्षाच्छादित टेंकड्या होत्या. त्या जंगलांत मोर होते, वानर होते. रंगा कधीं कधीं एकटाच वनराजींत जाई आणि वनदेवतेचा जणुं बाळ होऊन तिथें बसे. त्याला कधीं भय वाटत नसे. तो नदीच्या डोहांत पोहायचा. त्याला त्या वेळीं पंढरीची आठवण येई.

शाळेंत तो सर्वांचा आवडता झाला. चित्रकलेचे शिक्षक त्याच्यावर प्रेम करीत. एकदां शाळेंत हस्तकौशल्याचें प्रदर्शन होतें. मांडामांड करायला रंगानें मदत केली. प्रदर्शन बघायला गांवांतील बरीच मंडळी आली. रूपचंद म्हणून एक कलाप्रेमी सुखवस्तु मनुष्य गांवांत होता. त्याला रंगाचीं चित्रें फार आवडलीं. या चित्रांना त्यानें एक सुवर्णपदक दिलें. मोठ्या समारंभानें रूपचंदांच्या हस्तेंच रंगाला तें देण्यांत आलें. चित्रकलेच्या शेवटच्या परीक्षेला तो बसला नि पहिला आला. त्याला अनेक बक्षिसें मिळालीं. आई दिवाळींत आली नाहीं. रंगाच्या आईला नयना आपल्या घरीं घेऊन गेली. काशीताईला तिनें सज्जनगड, माहुली, मेरुलिंग, धावडशी, सारें दाखविलें.

" रंगाला हें सारें पाहून किती आनंद झाला असता ?" काशीताई म्हणाली.

सुटी संपली. नयना नि काशीताई आज पुण्याला जाणार होत्या. नयनाच्या वडिलांनीं काशीताईंना एक सुंदर पातळ घेऊन दिलें. त्यांना नाकारवेना. नयनाचें मन कसें दुखवायचें ?

सेवासदन सुटीनंतर पुन्हा सुरू झालें. एके दिवशीं रंगानें आईकडे बक्षीस मिळालेलें सुवर्णपदक पाठविलें. आईला जेव्हां तें आलें तेव्हां धन्यता वाटली.

" नयना, छान आहे नाहीं पदक ? " काशीताई म्हणाली.

नयना तें पदक घेऊनच बसली.

काशीताई कामाला निघून गेली. नयना तें पदक बघत होती. ती तें मनगटावर बांधी, दंडाला बांधी. कपाळावर पिंपळपानाप्रमाणें धरी, तर गोफांत ओंवून गळ्यांत घाली. ती उठली. तिनें ट्रंकेंतून रंगाच्या हातचीं चित्रें काढलीं. त्या चित्रांकडे ती बघत बसली. त्या चित्रांच्या शेजारीं तिनें स्वतःचीं चित्रें मांडलीं.

" रद्दी चित्रें, भिकार." असें म्हणून स्वतःचीं चित्रें तिनें फाडून फेंकलीं. ती तिथें डोळे मिटून बसली.

एके दिवशीं रंगाचें सुंदर पत्र आईला आलें.

प्रिय आई,

तुझी किती आठवण येते ! तूं दिवाळींत नाहीं आलीस. आतां उन्हाळ्यांत येशील ? का ती नयना तुला पुन्हा नेणार आहे ? नयना असें करील तर माझ्या डोळ्यांत खुपूं लागेल ती.

परवां आम्ही वनभोजनाला गेलों होतों. दाट झाडींत आम्ही होतों. आम्हीं मोर पाहिले. कसे ते छान ओरडत. तूं असतीस तर ! त्या नयनालाही ही जागा आवडली असती.

काल काकूनें तुझी आठवण काढली होती. माठाची भाजी होती. कोरडी. तुला ती फार आवडते. आई, आपण उन्हाळ्याच्या सुटींत भेटूं हं ? तूं काळजी नको करूं. काका–काकू आहेत तोंवर रंगा सुखी आहे. आणि तुझा आशीर्वाद नेहमीं जवळच आहे. नयनाला नमस्कार. माझें पदक तिथेंच असूं दे.

तुझा आवडता,

**रंगा**

• • •

" छान लिहितो रंगा पत्र." नयना वाचून म्हणाली.

" काका त्याला शिकवतात." काशीताई म्हणाली.

" आणि काशीताई, लिहितो कसा कीं–नयना डोळ्यांत खुपेल ! मी खुपेन का हो कुणाच्या तरी डोळ्यांत ? मी का दगड धोंडा आहें, कुसळमुसळ आहें खुपायला."

" अग त्यानें गंमत केली, तुझें नांव नयना ना ? त्या शब्दावर त्यानें खेळ केला. लबाड आहे तो. त्याला खोड्या करायला हव्यात."

एके दिवशीं वाढतां वाढतां काशीताईला घेरी आली. हातांतील पोळयांचें ताट पडलें. कोण धांवाधांव ! तिला उचलून नेण्यांत आलें. नयनानें तिला आपल्या खाटेवर गादीवर निजविलें. डॉक्टर आले. काशीताईला शुद्ध येईना. बराच वेळ झाला. काय करणार ?

" मेंदूतील रक्तस्राव कारण आहे. अति काळजीमुळें झालें असावें. आम्हांला आशा नाहीं." तज्ज्ञ डॉक्टरांनीं सांगितलें.

नयनानें दुधगांवला तार दिली. रंगाला घेऊन वासुकाका निघाले. परंतु ते येण्यापूर्वींच आईचे प्राण निघून गेले होते. नयनानें रंगाचा फोटो आईच्या हृदयाशीं ठेवला होता.

वासुकाका नि रंगा आले. तों सारें घर शून्य होतें. रंगा आईच्या शांत अचेतन देहाजवळ बसला.

" आई ! " दोनच अक्षरें त्यानें उच्चारिलीं. आणि आईच्या चरणांवर त्यानें डोकें ठेवलें.

वासुकाकांचे स्नेही आले. इतर मंडळी आली. वासुकाकांनींच अग्नि दिला. रंगाला त्यांनीं बरोबर नेलें नाहीं. ते म्हणाले, ' तो चितेंतही उडी घेईल.'

नयना नि रंगा दोघें घरांत बसलीं होतीं.

" नयना, आईची सेवा तूं केलीस. तूं भाग्याची. मी कपाळकरंटा. आईला सुख देईन म्हणून माझी आशा. तीं सारीं स्वप्नें संपलीं, भंगलीं."

" रडूं नको, रंगा ! आईनें एकदां तुझी आठवण केली. रंगा असें म्हणाली. मीं म्हटलें—काशीताई, रंगाची काळजी नका करूं. मीं तुझा फोटो त्यांच्या हातांत दिला. त्या हातांना का कळलें ? त्या हातांना का डोळे होते ? पण त्या निर्जीव होत जाणाऱ्या हातांनीं तो फोटो घट्ट धरला. पकड सुटेना. मीं तो हळूच हृदयाशीं ठेवला. उगी रंगा ! तुझ्या आईचे हाल नाहीं झाले. मीं माझ्या गादीवर निजविली. डॉक्टर किती आले होते. परंतु उपाय चालेना. काय करणार आपण ? माझी आई लहानपणींच गेली. तुला आतांपर्यंत तरी देवानें दिली."

" पण तुझे बाबा आहेत." तो म्हणाला.

" तुलाही थोर वासुकाका मिळाले आहेत." ती म्हणाली.

तोंच रंगाचा मित्र पंढरी आला. दोघे मित्र भेटले. रंगाला रडूं आवरेना.

" रंगा, उगी. अरे मी लहानपणापासून पोरका आहें. माझ्याकडे बघ रंगा! आणि डोळे पूस. चल. आपण बाहेर जाऊं." पंढरी म्हणाला.

पंढरी रंगाला घेऊन गेला. कुठें गेले दोघे? पर्वतीच्या बाजूला जाऊन कालव्याच्या कांठीं बसले. बोलणें बंद होतें. मधूनमधून रंगाचे डोळे पुन्हा पुन्हा भरून येत.

" रंगा, तूं यंदा मॅट्रिक होशील. पुढें?" पंढरीनें विचारलें.

" मग मुंबईला कलाभवनांत जाईन. काका म्हणाले मी पैसे देईन. पुढें ते मला विश्वभारतींतही पाठवणार आहेत. तिथें नंदलालांच्या पायांजवळ बसून धडे घेईन. कलेच्या अंतरंगांत शिरेन. कलेच्या आत्म्याची भेट घेईन."

" मी मिलटरींत जाईन. तिथेंच हिशेब करीत बसेन. मुंबईला आलास तर मी भेटेन. एखादे वेळीं पेशावरकडेही मला पाठवायचे. काय नेम? मला साऱ्या जागा सारख्याच. माझें प्रेमाचें कोण आहे? मी दूर गेलों काय, मेलों काय, कोण रडणार आहे?"

" रंगा रडेल."

" तुला मी पत्र पाठवीन. भारतमातेचा मी पुत्र; जिथें जाईन तिथें माझें घर, तिथें माझे भाऊ. देवानें मला मोठें केलें आहे. मला १६०० मैल लांब रुंद घर दिलें आहे. कोट्यवधि माझीं भावंडें. लाखों माझे मायबाप."

" तूं कवि होऊन जणूं बोलत आहेस."

" तूं चित्रकार, मी कवि."

" आपण एकमेकांना शोभतों. आपण दोघेही पोरके. दोघेही भारतमातेचे."

" तूं अजून तेवढा बंधमुक्त नाहींस. काका काकू आहेत आणि नयना आहे."

" आईचें सारें तिनेंच केलें."

" ती थोर मुलगी आहे. एकदां मला रस्त्यांत भेटली नि म्हणाली, रंगा तुमचा मित्र ना? त्यांचें पत्र येतें का? तिनें माझ्याकडे करुणेनें पाहिलें नि ती गेली. जहागिरदाराची मुलगी, परंतु ऐट नाहीं. बरें, तूं आतां जाणार. आतां केव्हां भेटशील?"

" काय सांगूं पंढरी? आई अकस्मात गेली. या जगांत कशाचा भरंवसा नाहीं."

" असलें दळभद्रें नको बोलूं. आशेनें रहा, भारतासाठीं जग. भारताची कीर्ति तुझ्या कुंचल्यांनीं दिगंतांत ने. चल ऊठ. रंगा, ऊठ डोळे पूस. हंस जरासा. चल. मी स्टेशनवर तुला पोंचवायला येईन."

दोघे मित्र उठून घरच्या वाटेला लागले. • • •

## रंगाचें आजारीपण : : ६

रंगाला घेऊन वासुकाका दुधगांवला आले. त्यांना व सुनंदालाही रंगाबद्दल फार वाईट वाटे. त्याला आतां कोण होतें ? आई ना बाप, बहीण ना भाऊ. मामा होता, तो असून नसल्यासारखा. रंगावर तीं दोघें अधिकच माया ममता दाखवूं लागलीं. वासुकाका रंगाच्या गुणांची नीट वाढ व्हावी म्हणून शत प्रयत्न करीत. ते सुंदर सुंदर मासिकें बोलवीत. चित्रांचे संग्रह मागवीत. रंगासाठीं सारें. ते त्याला चित्रकलेंतील निरनिराळ्या संप्रदायांचीं वैशिष्ट्यें सांगत. रजपूत कला, बंगाली कला, मोगल कला, प्राचीन अजिंठा कला, सर्वांमधील साम्य आणि विरोध दोन्ही दाखवीत. त्या त्या कलांच्या पाठीमागचा हेतु सांगत. रंगाला आनंद होई. त्याला जणूं नवीन डोळे आले. त्या त्या सांप्रदायिक चित्रांकडे तो आतां रसिकतेनें पाहूं लागला. वासुकाकांच्या चरणांजवळ बसावें नि शिकावें असें त्याला सारखें वाटे. त्याला कशाचा आतां तोटा नव्हता. रंग, ब्रश, सारें साहित्य भरपूर असे.

परंतु काय असेल तें असो. वासुकाका मात्र पूर्वीप्रमाणें तितके आनंदी नसत. रंगा जवळ असला म्हणजे त्यांची कळी फुललेली दिसे. परंतु एरव्हीं एकटे असले कीं ते विचारमग्न असत. क्वचित त्यांच्या डोळ्यांतून अश्रुहि घळघळत.

एके दिवशीं ते खोलींत एकटेच होते. इतक्यांत सुनंदा कशाला तरी आंत आली. तिनें तें गंभीर दृश्य पाहिलें. ती अवाक् तिथें उभी होती. शेवटीं जवळ येऊन ती म्हणाली, “ तुम्ही अलिकडे तितके आनंदी नसतां. कां बरें ? रंगाची आई गेली म्हणून ? परंतु त्या गोष्टी का कुणाच्या हातच्या आहेत ? आपण रंगाला सांभाळीत आहोंतच. तो आपल्याला मुलासारखाच आहे. तो आतां परका नाहीं.”

“ हें बघ, आपण कितीही प्रेम दिलें तरी आईच्या प्रेमाची का सर येणार आहे ? रंगाला आपण इकडे आणलें हें त्याच्या आईला सहन झालें नसावें. मींच त्याला इकडे नको होतें आणायला. तिकडेच त्याला पैसे पाठवले असते तर तो आईला मधून मधून भेटता. राहून राहून माझ्या मनांत हे असे विचार येतात. आपण मोठें पाप केलें, मायलेंकरांच्या कायमच्या ताटातुटीला आपण कारणीभूत झालों असें वाटून डोळे शेवटीं भरून येतात.”

“ तुम्ही असें कांहीं मनांत आणूं नका. रंगाचें आपण सारें चांगलें करूं याची काशीताईना खात्री होती. त्या दिवाळीच्या सुटींत नयनाकडे गेल्या. मुलाची इतकी आर्त ओढ रात्रंदिवस असती, तर त्या इकडे नसत्या का धांवत आल्या ?

त्यांना माहीत होतें कीं रंगा सुखांत आहे. त्या निश्चित होत्या. उगीचच मनाला लावून घेतां तुम्ही."

इतक्यांत रंगाच आंत आला.

"ये रंगा. बैस. कुठें गेला होतास?" वासुकाकांनीं विचारलें.

"वाचनालयांत गेलों होतों. काका, आज मला बरें नाहीं वाटत. कांहीं तरी होतं आहे."

वासुकाकांनीं त्याच्या अंगाला हात लावून पाहिलें. कढत होतें अंग. ते चपापले. रंगाचे डोळेही जरा लाल दिसत होते. तो तप्त दिसत होता.

"रंगा, बाळ तुला ताप आला आहे. चल नीज. आंथरुणावर पडून रहा. थंडी वाजली का?"

"दोन दिवस मला कणकण वाटे. परंतु म्हटलें थांबेल. आज मात्र हातपाय गळून गेल्यासारखें वाटतें. वाचनालयांत मी बसूं शकलों नाहीं."

सुनंदानें आंथरुण नीट केलें. रंगा जाऊन झोंपला. मच्छरदाणी लावण्यांत आली. वासुकाकांनीं तापनळी लावून ताप पाहिला. ताप १०२ डिग्री होता.

वासुकाका रंगाजवळ बसून होते. त्याच्या डोक्यावर त्यांनीं कोलन वॉटरची घडी ठेवली. ते त्याचें मधून मधून अंगही चेपीत, पाय चुरीत. मधेंच त्याच्या तप्त मस्तकावर आपला वत्सल हात ठेवीत. रंगा डोळे मिटून पडून होता.

असे दहा वाजून गेले.

डॉक्टरला आणण्याची व्यवस्था करून वासुकाका शाळेंत गेले. डॉक्टर येऊन पाहून गेले. औषध दिलें.

मधल्या सुटींत वासुकाका सायकलीवरून येऊन पाहून गेले. रंगाचा ताप कमी नव्हता. तो दोषी ताप होता. चौदा दिवस झाले. एकवीस दिवस झाले. पण ताप हटेना. रंगा थकला. त्याची शुद्ध गेली. वात झाला. वातांत तो बडबडूं लागला.

"आई, तूं चिंता नको करूं. मी सुखी आहें. मी नाहीं येणार. मला शिकायचें आहे. खरें ना वासुकाका? मी चित्रकार होईन. मी भारताचें नांव करीन. अमेरिका माझीं चित्रें खरेदी करील. आई, मी तुला श्रीमंत करीन. तुझ्या रंगाच्या एकेका चित्राला लाख लाख रुपये मिळतील. हंसूं नको आई. मी स्वप्नांत नाहीं कांहीं. चांगला जागा आहें मी. मी वातांत नाहीं. शुद्धींत आहें. नयना, खरें कीं नाहीं? नयना, बोल ना? आईची सेवा करणारी नयना. काका, आपण महाबळेश्वरीं जायचें ना? यंदा जाऊंच. पंढरी, ये ना रे! पंढरी,

जेवलास कीं उपाशी ? तूं मिलिटरींत जाणार का ? तुझ्या हातांत बंदुक; माझ्या हातांत ब्रश. मी ब्रशानें क्रान्ति करणारा, तूं मिलिटरींत जाऊन क्रान्ति कर. पंढरी, हंसूं नको. अरे तुम्ही शिपायीही पुन्हा बंड करून उठाल. १८५७ पुन्हा होईल. १९५७ च्या आंत इंग्रज जातीलच जातील. १८४८ मध्यें यांनीं सातारची गादी खालसा केली. पाप केलें गोर्‍यांनीं. त्यांना १९४८ साल हिंदुस्थानांत दिसणार नाहीं. काका, केव्हां हो हे इंग्रज जातील ? आतां पुन्हा स्वातंत्र्याचा लढा आला तर मी जाईन हो लढ्यांत. तुम्हीं मला तीस सालीं जाऊं दिलें नाहीं. आतां नाहीं मी ऐकणार. मी जाणार, जाणार...."

असें म्हणून तो ताडकन् उठे. सुनंदा, वासुकाका यांना तो आवरतां आवरत नसे. रंगाला त्या तापांत जणुं स्फुरण चढे. त्याच्या बुद्धीला जणुं पल्लव फुटत. मधेंच तो कविता रचून म्हणे. मधेंच हंसे, मधेंच बोले, उठे. एखादे वेळीं शान्त पांखराप्रमाणें निपचित पडून राही.

एके दिवशीं वासुकाका एकटेच रंगाजवळ होते. ते जणुं भावमग्न होते. त्यांचे डोळे मिटलेले होते. रंगाचा हात त्यांच्या हातांत होता. त्यांचे डोळे पाणवले होते.

"प्रभो, या बाळाला वांचव. तूं त्याला अमोल देणगी देऊन पाठविलें आहेस. माझें आयुष्य या बाळाला दे. मी काय सांगूं प्रभो तुला. तूं सर्वज्ञ आहेस. तुला का आम्हीं सांगायचें ? तुला का कळत नाहीं ? आम्ही वेडीं माणसें." असें ते म्हणत होते. त्यांचे डोळे मिटलेले होते. रंगानें आतां डोळे उघडले होते. तो एकाग्र दृष्टीनें काकांकडे बघत होता. आणि एकदम तो उठला. त्यानें काकांना मिठी मारली.

"काका, रडूं नका. मी बरा होईन."

"अरे, असें उठूं नये एकदम. रंगा, नीज बाळ ! पडून राहा. असें उठूं नये."

"मी बरा होईन. आई मला म्हणाली तूं बरा होशील. 'रहा काका—काकू-जवळ. सुखी हो' असें म्हणाली. मला आई भेटली, बोलली. आतां मी बरा होईन."

"रंगा, किती रे बोलशील ? तूं अशक्त झाला आहेस. तापांत हृदय दुबळें होतें. असें उठूं नये, फार बोलूं नये." वासुकाका म्हणाले.

बेचाळीस दिवसांनंतर रंगाचा ताप निघाला. हळुहळूं त्याला बरें वाटूं लागलें.

परंतु दोन महिने चालवत नव्हतें. सुनंदा त्याचा हात धरून त्याला चालवी. कधीं वासुकाका चालवीत.

"तूं आमचाच बाळ. तुझी आई तुला आमच्या पदरांत घालून, आम्हांला देऊन गेली. वाटलें ती माउली देणगी परत नेते कीं काय ? परंतु या देणगीला आम्ही पात्र ठरलों. खरें ना रंगा ? आतां लौकर चांगला हो." वासुकाका प्रेमानें म्हणत.

• • •

## मुंबईला : : : ७

रंगाचें एक वर्ष फुकट गेलें. परंतु प्रकृति चांगली झाली. मॅट्रिक होऊन तो मुंबईला चित्रकलेचें शिक्षण घ्यायला गेला. तीनचार विद्यार्थी मिळून एका चाळींत एक जागा त्यांनीं घेतली होती. लहान लहान दोन खोल्या होत्या. इतर विद्यार्थी खानावळींत जात. परंतु रंगा हातानेंच स्वयंपाक करी. खानावळीचें अन्न त्याला आवडत नसे. शिवाय खर्च कमी यावा म्हणूनही तो जपे. वासुकाकांवर बोजा घालायचा तरी किती, असें त्याच्या मनांत येई.

एक दोन वर्षें गेलीं. रंगा आतां चित्रकलेच्या तिसऱ्या वर्षाला होता. तो घरांत रंगवीत बसे. शेजारची लिली त्याच्या खोलींत यायची. रंगाला तिचें वेड. दोन तीन वर्षांची मुलगी. रंगा रंगा करीत यायची. रंगा तिला चित्रें द्यायचा; तिला स्टुलावर बसवून तिचें चित्र काढायचा.

"ओ हो ! माझें चित्र. आई, हें बघ माझें चित्र." असें म्हणत ती नाचायची.

लिली मोठी गोड मुलगी होती. रंगाला कधीं वेळ असला म्हणजे तो तिला समुद्रावर फिरायला नेई. तिला समुद्राच्या लाटांत नेई. तिच्याबरोबर तो शिंपले गोळा करी, तिला वाळूंत किल्ले बांधून देई, बोगदे खणून देई. आणि त्यांच्याकडे बघत बघत लिली एकदम ओरडून त्यांच्यावर लाथ मारी नि सारें पाडी.

"लिले, हें ग काय ?" रंगानें विचारावें.

"वाळूंतले किल्ले वाळूंत गेले. आतां पुन्हा बांध. मोडले म्हणजे पुन्हा बांधतां येतात, नाहीं भाऊ ?" लिलीनें बोबडें बोलावें.

तिच्या बोबड्या बोलण्याचें रंगाला कौतुक वाटे. तो तिला एकदम उचलून घेई नि तिचा पापा घेई.

" तूं चांगला आहेस. मी घेऊं तुझा पापा ?" असें म्हणून तीही चिमुरडी पोर रंगाचा पापा घेई नि त्याचा हळूच चावा काढी.

लिलीची आई रंगाला कधीं भाजी द्यायची, चटणी द्यायची. या मुलांचें, या तरुणांचें तिला कौतुक वाटे.

असे दिवस जात होते. तोंच एके दिवशीं रंगाला पत्र आलें. कुणाचें पत्र ? तें पंढरीचें प्रेमळ पत्र होतें. तो पुण्याला मिलिटरी हिशेब खात्यांत मागेंच नोकरीला लागला होता. त्याची बदली एकदम पेशावरकडे झाली होती. तो लांब जाणार होता. मुंबईला येऊनच पुढें जायचें. तो रंगाकडे उतारणार होता.

" लिलीच्या आई, मला तुमचा पाटावरवंटा रात्रीं देऊन ठेवा बरें का." रंगा म्हणाला.

" कशाला रे भाऊ ?"

" मोठा बेत आहे. उद्यां लिलीला माझ्याकडे आमंत्रण आहे."

" पुरणपोळी करणार आहेस वाटतें ?"

" हो, पंढरीला फार आवडते. तो येणार आहे उद्यां."

" तुला येते पुरणपोळी ?"

" हो. आईनें मला सारें शिकविलें आहे. किती छान पुरण भरतोस-आई म्हणायची."

" मी देईन तुला करून."

" पण माझ्या मित्रांना माझ्या हातची पुरणपोळी देण्यांत निराळीच गोडी आहे. नाहीं का लिलीच्या आई ?"

त्या दिवशीं रंगा मोठ्या पहांटेला उठला. त्यानें पुरण शिजत ठेवलें. मित्र म्हणाले, " रंगा, आज काय आहे रे ?"

रंगा म्हणाला, " मागून कळेल."

मित्र आपापल्या वर्गांना निघून गेले. लिलीचे वडील कामाला गेले. रंगा पुरणपोळ्या करूं लागला. लिलीच्या आईनें येऊन पाहिलें. लिली आली आणि पोळी खाऊन गेली.

रंगा स्टेशनवर गेला. एकदांची गाडी आली. मित्र मित्र भेटले. गाडी करून दोघे घरीं आले. पंढरीनें स्नान केलें. दोघे मित्र जेवावयाला बसले.

" रंगा, आतां आपण परत कधीं भेटूं ?" पंढरी म्हणाला.

"पत्रानें वरचेवर भेटूं. तूं तिकडची वार्ता कळव, वर्णनें लिही. उंच पर्वत, बर्फाळ चमकदार शिखरें, द्राक्षांच्या बागा...आपला देश किती सुंदर, किती समृद्ध. या पेशावर भागांतच पूर्वी प्राचीन काळीं दोन अडीच हजार वर्षांपूर्वी मोठें विद्यापीठ होतें. भगवान् पाणिनि तिथें शिकवीत. शिकवतां शिकवतां वाघानें त्यांना खाल्लें. पंढरी, मीं तो प्रसंग चितारला आहे. आमच्या मुख्य अध्यापकांना तें चित्र फार आवडलें. तूं मला तिकडचीं वर्णनें लिहून पाठव. मी चित्रें काढीन नि तुला पाठवीन."

"रंगा, मला पुरणपोळी करून तिकडे पाठव. पार्सल करून. बरं का? तिकडच्या पठाण मित्रांना मी पुरणपोळी देईन. ते मला द्राक्षें देतील."

"टोळीवाले तुला पळवून नेतील. जप."

"खुशाल नेऊं देत. मी सदैव बेफिकीर असतों."

रंगा पंढरीला पोंचवायला गेला. मेलनें तो जाणार होता. दोघे मित्र सद्गदित झाले होते. दोघे समदुःखी. दोघांनाही मायबाप नाहीं, सख्खें कुणी नाहीं. परंतु त्यांतल्या त्यांत रंगा अधिक भाग्यवान् होता. तो जाई तिथें त्याला प्रेमळ माणसें लाभत. परंतु पंढरीला अशीं प्रेमळ माणसें फारशीं लाभलीं नाहींत. त्याच्यावर प्रेम करणारा एक रंगाच होता.

गाडीची वेळ झाली. निरोप देऊन घेऊन झाले.

पंढरी गाडींत बसला. सीमागाडी निघाली. हात सुटले नि डोळ्यांतून शतधारा सुटल्या. रंगा घरीं आला. पंढरी किती तरी वेळ गाडीच्या खिडकीबाहेर तोंड ठेवून डोळे रिकामे करून कोरडे करीत होता.

कांहीं दिवस रंगा उदासीन होता. परंतु पुन्हा तो रंगांत आला. कामांत रंगला. मे महिना जवळ येत होता. परंतु रंगा काकांकडे दुधगांवला जाणार नव्हता. मुंबईतच एका वर्गाला जाणार होता. दादरचा तो कलावर्ग फार सुंदर होता. ध्येयवादी कलावान् तिथें शिकवीत. ग्रामीण जीवनावरचीं सुंदर चित्रें तिथें होतीं. समाजवादी जीवन आणि आजचें जीवन अशीं दोन चित्रात्मक प्रदर्शनें त्या वर्गातर्फे एकदां मांडण्यांत आलीं होतीं.

रंगाला तीं प्रदर्शनें फार आवडलीं. आपली कला समाजवादाच्या निर्मितीसाठीं कारणीं लावतां येईल असा त्याला आत्मविश्वास वाटला. त्याला एक नवीन दृष्टि आली.

मुटी सुरू होती. रंगा कधीं वर्गाला जाई, कधीं घरीं असे. लिली येऊन बसे. लिलीची आईही कधीं कधीं येऊन रंगवीत बसे.

"तूं माझें चित्र पुरें केलेंस ? किती रे छान काढलें आहेस तूं!" लिलीची आई एकदां चित्र पाहून रंगाला म्हणाली.

रंगा म्हणाला, "भाऊबीजेच्या दिवशीं मी तें तुला ओंवाळणी म्हणून घालीन. तोंपर्यंत तें माझ्या पेटींतच असूं दे. मधून मधून आणखी रंग भरीन, छाया दाखवीन. ताई, तुझी ती तसबीर मी तुला मढवून देईन. भाऊच्या हातची तसबीर. तूं ती भिंतीवर लाव. लिली बघत राहील. भाऊनें काढलेली आई— असें म्हणेल."

● ● ●

## नवीन अनुभव : : ८

**मुंबईला** एक खादीप्रदर्शन व्हायचें होतें. रंगाला निरनिराळे अनुभव घ्यायची हौस. त्या प्रदर्शनांत आपल्याला कांहीं काम करतां आलें तर किती चांगलें, असें त्याच्या मनांत आलें. त्यानें ग्रामीण जीवनाचे कांहीं फलक तयार केले. खादी गरीब मायबहिणींना कसा आधार देत आहे तें त्यानें कांहीं चित्रांतून दाखविलें.

चित्रांत एक चित्र त्यानें असें चितारलें होतें: एक आंधळा होता. परंतु चरख्यावर तो सूत काढीत होता. भीक मागण्याऐवजीं तो स्वाभिमानपूर्वक भाकरी मिळवी.

ती एक मुसलमान अम्मा; ती जुन्या खानदान घराण्यांतील. परंतु घराला अवकळा आलेली. कामाला तर रूढीमुळें बाहेर जातां येत नसे. परंतु तिच्या घरांत चरखा आला. ती शिकली, तिच्या मुली शिकल्या. घरांत चार पैसे येऊं लागले. असें दुसरें चित्र होतें.

रंगा अशीं अनेक चित्रें रंगवीत होता. त्यानें ग्राम–गोकुळ म्हणून कांहीं चित्र-फलक तयार केले. एका चित्रांत गांवांतील सारे लोक एकत्र जमले होते; मुलें-मुली ऐक्याचा गोफ विणीत होतीं. दुसऱ्या एका चित्रांत रानांत एकीकडे गुरें चरत होतीं, तर दुसरीकडे गुराखी वर्तमानपत्र वाचीत होते. रात्रीच्या शाळेंत निरक्षर शिकत आहेत असें तिसरें चित्र होतें. एका चित्रांत सारा गांव स्वच्छतेच्या मोहिमेवर निघाला आहे असें होतें. आणखी एका चित्रांत महात्माजी

मुरली वाजवीत आहेत आणि त्यांच्या पाठीमागून लहान थोर जात आहेत, नवयुग निर्मू बघत आहेत, असें होतें.

एके दिवशीं ते आपले चित्रफलक नि तीं नाना चित्रें घेऊन प्रदर्शनचालकांकडे रंगा गेला. तिथें त्याची आधीं दाद लागेना. अखेर लागली.

"पाहूं तुमचीं चित्रें, आपण तिकडे बसूं चला." असें म्हणून रंगाला घेऊन एक प्रेमळ गृहस्थ एका खोलींत गेले. बापूसाहेब खरे त्यांचें नांव. कळूं लागल्यापासून गृहस्थ कॉंग्रेसचा पाइक. सदोदित हातून होईल तें समाजकार्य निष्ठेनें करणारा.

रंगानें आपले फलक मांडले. तीं चित्रें तिथें मांडलीं. तीं पाहून बापूसाहेब चकित झाले.

"फारच सुंदर." ते म्हणाले.

इक्यांत तिथें आणखी मंडळी आली. तीं चित्रें पाहून जो तो मान डोलवूं लागला.

"प्रदर्शनांत हीं चित्रें लावावीं, हे फलक टांगावे. आपल्या व्याख्यानांनीं होणार नाहीं तें या रंगांनीं होईल. आम्हांलाही अशा कल्पना सुचल्या नसत्या." धर्मांचे मायबाप बापूसाहेब म्हणाले.

"ज्याला सहानुभूति आहे तो सारें लौकर शिकतो. त्याला सारें पटकन् समजतें." रंगा त्यावर उद्गारला.

"खरें आहे. आणि कलावानाचें हृदय जास्तींत जास्त सहानुभूतीनें भरलेलें असतें. इतरांना दिसत नाहीं तें त्याला त्याच्या भावनेचा दिवा दाखवतो. तुमचें नांव कांय?"

"रंगा."

"वाः! सुंदर नांव. आमचें प्रदर्शन मांडायला तुम्ही मदत करा. येत जा. सध्यां तुम्हांला सुटीच आहे. आम्ही तुम्हांला कांहीं सन्मान्य देणगीही देऊं."

"मी केवळ पैशांचा आशक नाहीं. मला नवी नवी दृष्टि येईल. माझी कला व्यापक नि खोल होईल. म्हणून मी ही जागा धुंडीत आलों. मी गरीब आहें. मिळाली मदत तर हवीच."

"दरसाल राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाच्या वेळीं आम्ही प्रदर्शन भरवतों. तुम्ही तिथें येत जा. यंदां महाराष्ट्रांत खेड्यांत अधिवेशन व्हायचें आहे. फैजपूरला. तिथें शांतिनिकेतनचे प्रख्यात कलावान् नंदलाल येणार आहेत. ते ग्रामीण

वस्तूंतूनच सौंदर्यनगरी निर्माण करणार आहेत." असा रंगाला धीर देऊन बापूसाहेब गेले.

अशी रंगाची चित्रकला सर्वांना दिवसेंदिवस अधिकाधिक आवडूं लागली. रंगा सर्वांना अधिकाधिक आवडता होऊं लागला.

• • •

प्रदर्शन संपलें. रंगाला प्रशस्तिपत्रें मिळालीं. कांहीं सन्मान्य वेतनही मिळालें. ओळखी झाल्या. परंतु तो दगदगीनें आजारी पडला. खोलींत पडून राहिला. अजून थोडी सुटी होती. खोलींतील इतर मुलें आलीं नव्हतीं. रंगा एकटाच होता. तो रंगवायला बसे; परंतु पाठ दुखूं लागे. तो आंथरुणावर पडे.

"रंगा, काय होतें?" शेजारच्या ताईनें येऊन विचारलें. ती म्हणाली, "मी सांगत होतें इतकें नको करूं काम. मध्यें कांहीं दिवस तर दिवसरात्र तिकडेच असस. मी म्हणें गेला तरी कुठें! आतां विश्रांति घे. स्वयंपाक नको करूं. मी देत जाईन जेवायला. चार दिवस तूं आम्हांला जड नाहींस. आणि बहिणीला भावाचें का कधीं ओझें वाटतें रंगा?"

ताईनें रंगाची खोली झाडली. तेथलीं भांडीं वगैरे स्वच्छ करून ठेवलीं. ती त्याच्याजवळ बसली होती. त्याचें डोकें थोपटीत होती. लिली जवळ खेळ-खेळण्यांचें कांहीं रंगकाम करीत होती.

जराशानें ताईचे यजमान अमृतराव घरीं आले. कपडे काढून ते रंगाच्या खोलींत आले. अमृतरावांनीं तेथील दृश्य पाहिलें. ताई उठली नि आपल्या खोलींत गेली. तिनें स्टोव्ह पेटवला. पटकन् चहा करून पतीला नेऊन दिला.

"मला नको चहा." अमृतराव रागानें म्हणाले.

"घ्या ना. तुम्ही आलांत मला कळलेंही नाहीं." ती आर्जवून म्हणाली.

"कशाला कळेल? रंगाजवळ बसलें म्हणजे थोडेंच कांहीं कळणार आहे? तुला लाज वाटत नाहीं. बेशरम. इथें रहायचें नाहीं याच्यापुढें. बिऱ्हाड बदलायचें. माझ्या संसारांत साप शिरत आहे. मला थोडथोडें वाटूं लागलेंच होतें. तरी म्हटलें हा सुटींत गेला कसा नाहीं? आणि आतां आजाराचें सोंग. सारे रंग मला समजतात. कलावंतांचे हे नमुने."

अमृतराव विष ओकत होते. बिचारी ताई गायीप्रमाणें कावरीबावरी झाली. ती स्वयंपाकघरांत जाऊन रडत बसली.

"आई, रडूं नको. बाबा रागावले, होय ना? मी बाबांना मार देईन." लहानगी लिली आईचा कैवार घेऊन बोलली.

"कुणाला मार देणार आहेस, बोल पुन्हा." असें विचारीत पित्यानें त्या मुलीच्या कोमल गालांवर भराभर चापट्या मारल्या.

"नका मारूं तिला, मला मारा." ताई कळकळली.

"दोघींना मारतों." ते जळफळले.

तिकडून रंगा धांवून आला. त्यानें लिलीला उचललें.

"ठेवा खालीं तिला." अमृतराव कडाडले. मग ते भलताच संशय डोक्यांत घेऊन ताईला, लिलीला आणि रंगालाही खूप बोलले. आणि जळफळत खोलींत गेले. जातांना असें सर्वांनाच कमालीचें दुःखी करून गेले.

रात्री रंगाला झोंप आली नाहीं. त्यांची ताईही आंथरुणावर तळमळत होती. लिली झोंपेंत भाऊ भाऊ असें जावडत होती.

सकाळ झाली. अमृतराव बाहेर पडले. गेले ते कुठेंतरी नवीन जागा ठरवून आले.

"आजच बिऱ्हाड मोडायचें. इथें आज स्वयंपाक नाहीं करायचा. बांधाबांध कर. आवराआवर कर. बघतेस काय ?" त्यांनीं घरांत ताकीद दिली.

आवराआवर सुरू झाली. रंगानें लिलीला दिलेलीं चित्रें, तीं सारीं अमृतरावांनीं टरकावलीं. लिली रडत होती. भाऊनें दिलेलीं चित्रें—ती म्हणे, कीं तिला थप्पड मिळे. रंगा शून्य मनानें हें सारें पाहात होता.

मोटार लॉरी आली. सारें सामान तिच्यांत चढवण्यांत आलें. अमृतराव पत्नी नि मुलगी यांना घेऊन निघाले. ताई भाऊजवळ एक शब्द बोलूं शकली नाहीं. लिली भाऊजवळ जाऊं शकली नाहीं. रंगा खोलींत दुःखगंभीर होऊन बसला होता. मोटार गेली. शेजारच्या खोलीकडे रंगानें शून्य दृष्टीनें पाहिलें. त्याचे अश्रू आतां धांवून आले.

सायंकाळपावेतों रंगा तसाच शून्य मनानें रडत स्फुंदत खोलींत बसला होता. अखेर सायंकाळ झाली. तेव्हां तो बापूसाहेबांकडे गेला.

बापूसाहेबांनीं रंगाला धीर दिला, "रंगा ! हे असे प्रसंग येतातच. अशा वेळीं मन कसें शांत ठेवलें पाहिजे. सारें विसर आणि कामाला लाग. खरें, तूं फैजपूरच्या राष्ट्रीय सभेला येणार आहेस ना ? नंदलाल बोस तुला भेटतील तिथें."

बापूसाहेब त्याच्याजवळ बोलत होते. त्याला शांत करीत होते. रंगा आज जेवलेला नव्हता. तो मग तिथेंच राहिला. रात्रीं जेवला. तिथेंच झोंपला. सकाळीं जरा शान्त होऊन तो आपल्या खोलीवर गेला. असे जगाचे नानाविध अनुभव घेत बाल-रंगाच्या जीवनाला गंभीर रंग चढत होता. ● ● ●

# नंदलालांच्या जवळ : : ९

नाताळांत काँग्रेसचें अधिवेशन फैजपूरला होतें. पावसाळ्यांतच कामाला सुरवात झाली. झपाट्यानें काम सुरू झालें. लहान, थोर सारे लोक नि मोठमोठे पुढारीही अधिवेशनाचा मांडव उभारण्यासाठीं आणि बाकीची तयारी करण्यासाठीं राबूं लागले.

नंदलाल बोस काँग्रेसनगराची ग्रामीण परंतु कलापूर्ण नयनरम्य रचना करण्यासाठीं फैजपूरला येऊन बसले. कलाकृति उभारण्याचें काम जोरांत सुरू झालें. रंगा आरंभापासूनच त्या तयारींत स्वयंसेवक म्हणून होता. बोसबाबू येतांच तो त्यांच्या हाताखालीं कलात्मक सेवा करूं लागला.

एके दिवशीं रंगा फार वेळ बोसबाबूंबरोबर एकसारखें काम करीत होता.

" रंगा, तूं आतां जा. दमलास." नंदलाल म्हणाले.

" तुमच्याजवळ काम करतांना कोण दमेल ? मी काम करतां करतां किती तरी मिळवीत आहें. ग्रामीण वस्तु घेऊनच तुम्हीं सौंदर्य–समुद्र निर्माण करीत आहांत. तुम्ही परवां म्हणालांत कीं कला सर्वांच्या जीवनांत आहे. परंतु असें कुठें येतें अनुभवाला ? "

" रंगा, कलेचा अर्थ काय ? कला आनंद देते. कला परिस्थितीवर स्वार होते. अरे, एखादा गरीब मनुष्य घे. तो गरीब असला तरी कुडाच्या भिंतींना गेरूचा रंग देईल. त्या शेणानें सुंदर सारवील, घरासमोर चार झेंडूचीं फुलझाडें लावील. घरांतील मडकींच, परंतु त्यांना पांढरा तांबडा रंग देईल. त्या दारिद्र्यांतही कलेनें तो सुंदरता आणतो. आपल्या बायका अंगण सारवतात. मग तिथें कमळ, तारे, चंद्र, सूर्य काढतात. याचा अर्थ काय ? ती गरीब स्त्री म्हणते, 'स्वर्ग माझ्या अंगणांत आहे. ते चंद्र–सूर्य इथें आहेत. तीं कमळें, ते तारे–सारें सौंदर्य माझ्या या झोपडीसमोर आहे.' रंगा, आणि खरें सांगूं का ? जीवनांतील कलात्मता प्रगट व्हायला माणसाला फुरसतही हवी. मनुष्याला निरनिराळे आनंद का नको असतात ? सर्वांत मोठा आनंद नवनिर्मितीचा असतो. परंतु सारी जनता कांहीं तरी नवीन निर्माण करीत आहे असें कधीं बरें होईल ?

"समाजरचनाच बदलेल तेव्हां. आजची कला ही मूठभर लोकांची. आजची संस्कृतिही मूठभर लोकांची. श्रमणारी सर्व जनता का कलाविकासांत भाग घेत आहे ? त्यांना तो आनंद जणूं माहीतच नाहीं. म्हणून त्यांची सारी शक्ति

दोनच गोष्टी निर्माण करण्यांत वेंचली जाते. गुरुदेव म्हणायचे कीं सारी संस्कृति फुरसतीच्या वेळेस निर्माण होते. पोटापाण्याचे उद्योगच रात्रंदिवस करावे लागणार असतील तर संस्कृतिसंवर्धनासाठीं कुठला वेळ ? आजच्या संशोधनाचा, आजच्या साधनांचा, विवेकानें उपयोग जर आपण केला, तर कामाचे तास कमी करतां येतील आणि श्रमणारी जनता अधिक विश्रांति मिळून त्या विश्रांतीच्या वेळाचा उपयोग करून नवसंस्कृति निर्माण करण्यांत भाग येईल. तिच्यांतून कवि, चित्रकार, संगीतज्ञ, शास्त्रज्ञ निघतील."

रंगा नंदलालांच्या मुखाकडे बघत ऐकत होता.

"जा आतां नंदा. तुमच्या खानदेशाचीं केळीं खा. आणि मला काय आणणार ? " नंदलाल म्हणाले.

"चिनी बदाम."

"अरे लबाडा ! चिनी बदाम आमचा बंगला शब्द घेतलास. शेंगा म्हण ना. शेंगा भाजून आण. बंगालमध्यें शेंगा नाहींत. तुमचा हा खानदेशी मेवा आहे. रंगा, जा ना रे ! शेंगा आण भाजून. मला भूक लागली."

"मला तुमच्या शब्दांची भूक आहे. असें उपनिषद् कधीं कोणत्या झाडा-खालीं पुन्हां ऐकूं ? "

"विश्वभारतींत ये नि माझ्या जवळ रहा. रंगाचे रंग खुलवीन. येशील ? "

"येऊं ? मी गरीब आहे."

"देवाची देणगी असलेला तूं श्रीमंत आहेस. ये, मला आनंद होईल. दोनचार महिने तरी ये."

रंगा सद्गदित होऊन निघून गेला. तो केळीं, भाजलेल्या शेंगा घेऊन आला. कढत दूधहि होतें.

थोड्या वेळानें रंगा गेला. आतां अधिवेशनाला फार दिवस नव्हते. रात्रंदिवस काम होतें. सारें नगर उभें राहिलें. अपूर्व असें तें साधें सौंदर्य होतें.

अधिवेशनाचा मंगल दिवस उजाडला. जिकडे तिकडे थोर थोर पुरुषांची गर्दी. तशीच कॉंग्रेसवर निष्ठा ठेवणाऱ्या हजारों लाखों खेडुतांचीही. पंडित जवाहरलाल नेहरू या कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. फैजपूर हें खेडेंगांव. परंतु साऱ्या राष्ट्रां-तील राष्ट्रभक्ति आणि पवित्र उत्साह जणूं त्या अधिवेशनांत एकत्र ओसंडत होतीं. मोठमोठे कॉंग्रेस–सेवक अगदीं एका जिवानें अधिवेशनाची जागा साफ करीत

होते. रंगानेंही आज प्रेमानें हातांत झाडू घेतला. महापुरुषांना जाण्यासाठीं रस्ता स्वच्छ करण्यांत त्याला पराकाष्ठेचा आनंद होत होता. कुंचला धरणारा रंगाचा हात आज केरसुणी घेऊन सौंदर्य निर्मीत होता, स्वच्छता फुलवीत होता.

त्या पहा दोन अलौकिक विभूति आल्या. सभोंतीं मुलाबाळांची गर्दी. बादशहाखान आणि महात्माजी. जणूं पृथ्वीवर उतरलेले चंद्रसूर्य. हरि–हरांची जणुं जोडी. एक उंच धिप्पाड, एक कृश लहान. परंतु दोघांचें आंत हृदय एकच.

रंगा दुरून त्यांच्याकडे बघत होता. त्याचे डोळे भरून आले.

● ● ●

अधिवेशन संपलें. पुढारी जाऊं लागले. थंडी मी म्हणत होती. सारा पसारा लौकर आवरण्यांत आला. आज नंदलाल जाणार होते. रंगा त्यांच्या पायां पडला.

"ये माझ्याकडे. मी वाट बघीन." ते म्हणाले.

"ही तुमची शाल."

"अजून थंडी आहे. तुला असूं दे. तूं अशक्त आहेस. रंगा, प्रकृतीला जप. जगांत अपार दुःख आहे, म्हणून चिंता नको करूं. आपल्याला देतां येईल तो आनंदाचा कण आपण द्यावा. खरें ना ?" असें म्हणून नंदलालांनीं रंगाला जवळ घेतलें. त्याच्या मुखाचें त्यांनीं अवघ्राण केलें. आणि रंगाचा निरोप घेऊन शांतिनिकेतनाकडे गेले.

रंगा मात्र मुंबईला गेला नाहीं. मुंबईला जायला त्याचें मन तयार नव्हतें. त्याला ताईची, लिलीची आठवण येई. तो दुधगांवला गेला. सुनंदा, वासुकाका यांना त्यानें सारे अनुभव सांगितले.

"रंगा, तूं भाग्याचा. तूं थोरामोठ्यांना पाहिलेंस." वासुकाका म्हणाले.

"काका, नंदलालांनीं मला तिकडे बोलावलें आहे."

"तर जा."

"पण मुंबईचें शिकणें ?"

"तूं का परीक्षेसाठीं शिकत आहेस ? नंदलालांच्या चरणापाशीं बसून शिकलास हें केवढें प्रशस्तिपत्र होईल. मी तुला पैसे पाठवीन. शिकवण्या करीन, कांहीं करीन. तूं जा. संधि गमावूं नकोस."

"मग मुंबईचें सामान घेऊन येऊं ?"

"हो. मग कधीं जायचें तें ठरवूं. ये निघून मुंबईहून. तुला मानवतही नाहीं ती मुंबई." वासुकाका म्हणाले. ● ● ●

# निष्ठुर दैव : : : १०

रंगा फैजपूरहून मुंबईला आला. त्याला तिथें शून्य वाटत असे. त्याच्या ट्रंकेंत ताईला भाऊबीजेच्या दिवशीं देण्यासाठीं म्हणून काढलेलें तिचें चित्र होतें. परंतु दिवाळी–भाऊबीज फैजपूरच्या नवरचनेंतच गेली. आतां मनांत भाऊबीज. मनांतच ताईला भेटायचें, ओवाळायचें. पण कुठें होती ताई? लिली? बिऱ्हाड बदलून कुठें गेलीं होतीं नकळे.

तें मनांत वागवीत एके दिवशीं रंगा बापूसाहेबांकडे गेला.

"बरेच दिवसांनीं आलास रे. कॉंग्रेसच्या प्रदर्शनांतील कामामुळें थकलास. खरें ना? घरीं राहून आलास?" बापूसाहेब म्हणाले.

"हो, घरीं होतों चार दिवस. मी आतां विश्वभारतींत जाणार आहें. इथलें सारें सामान नेण्यासाठीं व तुम्हां सर्वांचा प्रेमळ निरोप घेण्यासाठीं म्हणून आलों. तुमचें, आईचें माझ्यावर किती प्रेम. तुम्ही धीर दिलांत, सारें दिलेंत."

"तुम्हीं देव दिला, दिवा दिला
तुम्हीं मातें हितपंथ दाविला
करुणा विसरेन का असा
उतराई प्रभु होऊं मी कसा"

असे चरण म्हणून रंगा सद्गदित झाला. गंभीर वृत्तीचे बापूसाहेब, परंतु तेही गहिंवरले.

"रंगा, कुठले रे हे चरण? कुणाची ही कविता?"

"वासुकाकांच्या तोंडूनच मीं ऐकले होते. ते हे चरण पुष्कळदां गुणगुणतात."

"सुरेख आहेत."

"मलाही आवडतात. खरेंच बापू, तुम्हीं मला सारें दिलें. जो दिवा विझणार नाहीं असा ध्येयवादाचा दिवा मला तुम्हीं दिला आहे. ज्याला जीवनाचें ध्येय मिळालें त्याला देव मिळालाच."

नंतर रंगा आंतल्या खोलींत जाऊन आईजवळ बोलत बसला. त्यांनीं त्याला खायला दिलें. शेवटीं सर्वांचा निरोप घेऊन तो निघाला.

"रंगा, पत्र पाठवीत जा. विश्वभारतींत तूं जाणार. मोठा हो. भारताची कीर्ति दिगंतांत नेणारा थोर चित्रकार हो." पतिपत्नींनीं आशीर्वाद दिला.

"तुमचे आशीर्वाद मला तारतील, मोठा करतील." असें सांगून रंगा गेला.

बापूसाहेब पत्नीला म्हणाले, "किती निर्मळ नि उदार वृत्तीचा प्रेमळ मुलगा!"

मुंबईहून सारें सामान घेऊन रंगा दुधगांवला आला. मुंबईस त्याचें लक्षच लागत नव्हतें. ताई व लिली यांची त्याला आठवण यायची. नाहीं तर दोन तीन महिन्यांनीं एक परीक्षा आणखी झाली असती. परंतु परीक्षेकडे त्याचें लक्षच लागत नव्हतें. तो घरीं आला. दोन महिन्यांनीं विश्वभारतींत जायचें या विचारानें तो मस्त होता.

तो वासुकाकांजवळ होता. दोन महिन्यांनीं लांब जाणार होता. वासुकाका सकाळीं, रात्रीं शिकवण्या करीत. रंगाला पुढें पैसे लागतील; त्याची तरतूद करीत होते. परीक्षा झाल्या. शाळांना सुट्या लागल्या. वासुकाकाही आतां घरींच असत. ते रंगाला भारतीय इतिहासांतील अनेक प्रसंग रंगवायला सांगत. 'ध्येयवादी भारत' म्हणून एक चित्रसंग्रह पुढें तूं कर असें म्हणत.

असे आनंदांत दिवस जात होते. परंतु प्रभूच्या मनांत निराळेंच होतें. वासुकाका आजारी पडले. त्यांना ताप आला नि ते निपचित पडून राहिले.

दुधगांवच्या डॉक्टरांनीं उपाय चालविले. परंतु यश येईल असें वाटेना. वासुकाकांनीं खरी परिस्थिति ओळखली.

"रंगा, तुला आतां देवाचा आधार. सुनंदाला तूं आहेस. तुझी आईच ती. मोठा हो. ध्येय कधीं सोडूं नको. बाळ, तुझ्याबद्दलच्या माझ्या केवढाल्या आशा! परंतु आतां तुला कोण रे मदत करील? तूं विश्वभारतींत कसा जाशील? हिचेंच पालनपोषण तुला करावें लागेल."

रंगा स्फुंदत म्हणाला, "तुम्ही चिंता नका करूं. रंगाच्या बोटांतील कला जोंवर आहे तोंवर ददात नाहीं पडणार."

वासुकाका थकले. त्यांना बोलवेना. डोळेही नीट उघडत ना. सुनंदा नि रंगा जवळ बसून होतीं. परंतु वांचण्याचें चिन्हच नव्हतें. रंगाला विश्वभारतींत पाठवूं म्हणणारे वासुकाका विश्वंभरांत विलीन झाले.

कांहीं दिवस गेले. तें लहानसें घर वासुकाकांनीं विकत घेतलें होतें. दुधगांव त्यांना आवडलें होतें. त्यांच्याजवळ जी जुनी पुंजी होती, तिनें तें घर त्यांनीं घेतलें. परंतु आतां रंगाला पैसे कुठले?

"रंगा, हें घर आपण विकून टाकूं. ते पैसे तुला होतील. विश्वभारतींत जा. मी इथें एखादी लहानशी खोली भाड्यानें घेऊन राहीन." आई म्हणाली.

“ आई, हें घर विकायचें नाहीं. घर असूं दे. काकांनीं किती आवडीनें हें घर घेतलें. तें का विकायचें ? मी नाहीं विश्वभारतींत जात. या शाळेंतच मला नोकरी देणार आहेत.”

“ परंतु तुझी कला ? तुला अजून शिक्षण घ्यायचें आहे. खरें ना ? एव्हांपासून नोकरी कशाला ? एकादां मनुष्य नोकरींत गुंतला म्हणजे निर्जीव होतो. यंत्रवत् होतो. तूं घर वीक. माझें ऐक. नाहींतर कोणाकडे गहाण ठेवूं हें घर नि त्यावर पैसे मागूं. तूं पुढें मोठा हो. पैसे मिळव. घर सोडव. मरण्याआधीं तुझ्या विश्वभारतींतील वास्तव्याचीं स्वप्नें ते रंगवीत. त्यांचीं तीं स्वप्नें पुरीं नाहीं का करायचीं ? रंगा, ते काय म्हणतील ? त्यांचा देह गेला. त्यांचीं स्वप्नें, त्यांचे विचार या घरांतील अणुरेणूंत भरून राहिले आहेत. मला ते विचार ऐकूं येतात. आपण त्या विचारांची पूजा केली पाहिजे. मी एक वेळ जेवीन, कुठें काम करीन, इथें मुलींच्या शाळेंत काम मिळेल का पाहीन; नाहींतर शिवणकामाचें यंत्र घेऊन तें काम सुरू करीन. परंतु तुझें शिक्षण पुरें झालें पाहिजे. जा विश्वभारतींत. जा मछलिपट्टणच्या कलाभवनांत. दक्षिणेकडे जाऊन नटराज वगैरे बघून ये. भारतीय कलांचा आत्मा आत्मसात् करून तो नवीन स्वरूपांत जगासमोर रंगरूपानें मांड. नव्या जुन्या भारताचा तूं समन्वय करणारा. जुन्या भारतांतून नवभारत कसा येत आहे तें दाखव. उगी, रडूं नको. ते आपल्याजवळ आहेत. आतां अधिकच आपल्याजवळ असतील. त्यांचीं स्वप्नें पुरीं कर. नवभारताचीं स्वप्नें. विश्वाला मिठी मारणारा भारत. महान् भारत. ती दृष्टि तूं देशाला दे, जगाला दे. तुझे रंग यासाठीं आहेत. तुझी कला यासाठीं आहे. ऊठ बाळ ! चिंता नको. जा शिकायला. मी वाटेल तें काम करीन. तूं मोठा हो. मनानें, विचारानें, दृष्टीनें, ध्येयानें मोठा हो.” असें म्हणून तिनें रंगाला जवळ घेतलें. बराच वेळ दोघें डोळे मिटून बसलीं होतीं.

• • •

## मित्राचें पत्र : : : ११

इतक्या सगळ्या आपत्तींतही रंगाला अधूनमधून पंढरीची आठवण होई. वासुकाकांची निधनवार्ता त्यानें पंढरीला कळविली; आणि विश्वभारतींत शिकायला जाण्याचा आपला प्रश्न कसा गुंतागुंतीचा झाला आहे तेंही लिहिलें.

थोड्या दिवसांनीं एक भला मोठा लखोटा पेशावरच्या बाजूनें टपालांतून आला. पंढरीचा होता तो.

प्रिय रंगा,

तुझें दुःखी पत्र पाहून मी अस्वस्थ झालों. तुझा एक आधार गेला. वासुकाकांचें जीवन म्हणजे यज्ञरूप होतें. ते तुला नव्हते वाढवीत; ते एका ध्येयाला वाढवीत होते. तुझ्यामध्यें ते नवभारताचा आत्मा बघत होते.

रंगा, तूं मला काढून दिलेलें भारतमातेचें चित्र माझ्या खोलींत टांगलेलें आहे. अनेकांना तें आवडलें. 'कोण हा चित्रकार?' लोक मला विचारतात. 'माझ्या बाळपणाचा मित्र रंगा' असें मी अभिनानानें म्हणतों.

रंगा, तुला एक गंमत सांगूं का? इकडे पहाडांत एके ठिकाणीं परीस आहे अशी दंतकथा. चार चार महिने बकऱ्या पहाडांत चारायला नेतात. पुढें गुराखी त्यांना घरीं परत आणतात. बकऱ्या पाठवतांना त्यांच्या खुरांना नाल मारतात. हेतु हा कीं परीस नालाला लागला तर नाल सोन्याचा व्हावा! महिनेच्या महिने रानांत राहून जेव्हां कळप पुन्हा खालीं येतात, घरीं येतात, तेव्हां जो तो बकऱ्यांच्या खुऱ्या बघतो. सोनें झालें आहे कीं काय?

रंगा, खरा परीस जगांत एकच आहे. चांगल्या दृष्टीनें पाहिलें तर सारें सोनेंच सोनें. सूर्याचे किरण ढगांवर पडतात. सारे सुवर्णमय दिसतात. आपल्या जीवनांतील सहानुभूति, प्रकाश, सेवा, आनंद यांचे अखंड किरण आपण सर्वत्र विखुरीत जावें. माझा मित्र एक अफगाण आहे. तो बिचारा कैदी आहे. आपण पठाण, अफगाण म्हणजे दुष्ट समजतों. परंतु भावना, हृदय, प्रेमळपणा सर्वत्र आहे. दुष्टता नाहीं कुठें? रंगा, एके दिवशीं तो अफगाण गेला, आणि मग दोनचार दिवस तो आला नाहीं. मी त्याला भेटायला अधीर असें. मला मातृप्रेम, पितृप्रेम मिळालें नव्हतें. तो अफगाण तें मला देत होता. तोंच पुन्हा एके दिवशीं तो पठाण आला. आला तो मला कांहींतरी घेऊन आला.

'बचा, हम यहांसे जानेवाले है. दूर बेलगांवके तरफ कैदखानेमें हमको भेजनेवाले है. तुमारा मुल्क वहां है न? मै देखूंगा.'

त्यानें माझ्या डोक्यावर जवळचें सुगंधी तेल ओतलें. तो म्हणाला, 'ही बाटली तूं घेऊन जा.' त्याच्या डोळ्यांत पाणी आलें. त्यानें मला हृदयाशीं धरलें. मग तो धिप्पाड पहाड पाझरला होता. त्याच्या तुरळक रुपेरी दाढीवर अश्रू मोत्यांप्रमाणें चमकत होते.

रंगा, म्हणून जगांत कुठेंही जा, तुम्हांला माणुसकी आढळेल. विश्वचि माझें

घर. मी तर घरदारविहीन आहें. परंतु मला जाईन तिथें घर मिळत आहे रंगा, तूं मला प्रेम दिलेंस. तूं पुरणानें भरलेली पुरणपोळी नाहीं दिलीस, तर माधुर्यानें भरलेलें स्वतःचें हृदय दिलेंस. रंगा, रडूं नको. आनंदी राहा. अश्रु पूस. विश्वभारतींत जा. मीही तुला ५।१० रुपये दरमहा पाठवीत जाईन. अधिक काय लिहूं रे माझ्या हृदया ? माझ्या प्रेममूर्ते ! पुरे आतां. मला जायचें आहे रंगा.

तुझा पंढरी.

• • •

रंगानें तें पत्र कितीदां तरी वाचलें. त्यानें सुनंदाआईलाही तें वाचून दाखविलें.

"लष्करी कारकून परंतु कविहृदयी आहे." आई म्हणाली.

"होय आई ! त्याच्या चुलत्यांच्या आग्रहामुळें त्याला लष्करांत जावें लागलें." रंगा म्हणाला.

"बरें, तूं विश्वभारतींत कधीं जायचें ठरवतोस ?"

"तुला सोडून जावें असें वाटत नाहीं आई !"

"अरे ध्येयासाठीं, कर्तव्यासाठीं जायचें. जा. तुझा मित्रही मदत पाठवणार आहे. मीही कामधाम करीन. घर गहाण ठेवूं. तुझ्याजवळची कला वृद्धिंगत करून ये. आतां वेळ नको दवडूं हो रंगा !" ती थोर माउली म्हणाली.

• • •

## सुनंदाची तपश्चर्या : : : १२

**सुनंदाआईनें** रंगाला विश्वभारतींत पाठविलें. तिथें त्याला मदत करतां यावी, त्याला पैसे कमी पडूं नयेत म्हणून ती नानाप्रकारचे उद्योग करी. ती एकदांच जेवत असे. स्वतःचा खर्च तिनें कमी केला. घरही तारण गहाण ठेवलें होतें. अजून मालकी तिचीच होती. घरांत एक भाडेकरू तिनें ठेवला होता. लहानशा एका खोलींत ती राही.

तिनें एक शिवणकामाचें यंत्र घेतलें. ती शिवणकाम शिकलेली होती. ती काम करी. तिनें दारावर पाटी लावली. 'येथें बायकांचे, लहान मुलांचे कपडे शिवून मिळतील.' अशी ती पाटी होती. आणि मुलींचे झंपर, पोलकीं, परकर ती शिवी. मोठ्या बायकाही आपल्या अंगचीं पोलकीं वगैरे शिवून नेत. ती मुलींना छान शिकवी. तिला कलात्मक दृष्टि होती. कधीं मुली आल्या म्हणजे त्यांच्याजवळ

ती बोलत बसे. त्यांना देशाच्या गोष्टी सांगे. कुणी मुली विलायती कापड घेऊन यायच्या. सुनंदा म्हणायची, " खादी नाहीं तर नाहीं, निदान देशी तरी कापड घ्यावें. स्वदेशी हा धर्म आहे. स्वदेशी म्हणजे शेजारधर्म."

कधीं ती मुलींना विवेकानंदांच्या गोष्टी सांगे, तर कधीं सीता–सावित्रीच्या चरित्रांतील उदात्तता सांगे. सुनंदाची ती लहानशी खोली म्हणजे जणूं आश्रम होता.

सुनंदा रिकामी नसे. कांहीं उद्योग चालूच असे. दर आठवड्याला ती रंगाला पत्र पाठवी. त्याला उत्साह देई, प्रेरणा देई.

परंतु सुनंदाला ते अपार श्रम सोसले नाहींत. ती अशक्त दिसूं लागली, फिक्कट दिसूं लागली. होतां होतां ती आंथरुणावर पडली.

एके दिवशीं वासुकाकांचे एक शिक्षकमित्र सुनंदाकडे आले. ते तिची दशा पाहून चकित झाले.

" तुम्हांला काय होतें ? " त्यांनीं विचारलें.

" कांहीं नाहीं. जरा थकवा वाटतो." ती म्हणाली.

" रंगाला कळवलेंत का ? "

" त्याला नका कळवूं. त्याला शिकूं दे, मोठा होऊं दे. रंगा भारताचें नांव दिगंत नेईल, असें ते म्हणत. रंगाला उत्साह देणें हेंच माझें कार्य."

" तुम्ही प्रकृतीला नीट जपा." शिक्षक म्हणाले. ते निघून गेले. परंतु त्यांनीं रंगाला लिहिलेंच. रंगा तिकडे चित्रकलेच्या उपासनेंत रंगला होता. भारताचीं ध्येयें समजून घेत होता. एके दिवशीं तो रवीन्द्रनाथांच्या पिताश्रींच्या समाधी-जवळ बसला होता. इतक्यांत त्याला तें पत्र मिळालें. त्यानें तें वाचलें. तें पत्र हातांत होतें. त्यावर त्याच्या डोळ्यांतील पाऊस पडत होता.

" रंगा, काय आहे पत्रांत ? " हेमन्तानें विचारलें.

" हेमन्त, माझी आई आजारी आहे रे "

" आई ! तुझी आई नाहीं ना ? "

" जन्म देणारी गेली, परंतु देवानें दुसरी दिली; जिनें मला मायाममता सारें दिलें. तिचे पति वारले. माझ्यासाठीं ती कष्टत असते. मला मदत पाठवते. मला जायला हवें."

मग दोघे मित्र गेले. रंगा सर्वांचा निरोप घेऊन निघाला. तो थेट दुधगांवला आला. पहांटेची वेळ होती. पुढच्या भागांत भाडेकरू होता. रंगानें दार ठोठावलें.

"कोण आहे ?" एका आजीबाईनें दार उघडून विचारलें.

"मी, रंगा."

"तुमची आई पाठीमागें राहते. सारखी तुमची आठवण काढते." आजीबाई म्हणाली.

रंगा पाठीमागें गेला. सुनंदा आंथरुणांत होती.

"देवा, रंगाला सुखी ठेव." असें ती म्हणत होती. तो दारावर टकटक आवाज झाला.

"कोण आहे ?" असें विचारीत आईनें दार उघडलें.

"आई, मी. रंगा." रंगा आंत येऊन आईपाशीं बसून म्हणाला, "आई, तूं किती वाळलीस ? किती थकलीस ? तूं कां नाहीं मला कळवलेंस ? मास्तरांनीं कळवलें म्हणून आलों. तुझ्यापासून मी आतां दूर जाणार नाहीं आई ! इथल्या शाळेंतही नोकरी मिळेल असें त्या मास्तरांनीं लिहिलें आहे."

"बरें आतां जरा पड. जागरण झालें असेल. नीज माझ्याच आंथरुणावर. मी उठतें आतां. चूल सारवतें."

"आई, तूं निजून राहा. तुझे पाय मी चेपतों. मी चूल सारवीन, सारें करीन. तूं आतां विश्रांति घ्यायची." रंगा म्हणाला. पण तो दमला होता. त्याला जराशानें झोंप लागली. आईनें हळूहळू उठून चूल सारवली. रंगासाठीं कोको केला.

"बाळ, ऊठ आतां. कोको घे. मग आंघोळ करून झोंप." ती त्याला उठवीत म्हणाली.

रंगा उठला.

"तूं आतां श्रमूं नकोस आई ! नको शिवणकाम, नको कांहीं. तूं कांहीं घेत नाहींस ?" रंगानें कोको घेतां घेतां विचारलें.

"काय घेऊं रंगा ?"

"थोडें दूध घेत जा. घेशील उद्यांपासून ? मला तरी दुसरें कोण आहे आई ? रंगासाठीं राहावें असें तुला नाहीं वाटत ? तुम्हीं सर्वांनीं माझ्यासाठीं श्रमून श्रमून जायचें, आणि मीं जगायचें. काय त्या जगण्यांत आनंद ? आई, तूं जग. रंगाची कीर्ति ऐकायला जग. उद्यां माझें यश कोणाजवळ सांगूं, कोणाला ऐकवूं आई ?"

सायंकाळीं रंगा त्या शिक्षकांकडे गेला. बराच वेळ ते बोलत होते.

"पण मला ड्रॉइंग टीचर परीक्षेचें सर्टिफिकिट नाहीं. शाळा मला नोकरी कशी देऊं शकेल ?" त्यानें विचारलें.

"अरे, नंदलालांजवळ तूं शिकला आहेस. याहून मोटी परीक्षा कोणती ? मी मुख्य शिक्षकांजवळ बोललों आहें. ते तुला नोकरी देतील."

रंगाला त्या शाळेंत नोकरी मिळाली. सुनंदाला तो आतां कामधाम करूं देत नसे. शाळेंतही तो मुलांत प्रिय झाला. विद्यार्थ्यांना तो नवीन नवीन कल्पना देई; त्यांच्याकडून सुंदर चित्रें काढून घेई.

परंतु ड्रॉइंगचे इन्स्पेक्टर आले, त्यांनीं त्याच्या नेमणुकीला आक्षेप घेतला. रंगाची नोकरी सुटली. रंगा बेकार झाला. घर गहाण होतें. कर्ज झालें होतें. नोकरीचाकरीही नाहीं. रंगा चिंतेंत होता. तो आईला म्हणाला, "आई मी मुंबईला जातों. उद्योगधंदा बघतों. तिथें चित्रकार लागतात. वर्तमानपत्रें मासिकें असतात; बघीन कुठेंतरी काम. तूं मात्र इथें पुन्हां एकटी. परंतु कष्ट नको करूं. मी तुला पैसे पाठवीत जाईन. रंगासाठीं जग. दूध पीत जा. थोडें तूप खात जा. कबूल कर. हो म्हण."

"सांगशील तशी वागेन मी रंगा! परंतु तुझ्या गुणांचें चीज होवो. तुझे गुण शेवटीं फुकट का जाणार ? भारताची कीर्ति वाढवणारा तूं होशील असें ते म्हणत." आई डोळे पुसत पण आनंदानें हंसत म्हणाली, "रंगा, ध्येयासाठीं कुठेंही जा. मी तुझे पंख बांधणार नाहीं. माझ्या मनांत येतें कीं हें घर विकावें नि तुला परदेशांत पाठवावें. चिनी जपानी कला बघून ये. डचांची, फ्रेंचांची अशा चित्रकला पाहून ये. जगांतील उत्कृष्ट चित्रसंग्रह पाहून ये. कशाला हें घर ठेवायचें ? तें ध्येयासाठीं होमूं दे."

"नको आई, हें घर नाहीं विकायचें. हा आधार आहे. डोकें ठेवायला मठी असूं दे. परदेशांत नाहीं जातां आलें तरी नमुने इथेंही पाहायला मिळतील. बडोद्याला मोठा चित्रसंग्रह आहे. लाखलाख रुपयांचीं तिथें चित्रें आहेत."

"रंगा, भारतांतील चित्रकारांची लाखलाख रुपयांचीं चित्रें युरोप अमेरिकेंतील संग्रहालयांत केव्हां टांगलीं जातील रे ?"

"तुझ्या रंगाचीं टांगलीं जातील. तुझा आशीर्वाद दे, माते, आशीर्वाद दे."

रंगानें सुनंदाच्या चरणांवर मस्तक ठेवलें. तिनें आपला हात त्याच्या डोक्यावर ठेवला.

• • •

रंगाला मुंबईंत पुन्हा पूर्वीच्या खोलींत जागा मिळाली. तिथें त्याच्या ओळखीचे कांहीं लोक होते. कुणी नवीन होते. ती खोली म्हणजे धर्मशाळा होती. ज्यांचे अभ्यासक्रम संपत ते जात; नवीन ओळखीचे दुसरे विद्यार्थी येत. असें चाले.

" रंगा, तूं चित्रकलेची येथील परीक्षा कां रे नाहीं देत ? "

" आतां परीक्षा नको. नंदालालांजवळ शिकून आल्यावरही इथें चित्रकलेच्या शिक्षकाची परक्षिा देत बसूं ? मी ही गोष्ट सहन नाहीं करूं शकत."

खोलींतील जुन्या मित्राजवळ बोलणें चाललें होतें. कामाची मंडळी हळूहळू सारी गेली. रंगाही कांहीं वेळानें बाहेर पडला. त्यानें आपले नमुने बरोबर घेतले होते. आज अनेक ठिकाणीं कांहीं काम मिळतें का बघायला तो हिंडत होता. शेवटीं एका चित्रकलासंस्थेंत त्याला नोकरी मिळाली.

" आम्ही अनेक वृत्तपत्रांची खास अंकांची मागणी पुरी पाडीत असतों. प्रकाशकांना पुस्तकांसाठीं चित्रें हवीं असतात. आम्ही तुम्हांला सांगूं त्याप्रमाणें तुम्हीं नमुने करून द्यायचे. कबूल ? " संस्थेचा चालक म्हणाला.

रंगाला स्वत्त्व राखून सारें कबूल करणेंच भाग होतें. तो म्हणाला, " कबूल."

करार झाला. रंगा त्या संस्थेंत कामाला जाऊं लागला. परंतु घरीं आल्यावर तो स्वतःच्या कल्पना रंगवीत बसे. त्यानें एक फारच सुंदर चित्र तयार केलें होतें. महात्माजी समुद्रतीरावर सत्याग्रहासाठीं उभे आहेत असें डोळयांत भरणारें अति भव्य असें तें चित्र होतें. स्वातंत्र्याची उषा फांकत आहे; समुद्र समोर उसळत आहे आणि एक महान् पुरुष गंभीरपणें बंड करायला उभा आहे. डोक्यावर विमानें आहेत. दूर बंदूकवाले आहेत. अशा त्या चित्रांत सारी दृष्टि जरी महात्माजींवर खिळली, तरी सभोंवतालची सृष्टीही पार्श्वभूमीप्रमाणें मोठी परिणामकारण अशी तिथें चितारलेली होती.

खोलींत रंगा एकटाच होता. आज सारे सिनेमाला गेले होते. आठांची वेळ असेल. आंत शेगडी फुलली होती. निखाऱ्यांवर आधण होतें. पलीकडच्या खोलींत त्याचें तें चित्र होतें. तो शेवटचे कलात्मक स्पर्श करीत होता.

इतक्यांत दारांतून कुणी तरी आंत आलें. ती मूर्ति रंगाकडे अनिमिष नेत्रांनीं बघत होती. किती तरी वेळ झाला. मग रंगा काम ठेवून शेगडीकडे पाहायला उठला. पहातो तों नयना जवळ उभी !

"केव्हां आलीस तूं नयना ? ये बस." रंगा निवडून ठेवलेले तांदूळ शेगडी-वर पातेलींत पाणी घालून शिजत ठेवीत म्हणाला, "आज इथें जेवणार ना ? जेव नि जा. किती वर्षांनीं भेटलीस. आई गेल्यापासून आजच भेट."

रंगाला आईची आठवण आली. तो सद्गदित झाला. वातावरण जरा गंभीर झालें.

"रंगा, मी जेवीन. परंतु मलाच सारें करूंदे. मी करतें भात. कणीक, पीठ आहे का ? पोळी भाकरीही करीन. तूं इथें बस. बोल. मला कित्येक वर्षांतील हकीगती सांग."

"अग, मीं तुला का कोळशांत हात भरायला लावूं ?"

"काळा रंग का रंगा वाईट ? कृष्ण काळा, आकाशही काळें सांवळें."

"नयना, तूं वेडी आहेस."

"म्हणून तर इथें आलें या लहानशा जगांत, या लहानशा खोलींत, या चुलीजवळ स्वयंपाक करायला. आण ते तांदूळ. मी सारें करीन. तूं बस."

तिनें चूल लगेच ताब्यांत घेतलीच.

"नयना, मी दहीं घेऊन येतों. आपण दहींभात खाऊं."

"लौकर ये. आणखी कांहीं आणीत नको बसूं."

तो वाटी घेऊन गेला. नयना तिथले डबे शोधीत होती. एका डब्यांत भाजणीचें पीठ होतें. तिनें थालीपीठ लावायचें ठरविलें. तिनें भाजणी भिजवली. तिखट-मीठ घालून तयारीनें राहिली. भात शिजला. तिनें तवा शेगडीवर ठेवला. थालीपीठ तव्यावर थापून चुलीवर ठेवून ती रंगाचीं चित्रें पहात बसली. भिंतीवर एक चित्र होतें. 'ताईला भेट' असें त्या चित्राखालीं लिहिलेलें होतें. ही कोण ताई ? रंगाला बहीण तर नव्हती. ती विचार करीत होती. त्याची चित्रशाळा तपाशीत होती.

तिकडे रंगा आला. त्यानें तवा उतरला. चुर् आवाज झाला. नयना झटकन् आंत आली.

"केव्हां रे चोरपावलांनीं आलास ?"

"तूं कशी चोरपावलांनीं येऊन उभी राहिली होतीस ? तुम्हां बायकांनाच चोर होतां येतें असें नाहीं. पुरुषांनाही होतां येतें. अगोदर थालीपीठ बघ. तें जळेल."

"तूं ना सारें करणार आहेस ?"

" तर मग तूं दूर हो. अग! संन्याशाचा संसार असा तपासूं नये. अब्रू चव्हाट्यावर यायची. एक आहे तों एक नाहीं. इथलें कांहीं खाल्लें नाहींस ना?"

" काय आहे खायला? शंकरपाळे, लाडू, चकल्या?" नयना हंसत डोळे किलकिले करीत म्हणाली.

बोलतां बोलतां दोन ताटें तयार झालीं. पाट नव्हतेच. रंगानें वर्तमानपत्राची घडी बसायला घेतली. लहान आसन नयनाला. रंगाला ताईची आठवण झाली. तो एकदम शून्य मनानें तिथें उभा राहिला.

" रंगा, काय रे वाटलें एकदम तुला?"

" लिलीची, तिच्या ताईची आठवण झाली ग! या शेजारच्या खोलींत ताई राहात असे. मला कधीं लागलें कांहीं म्हणजे ताईकडून मी आणावयाचा. परंतु आज कुठें असेल ताई?"

" तें भिंतीवर चित्र आहे, तीच का ताई?"

" हो, मी तें तिला भाऊबीजेला देणार होतों. परंतु तिच्या नवऱ्यानें एकदम इथली जागा बदलली. कुठें गेली रहायला मला कळलें नाहीं. मींही पुढें मुंबई सोडली. आतां पुन्हा परत आलों."

" तूं विश्वभारतींत हातास ना?"

" तुला काय माहीत?"

" मी हल्लीं इथल्या आर्टस्कूलमध्यें शिकत आहे. मी मॅट्रिकला नापास झालें. एक वर्ष आजारी होतें. आतां सारें ठीक आहे. आवडीचा अभ्यास करीत आहे. तुझ्या हातचीं चित्रें आर्टस्कूलमध्यें आहेत. तिथले एक शिक्षक तुझ्या आठवणी सांगतात. मीं ऐकलें. तूं एकदां चित्र काढीत होतास. तों वेळ संपली. तूं रागावलास. मला हें चित्र पुरें करूं दे म्हणालास. परंतु घंटा झाली. तुला सारें गुंडाळावें लागलें. होय ना?"

" हो, आठवतो तो प्रसंग. पण काय ग नयना, माझा पत्ता तुला कुणीं सांगितला?"

" कुणीतरी म्हणालें कीं रंगा मुंबईला परत आला आहे. तो जुन्या खोलींतच राहतो."

" जुनी खोली तुला काय माहीत?"

" तूं पंढरीला तो पत्ता कळविला होतास. तो नव्हता का पेशावरला जातांना इथें आला? तूं पुरणपोळी केलीस. पंढरी पुण्याला मला भेटत असे. तुझा तो

मित्र म्हणून त्याच्याविषयींही मला आपलेपणा वाटे. त्या वेळेला त्याच्याजवळून पत्ता मीं घेतला होता."

"मग कधीं पत्र नाहीं लिहिलेंस तें?"

"पत्रें लिहीत असें, परंतु पोस्टांत टाकीत नसें."

"मग कुठें कचऱ्याच्या पेटींत टाकीत असस?"

"माझ्या ट्रंकेंतच तीं असत."

"तीं आतां कुठें आहेत?"

"हृदयाच्या पेटींत."

"त्या पेटीची किल्ली कुठें मिळते?"

"तें सांगावें नाहीं लागत. त्या किल्लीचा पत्ता सर्वांना माहीत असतो."

"नयना, तुला उशीर होईल जायला."

"मला उशीर होईल म्हणून मामींना सांगून आलें आहें."

"बरें पण भात संपला. थालिपीठ संपलें. आतां काय खायचें? हें दही संपव ना."

"तूंच संपव. मी रोज खातच आहें दहीं. रंगा, तूं घेतोस का कधीं दहीं? तूं असा कां रे राहतोस?"

"अग, आईला, सुनंदाआईला कर्ज आहे. घर गहाण आहे. काकांचें घर. मला तें सारें मोकळें करायचें आहे. पण नयना, मी पोटभर जेवतों. उपाशी थोडाच असतों."

"रंगा, आज तुला कांहीं विचारण्यासाठीं मी आलें होतें."

"काय बरें?"

"माझ्या बाबांच्या मोठमोठ्या राजेरजवाड्यांशीं ओळखी आहेत. मोठमोठे सरकारी अधिकारीही परिचयाचे आहेत. दिल्लीचा व्हाइसरायचा बंगला आहे ना? तिथें अनेक चित्रकारांना काम मिळालें आहे. बाबा तुलाही तिथें काम देतील मिळवून. तुला एकदम कीर्ति मिळेल. मग मोठमोठे राजेमहाराजे तुला बोलावतील. तूं होय म्हण. तुझी कला मागें पडून न राहो. एकदम माझा रंगा दिल्लीचा चित्रकलासम्राट् होवो."

रंगा विचारमग्न होता. दोघें मुकीं होतीं.

"सांग ना रंगा!"

"नको, नयना ! नको. ही खोली दिल्लीच्या राजवाड्याहून मला प्रिय आहे. इथें मी मोकळा आहें, स्वतंत्र आहें."

"आणि तिथें कोण तुला तुरुंगांत घालीत आहे ?"

"आपण कायमचेच तुरुंगांत आहोंत. इंग्रजानें गुलाम करून ठेवलेलें आहे आपणाला. नयना, स्वतंत्र हिंदुस्थानांतील पार्लमेंट मी रंगवीन. तिथें राष्ट्राचा इतिहास रंगवीन. मला हवें तें आज मला येईल का रंगवतां ? दांडी सत्याग्रहाच्या वेळीं मिठाचा खडा उचलतांना 'हें रावणी राज्य मी समुद्रांत बुडवतों' असें महात्माजी निर्धारानें उद्गारले. तें येईल चितारतां ? नयना, माझी कला मी विकणार नाहीं. माझ्या राष्ट्राचा सत्यानाश करणाऱ्यांकडून माझ्या कुंचल्यांची प्रशंसा मला नको आहे. कोट्यवधि जनतेच्या संसारांतील सारा रंग ज्यांनीं नाहींसा केला, त्यांच्याकडून माझ्या कागदी रंगाची प्रशंसा मला नको. आमचे राजेरजवाडे हे ब्रिटिशांचे पाय चाटणारे कुलंगी कुत्रे ! त्यांची कृपा मला नको. ज्यांना प्रजेविषयीं आस्था नाहीं; घोडे, शर्यती, जुगार, विलायती यात्रा, सतरा लग्नें, कोल्हीं, कुत्रीं, खानपान—हे राजेरजवाडे म्हणजे का मानवजातीचे नमुने ? भ्रष्ट, पतित अशी ही विलासलोलुपांची जात आहे. त्यांचा स्पर्शही नको. मी उपाशी राहीन, परंतु यांच्या दारीं जाणें नको."

"रंगा, नयना साधी मुलगी आहे रे ! तिला कुठें कळते तुझी देशभक्ति ? नयना वेडी आहे."

"खरेंच वेडी. आतां शहाणी हो. नवीन भावना शीक."

"तूं शिकलास भावना ? या नयनाच्या भावना तुला कळतात ? उथळ आहेस तूं. जगाच्या भावना ओळखायला निघालेला, तूं तुझ्यासमोर एक मुलगी आहे तिच्या भावना ओळखल्यास ? कां ती आली, कां जेवली, कां चुलीजवळ बसली, कां हक्कानें डब शोधलेन, कां दिल्लीस चल म्हणते, ओळखलेंस ?"

रंगा मुका होता.

"रंगा, तुझ्यावर मी प्रेम करतें. गेलीं कांहीं वर्षें मी दूर होतें. तूं दूर होतास. परंतु तूंच माझें जीवन व्यापलें आहेस. तूं कधीं केव्हां माझ्या जीवनांत शिरलास तें कसें सांगू ? चोराच्या पावलांनीं कसा आलास तें आठवत नाहीं. परंतु अंगणांतून आंत आलास नि अखेर हृदयाच्या गाभाऱ्यांत जाऊन बसलास. तुला आहे कांहीं कल्पना ? आहे कांहीं भावना ? तुझें पदक माझ्याजवळ आहे. आईनें

शेवटीं हृदयाशीं धरलेला तुझा फोटो माझ्याजवळ आहे. त्या दोन वस्तु म्हणजे माझी इस्टेट. माझे बाबा कुबेर आहेत. परंतु त्या संपत्तींत मला रस नाहीं."

"मग मला कशाला दिल्लीला नेऊन श्रीमंत करतेस ?"

"रंगा, बाबा आपली मुलगी गरिबाला देणार नाहींत. तूं श्रीमंत हो. मग तुझ्या हातांत ते माझा हात देतील. म्हणून मीं बाबांना म्हटलें कीं एका उत्तम चित्रकाराला संधी द्या. म्हणून मीं तुला विचारलें. रंगा, जा ना दिल्लीला !"

"तुझें माझ्यावर प्रेम आहे तर माझ्याबरोबर दारिद्याचा वसा घे."

"एकुलती मुलगी. आईवेगळी मुलगी. त्यांचें माझ्यावर किती प्रेम ! ते मला लौकरच युरोपांत नेणार आहेत. जगांतील सर्व चित्रशाळा बघून मी येईन. तूं येशील आमच्याबरोबर ?"

"नाहीं. दरिद्री चित्रकार कशाला तुमच्याबरोबर ?"

"माझें जीवन श्रीमंत करायला. माझ्या जीवनांत रंग भरायला."

"पण सुनंदाआईला सोडून मी कसा येऊं ? तें बरें नाहीं. नयना, तुला कांहीं वाटत असलें तरी तुझ्या वडिलांचे पैसे घेऊन येणें म्हणजे मिंधेपणाच. तुला माझ्याविषयीं वाटतें, तें त्यांना थोडेंच वाटेल ? तूं ये जाऊन, तुझी कला समृद्ध करून ये. मग मलाही तिकडचें ज्ञान दे."

"माझा हात हातांत घे म्हणजे मिळेल."

"परंतु दरिद्री रंगाच्या हातांत तुझा हात कोण देणार रे ?"

"तूं श्रीमंत हो."

"तूं गरीब हो."

"रंगा, दारिद्याचा वसा घे म्हणतोस; अरे पत्नी उद्यां आई झाली म्हणजे आपलीं मुलें दारिद्यांत गारठावीं असें तिला वाटेल का ? मुलांना खाऊ द्यावा, खेळणीं द्यावीं, सुंदर आंगडीं त्यांना घालावीं असें नाहीं वाटत ? तूं माझें ऐक. तूं दिल्लीचा कलावान् हो. कीर्तिमान् हो, संपन्न हो. मग माझे बाबा नाहीं म्हणणार नाहींत. ही नयना तुझी आहे, तुझीच ती मग होईल. रंगा, म्हण ना होय."

"नयना, उशीर होतो आहे. मला नको दिल्ली. सांगितलें ना, स्वातंत्र्य येऊं दे. मग मी दिल्लीला रंगवायला जाईन. तूं ये युरोपांत जाऊन. पत्र पाठवीत जा."

"तूं सारखा उशीर होईल उशीर होईल म्हणत आहेस. मीं जावें अशी कां इच्छा ?"

"नाहीं नयना, तूं बस. जन्मभर इथें बस. मी कंटाळणार नाहीं. परंतु दिल्लीची बात नको. मला दिल्लीचा सम्राट् नको बनवूं. तुझ्या खोलींतील झाडूवाला बनव. तो माझा मोक्ष आहे."

बराच वेळ तिथें मूकता होती. शेवटीं नयना उठली. ती जातां जातां म्हणाली,

"रंगा, नयना साधी मुलगी आहे. तिला क्षमा कर. तूं मोठा हो. स्वतंत्र भारतांत तुझी कला फांको, चमको. स्वतंत्र भारताला तुझी थोर कला अर्पण कर. येतें मी रंगा. नयनाला विसरून जा. तूं महान् आहेस, मी लहान आहें. येतें रंगा. सुखी अस. पोटभर जेवत तरी जा. माझी शपथ आहे तुला. तुझ्या आईची शपथ. येतें मी." • • •

## ताईची भेट : : : १४

ताईचा नवरा म्हणजे केवळ नांवाचा माणूस. रंगाविषयीं ताईचा उगीचच भलताच संशय घेऊन तो तिला छळी, मारी, झोडी. तिला जीवन अगदीं नकोसें झालें होतें.

या दुःखांत तिला विसावा म्हणजे तिचा आंधळीचा एक डोळा लिली. ती तापानें फणफणली असतांना, जगेल कीं नाहीं याचा भरंवसा नसतांनाही त्यानें ताईला मारावें, झोडावें. नाहीं नाहीं त्या शिव्या द्याव्या.

लिली घटकेची सोबतीण उरली तरी तिला आपला रंगाभाऊचा एकसारखा ध्यास. भाऊ! भाऊ! तिनें भाऊचें नांव काढलें कीं तिचा बाप तिला देखील खाऊं कीं गिळूं करायचा.

लिलीचा जीवनदीप अखेर विझूं लागला. तिनें क्षीण स्वरानें आईकडे पाहिलें. तिला बोलवत नव्हतें, तरी ती बोलली, "आई.........भाऊ.........!"

"लिले! बाळ! जा हो देवाघरीं. आणि गेलीस कीं आईलाही लवकर बोलावणें पाठव. भाऊ भाऊ नको करूं आतां. या जन्मीं तो तुला आतां नाहीं भेटायचा बाळ!"

हे आईचे शब्द ऐकून लिलीनें प्राण सोडला.

पण त्या दिवशींही लिलीचें जास्त आहे हें माहीत असून देखील लेकीसाठीं बाप रजा घेऊन घरीं राहिला नाहीं. तो कचेरींतून आल्यावर स्मशानयात्रेची तयारी.

ताईला नवऱ्याच्या भीतीमुळें मुलीसाठीं रडायची चोरी. ती मुकाटपणें उठली. स्मशानांतून स्वारी आली कीं पान वाढ म्हणणार. म्हणून त्या मातेनें हंडी शिजवून ठेवली. आणि लिलीचे कपडे हृदयाशीं कवटाळून ती पडली होती.

सारें आटोपून तो आला. ती उठली. तिनें पाट ठेवला, पान वाढलें. तो मुकाट्यानें जेवला. पतीची गादी तिनें झटकून दिली. तो पडला. तीही स्वयंपाक-घरांत एक चटई टाकून पडली. अंधार, सारा अंधार. तिला मधून मधून रडूं येत होतें. काय हें जीवन असें तिला वाटलें.

परंतु कांहीं दिवस गेले, आणि तिच्यांत आतां क्रांति दिसूं लागली. ती निर्भय, निःस्पृह बनली. गरीब गोगलगाय राहिली नाहीं. तेजस्वी ज्वाला बनली. ती अबला नाहीं राहिली; थरथरणारी वेल नाहीं राहिली. ती धैर्यमंडपाचा स्तंभ बनली.

"होतें कीं नव्हतें त्या पोरावर तुझें प्रेम ? त्या रंगाऱ्यावर, त्या चिताऱ्यावर ?" नवऱ्यानें नेहमींच्या छळवादानें विचारलें.

ती वाघणीसारखी खवळून कडाडली, "पुन्हा असें विचाराल तर याद राखा. अंगावर निखारे ओतीन. तुम्हाला नीट जगायचें असेल तर असें बोलत जाऊं नका. आपल्या गांठी दुर्दैवानें पडल्या आहेत खऱ्या. दोन वेळां जेवा नि स्वस्थ राहा. नागिणीला डिवचूं नका. खबरदार कांहीं बोलाल तर. तुम्हांला लाज नाहीं वाटत पुनः पुन्हा असें बोलायला ? जगांत बहिणीला भाऊ हवा असतो. तो मला दिवाळीला एक चित्र भाऊ-बीजेची ओंवाळणी म्हणून देणार होता. रात्रंदिवस काम करी, तो थके. आजारी होता त्या दिवशीं. त्याच्याजवळ नको का जरा बसूं? नको का धीर देऊं? तुमचीं मनेंच पापी, संशयखोर. आणि तुम्हीं सर्व स्त्रियांकडे माता म्हणूनच बघतां ना ? आजवर कधीं दुसरी भावना नाहीं ना मनांत आली ! बोला, स्पष्ट बोला."

तिचें बोलणें ऐकून तो थंडगार झाला. कधीं न बोलणारी बायको फाडफाड बोलूं लागली. तो जरा भ्याला. तेव्हांपासून जपून वागूं लागला. घरांत आतां दोघांचा अबोलाच असे.

कांहीं दिवस गेले. एके दिवशीं तो कचेरींतून आजारी होऊन आला. घरी येऊन आंथरुणावर पडला. तिनें कांहीं विचारलें नाहीं.

"चहा दे थोडा करून." तो म्हणाला.

तिनें कपभर चहा नेऊन दिला. परंतु तिनें तापबीप आहे का पाहिलें नाहीं.

रात्र झाली. तिनें स्वयंपाक केला.

" पान वाढूं का ? " तिनें जाऊन विचारलें.

" तापानें मरतों आहें आणि पान वाढूं का विचारतेस ? तूं आहेस कोण— हडळ ? चांडाळीण ? " तो संतापून म्हणाला.

" आधीं तुम्हीं कोण आहांत सांगा. समंध, कीं पिशाच्च ? माझ्या मांडीवर लिली तापानें फणफणलेली असे. तरी तुम्ही कचेरींत विडा चघळीत जात असां. तिचा देह कचरा उचलावा तसा उचललांत नि नेलांत. आल्यावर राक्षसाप्रमाणें जेवलां ! तुम्ही कोण ? कोणती तुमची जात ? 'रंगा तुझ्या हातावर चित्रें काढी' असें म्हणून या तळहाताला टांचण्या टोंचल्यांत. आठवतें का ? मी चित्र काढीत होतें. हाताला रंग लागला, म्हणून सांगितलें. परंतु तुम्हांला कावीळ झालेली. माझें बोलणें खोटें ! पोरगी भाऊ भाऊ तापांत म्हणे तर तिच्या थोबाडींत मारलींत ! मला चांडाळीण म्हणतां ? होय. तुमच्या संगतीनें मीही चांडाळीण बनलें. जें पेरावें तें उगवतें. माझ्या जीवनांत निखारे कांटे पेरलेत. आतां खा निखारे नि कांटे."

ती स्वयंपाकघरांत गेली. आणि ती खरेंच जेवली. तिनें त्याची वास्तपुस्त घेतली नाहीं. ती आंथरुणावर पडली. तिनें दिवा मालवला होता. तो तापानें विव्हळत होता.

त्याच्या कचेरींतील त्याचा एक मित्र समाचाराला आला. मित्रानें डॉक्टर आणला. येतांना मोसंबीं आणलीं. डॉक्टरनें तपासलें. मित्र डॉक्टराबरोबर गेला नि औषध घेऊन आला.

" औषध घे, मी जातों." असें म्हणून तो गेला. पण मोसंबीं कोण सोलून देणार ? आणि हात धरून मोरींत कोण नेणार ? बेडपॅन कोण देणार ?

" माझा हात धरून नेतेस का ? " त्यानें गरीबपणानें तिला विचारलें.

" रंगानें ना रंगवला हा हात ? हा हात चालेल का ? हा माझा अमंगळ हात ? " तिनें विचारलें.

" नको छळूंस. नको वाभाडे काढूंस." तो गरिबासारखा उद्गारला.

मग एके दिवशीं म्हणाला, " मला रंगाला पत्र लिहायचें आहे. त्याची मी क्षमा मागतों. मेलों तर मनाला रुखरुख नको. लिलीची क्षमा देवाघरीं मागेन."

तिनें त्याला कार्ड दिलें. त्यानें क्षमायाचनेचें लिहिलें.

"यावर पत्ता लिही. तुला कांहीं लिहायचें असलें तरी लिही." तो म्हणाला. परंतु तिनें कांहीं लिहिलें नाहीं.

दोन दिवस गेले.

"आला का ग रंगा." त्यानें विचारलें.

"नाहीं आला. किती वाजले?"

"नऊ वाजून गेले." घड्याळाकडे पाहात तो म्हणाला, "पण अजून येण्याची अवधी आहे. तो येईल."

तो डोळे मिटून पडला. आणि थोड्या वेळानें दारावर कुणी तरी टकटक केलें.

"भाऊ आला." ती म्हणाली. आणि लगबगीनें उठून तिनें दार उघडलें. रंगाची धीरगंभीर मूर्ति आंत आली.

"ताई, बरी आहेस? यांचें कसें आहे?" येतां क्षणीं त्यानें पहिला प्रश्न विचारला.

तो त्यांच्या उशाजवळ बसला. ताप खूप होता. ते डोळे मिटून होते.

"कोण रंगा?" एकदम उठून अमृतरावांनीं विचारलें.

"पडून राहा हं! आतां बरे व्हाल."

"आतां कायमचें बरें व्हायचें. नको इथली यातायात. ती बघा लिली. मला बोलावते आहे. मरतांना भाऊ भाऊ म्हणे. मीं तिला मारलें. ते पाहा तिचे गाल मीं मारल्यामुळें लाल झाले आहेत. लिले, क्षमा मागायला येतों हां बाळ! तूं पित्याचा हात धर व त्याला देवाजवळ ने. रंगा, तुमची क्षमा मागतों."

"तुम्ही बोलूं नका ना? स्वस्थ पडून राहा." रंगा म्हणाला.

"बोलूं दे. मनांतील वेदना बाहेर ओतूं दे. आतां सारा खेळ संपणारच आहे. हिला मीं छळलें. क्षमा कर म्हणावें. रंगा, तिला आतां तुम्ही आधार द्या." अमृतराव क्षीण स्वरांत बोलत होते.

"तुम्ही बरे व्हा. सुखाचा संसार करा." असें म्हणून रंगा उठला नि स्वयंपाकघरांत गेला.

"ताई, लिली कधीं ग गेली?" त्यानें स्फुंदत विचारलें. तिनें बिऱ्हाड बदलल्यापासून सारा वृत्तान्त सांगितला.

"रंगा, मी त्यांची सेवाचाकरी करीत नाहीं. माझें नाहीं मन एवढें मोठें."

"ताई, मन मोठें करायला हवें. आपणही का पाषाण व्हायचें?"

"नवऱ्यांनींच अहिल्येसारख्या सतीचे पाषाण केले. स्त्रियांचा काय दोष?"

"परंतु त्या पाषाणांना इतकी जाणीव, इतकी संवेदना नि जागृति कीं रामाच्या चरणांचा जरा स्पर्श होतांच त्यांतून त्या पुन्हा अहिल्या होऊन उभ्या राहिल्या. ताई, पुनः पुन्हा मनुष्य पाषाणयुगांत जात असतो. पुनः पुन्हा त्यानें रामराज्यांत जायची धडपड करायची असते; पाषाणयुगांतून सुवर्णयुग आणायचें असतें."

"बरें पण थोडें जेवतोस ना?"

"लिलीला जवळ घेऊन जेवीन असें मनांत म्हणत आलों ग ताई!" असें म्हणत तो उठला. त्यानें अगोदर मोसंब्यांचा रस काढून अमृतरावांपाशीं नेला.

"थोडा रस घेतां ना?" त्यानें प्रेमानें विचारलें.

"कोण, रंगा? द्या. तुमचे थोर हात क्षमाशील आहेत. देवाकडे जातांना माझें जीवन सुंदर रंगवून पाठवा बरें का!"

"पश्चात्ताप झाला कीं जीवन सुंदर होतेंच."

रंगानें रस दिला. तो पाय चेपीत बसला.

"तुम्ही जेवा जा आतां. उशीर झाला आहे. बरीच रात्र झाली. जा जेवा." अमृतराव म्हणाले. रंगा उठला नि आंत गेला.

"ताई वाढ पान. तुझ्याही भावना मीं ओळखायला हव्यात." तो म्हणाला.

तिनें पान मांडलें.

"तूंही माझ्याबरोबरच बस. मागून कशाला?"

तिनें आपलें ताट वाढून घेतलें. दोघें जेवलीं. तिनें त्याच्यासाठीं स्वच्छ आंथरुण घालून दिलें. धुतलेली चादर, स्वच्छ अभ्र्याची उशी दिली. रंगानें आंथरुणावर अंग टाकलें. ताई स्वयंपाकघरांत पडली. मधूनमधून रंगा उठे. अमृतरावांजवळ बसे. असें चाललें होतें. तोंच उजाडलें.

"ताई, मी रजा घेऊन येतों चार दिवसांची." रंगा म्हणाला.

"इथूनच अर्ज टाक पोस्टांत. नको जाऊंस. मला एकटीला इथें भय वाटतें रे!" ताई म्हणाली.

"बरें तर. आणि बर्फ आणायला हवा. तूं आणतेस? मी त्यांचें स्पंजिंग करतों."

ताई बर्फ आणायला गेली. रंगानें अमृतरावांचें अंग कढत पाण्यानें पुसून काढलें. त्या रोग्याला किती प्रसन्न वाटलें! तो बोलूं लागला,

"रंगा! छान केलेंत. सारी घाण धुऊन टाकलींत. आतां देवाघरीं मान उंच करून जाईन. ती बघा लिली. माझ्या स्वागतासाठीं उभी आहे. तिच्या हातांत तुम्हीं काढलेलें एक चित्र आहे. मरतांना तिच्या आईनें चोरून ठेवलेलें एक चित्र तिच्या हातांत दिलें होतें. तुमची आठवण करी ती. ती बघा, रंगा! दिसते का तुम्हांला? जगांतले डोळे मिटूं लागले म्हणजे केवढें अफाट विश्व दिसूं लागतें, केवढी अदृश्य दुनिया दिसूं लागते. लिले, येतों हां बाळ!......"

अमृतराव बोलत होते. तोंच ताई बर्फ घेऊन आली. रंगानें त्यांच्या डोक्यावर पिशवी धरली. परंतु लक्षण ठीक नव्हतें. नाडीचे ठोके १४०! तो डॉक्टराकडे जावें म्हणतो, तों भर दुपारीं सारें शांत!

• • •

## वादळ : : : १५

रंगानें मृताचें सारें केलें. तो आतां ताईकडे राहात नसे. पहिल्या दिवशीं होता. नंतर येई जाई. आतां ताईचें काय करायचें हा प्रश्न होता. तें बिऱ्हाड मोडायचें का? ठेवूं म्हटलें तर भाडें कोठून द्यायचें? ताईचें फार शिक्षण नव्हतें झालेलें. लिही वाची. परंतु शेवटची परीक्षा कुठलीच नाहीं.

"ताई, तूं दुधगांवला जातेस? सुनंदाआईजवळ राहा. त्याही एकट्या असतात. आजारी असतात. त्यांना बरें वाटेल. मी तिकडे तुम्हां दोघींना पैसे पाठवीन. राहा दोघी शांतपणें. तूं पुढें शिकणार आहेस ना?"

"तुझी इच्छा असेल तर मी शिकेन."

"तुझी इच्छा हवी."

"मला इच्छा नाहीं. माझी सारी इच्छा मीं तुला दिली आहे."

समोर समुद्र उचंबळत होता. केवढी भरती! रंगा सागराकडे बघत होता नि ताई रंगाकडे बघत होती. कोणी बोलत नव्हतें. एकदम त्यानें तिच्याकडे पाहिलें. नि समोरच्या समुद्राकडे तो शून्य दृष्टीनें पाहूं लागला.

"तो समुद्र तुला आवडतो; आणि माझा हृदयसमुद्र नाहीं आवडत? थाड थाड लटा या हृदयांत उसळत आहेत. तुफान आहे हृदयांत. तूं ये नि शान्त कर. रंगा! रंगा, काय सांगूं? तूं का मला सोडून जाणार? रंगा! तूं माझा हो. माझा संसार पुन्हा मांड. बिऱ्हाड मोडायचें कशाला? पुन्हा मांडूं. छान मांडूं. माझें जीवन रंगव. लिली आपल्या पोटीं येईल. रंगा! मला निराश नको करूं. माझें जीवन तूं व्यापलें आहेस. माझ्या अणुरेणूंत तूं आहेस. माझा श्वासोच्छ्वास हा तुझाच श्वासोच्छ्वास आहे. या माझ्या देहांत असलेला आत्माही तुझा आहे आणि प्राणही तुझा आहे. रंगा! मला अनाथ करूं नकोस रे! तूं एका अबलेच्या जीवनांत आनंद आण. तिच्या जीवनाचें वैराण वाळवंट फुलवून प्रसन्न कर. माझी बाग उध्वस्त झाली आहे. तिथें साप, विंचू, दगडधोंडे माजले आहेत. तूं ये, आणि ती बाग फुलव. पुन्हा त्या बागेंत प्रेमाचीं कारंजीं उडूंदेत. प्रीतीचे ताटवे फुलूंदेत. आपण तिथें आनंदाचे झोले बांधूं. तूं आणि मी त्या झोल्यांवर झोके घेऊं. उंच उंच झोके घेऊं. आपणाला भय ना भीति. तूं बरोबर असलास कीं कसलें भय आणि कसली भीति? पण रंगा! तूं बोलत रे कां नाहींस? रागावलास का? तूंही माझ्यावर आग पाखडणार? पोळून भाजून निघालेल्याला आणखी भाजणार का? अरे, मी आतां तुझी ताई नाहीं. तुझी ताई मेली. कधींच मेली. मी आतां निराळी आहें. अगदीं निराळ्या नात्याची, निराळ्या वृत्तीची."

"तर मग अमृतराव म्हणत तें खरें. ते उगीच नाहीं रागावले." रंगा म्हणाला.

"त्या वेळचा माझा स्पर्श तुला बहिणीचा नाहीं वाटला? तुला ओळखतां आला असता तो स्पर्श. त्या वेळेला तूं माझा भाऊ होतास, मी तुझी ताई होतें. परंतु मला आतां निराळा रंग चढला आहे. मीही माणूस आहें. रंगा! गेले कित्येक दिवस, कित्येक महिने येतां जातां ते मला म्हणायचे कीं त्याच्यावर होतेंच तुझें प्रेम. कर कबूल. सारखी तुझी मूर्ति ते माझ्या डोळ्यांसमोर उभी करायचे. ते मला टांचण्या टोंचीत नि विचारीत. रात्रंदिवस तें ऐकून ऐकून तुझी ताई मेली नि निराळी तरुणी जन्माला आली. त्यांच्या बोलण्यांत जें येई तें माझ्यांत भिनूं लागलें. आणि शेवटीं माझ्या हृदयसिंहासनावर तुझी मूर्ति शोभूं लागली. मी तुझी प्रेमपूजा करूं लागलें. रंगा! हा घे हात. धर हा हात."

तिनें आपला थरथरणारा हात त्याच्या हातांत घुसडला. तो स्तब्ध होता.

“ताई! हें अशक्य आहे. तूं माझी ताईच आहेस. तशी ताईच राहा.”

“नको रे असें बोलूं! त्यापेक्षां या समुद्रांत मला बुडव, या वाळूंत मला तुडव.” तिनें त्याचे हात धरले. ती पुन्हा म्हणाली, “ने मला समुद्रांत. तुझ्या हातानें हें जीवन संपव. तुझ्या हातून येणारें जीवन वा मरण दोन्ही अमृतमयच आहेत.”

तो तिथें स्तब्ध उभा होता. वारा जोरानें वाहूं लागला. अकस्मात् ढग आले. पाऊस येणार!

“ताई! तूं घरीं जा. वादळ होणार आहे.”

“वादळ किती दिवस जीवनांत घों घों करीत आहे. आतां या वादळांत जीवनाचें हें लहानसें घरटें उध्वस्त होवो हीच इच्छा.”

“मीं जातों.”

“मग मी येणार तुझ्याबरोबर.”

“माझ्या खोलींत चार मित्र. तिथें कुठें येणार तूं.”

“तर मग तूं माझ्या खोलींत चल.”

“नाहीं. मी चाललों.”

तिचा हात दूर करून तो गेला. त्यानें मागें वळून पाहिलें नाहीं. ती तिथेंच उभी होती. वादळ घोंघावूं लागलें. मुसळधार पाऊस आला. कडाड् कडाड् वीज गरजली आणि कांहीं दिवे विझले. अंधार! ती मागें गेली. पावसांतून भिजत चालली. डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या. सभोंतीं वादळ, पाऊस, विजा. अंतःसृष्टींतही तोच प्रकार.

ती घरीं आली. तिनें लुगडें बदललें. केंस पुसले. ट्रंकेंतील रंगाचा फोटो काढून तो हृदयाशीं धरून ती पडली. ● ● ●

## दुधगांवला : : : १६

ताई दुधगांवला सुनंदाआईकडे राहायला गेली होती. ती तिथें सारें काम करी. सुनंदाआईना विसावा देई. एक दिवस आपण रंगाचें मन जिंकूं अशी तिला आशा होती. आपली सेवा, आपली तपश्चर्या फळेल असें तिला वाटत होतें.

' चित्रें रंगविणारा रंगा, तो का माझें जीवन भकास ठेवील ? त्याला माझी करुणा नाहीं का येणार ? परंतु करुणा म्हणजे प्रेम का ? मला हवें आहे तें अगदीं निराळें प्रेम आहे. संताला सर्व जगाविषयीं करुणा वाटतें. परंतु त्याची ती करुणा म्हणजे आसक्त प्रेम नसतें. तें निरपेक्ष प्रेम असतें. मी तशा प्रेमाची भुकेली आहें. मला देहाचें प्रेम हवें आहे. मी अजून साधी संसारी स्त्री आहें. माझ्या भुका सामान्य आहेत. पण असामान्य माणसें सामान्य जीवासाठीं खालीं नाहीं का येणार ! ' ती म्हणायची.

ती रंगाला पत्रें लिहायची. तीं पत्रें म्हणजे प्रेमाच्या श्रुति–स्मृति होत्या. कधीं कधीं रंगाला वाटे कीं वाचूंच नये तीं पत्रें. तोच त्यांत विषय असावयाचा. तीच अनन्त आळवणी. परंतु तो तीं वाचीत असे. आणि त्या पत्राला दोन चार ओळींचें पुढीलप्रमाणें उत्तर लिहून टाकी.

" प्रिय ताई !

तूं सुनंदाआईची सेवा करीत आहेस. धन्यवाद. तुझा भाऊ तुझा चिर-ऋणी आहे. तुझ्यासारखी बहीण मला देवानें दिली हें माझें केवढें भाग्य ! सुखी अस. सुनंदाआईना जप. तुझें मन शांत होवो. मी भाऊबीजेला घरीं येऊं ? तूं ओंवाळणार असलीस तर येईन."

तुझा
**रंगा**

असें तो लिहायचा. मग ती रागानें रुसून संतापून लिहायची. माझ्या मनांतील आगडोंब विझव, विझव असें प्रार्थायची. असे दिवस जात होते.

परंतु दरम्यान एक निराळीच घटना घडली. दुधगांवला नदीतटाकीं एका लक्षाधीशानें एक नवीन राममंदीर बांधलें. तें मंदीर फार प्रचंड नसलें तरी रमणीय होतें. तें सर्वांना मोकळें होतें. कुणीही यावें, बघावें, तेथें बसावें. त्या श्रीमंताला मंदिराच्या आंतील भिंतींवरून भारतीय संस्कृतींतील प्रसंग चितारून हवे होते. त्याला रंगाचें नांव कुणींतरी सांगितलें.

एके दिवशीं तो भला मनुष्य सुनंदाआईकडे आला. रंगा कुठें म्हणून विचारीत आला. सुनंदानें त्याचें स्वागत केलें. बोलणें झालें.

" आम्ही गरीब आहोंत. मुंबईची नोकरी सोडून तो कसा हो येणार इकडे ?" सुनंदा म्हणाली.

" मी त्यांचे श्रम वायां जाऊं देणार नाहीं. प्रसंग सारे रंगवून होईपर्यंत मी त्यांना महिना दोनशें रुपये देईन. आणि सर्व भिंती रंगवून झाल्यावर वर कांहीं तरी प्रेमभेट देईन."

" तुम्ही त्याला स्वातंत्र्य द्याल ना? तुम्ही तुमच्या कल्पना, इच्छा त्याला सांगा. परंतु प्रसंग कोणते रंगावायचे हें शेवटीं त्याला ठरवूं दे. त्याच्या प्रतिभेला, कल्पनेला बंधनें नका घालूं."

" कलावंताला कोण बांधील आई ?"

" आजकाल तर सारे बांधतात. कलावानही अगतिक होऊन बद्ध होतात."

" मी तसा नाहीं. दुधगांवचें हें मंदीर सुंदर होवो. तेथील प्रत्येक वस्तु स्फूर्ति देणारी होवो. माझ्या मनांत अनेक गोष्टी येतात. परंतु आज नाहीं बोलत. माझे विचार समजणार तरी कुणाला असें कधीं कधीं मनांत येतें."

" ते रंगाला समजतील. तो फार उदार व थोर मनाचा मुलगा आहे."

" त्यांना बोलवा इथें. असा ध्येयवादी चित्रकार आम्हांला लाभला तर आणखी काय हवें? खरेंच, मी त्यांचे श्रम वायां नाहीं जाऊ देणार."

" लिहितें."

तो श्रीमंत मनुष्य निघून गेला. कुठला तो, कुठून आला? दुधगांवचाच का? असे कसे त्याचे विचार? तो भांडवलदार नव्हता वाटतें? भांडवलदार लाखों रुपयांच्या देणग्या देतील. धर्मशाळा बांधतील. मंदिरें उभारतील. सोन्याचे कळस बांधतील. परंतु त्यांचें सारें वैभव ज्यांच्या घामांतून निर्माण होतें त्यांना ते विसरतात. कामगारांना सुंदर चाळी बांधून देणें, त्यांच्या जीवनांत आनंद येईल असें करणें, ही गोष्ट मंदीर बांधण्याहूनही पवित्र आहे. तिथें हजारों कामगार—हीं देवाचीं चैतन्यमय रूपें—देवाच्या प्रत्यक्ष मूर्ती आनंदानें नांदतील ही कल्पनाच त्यांना येत नाहीं. कामगारांच्या चाळींतून अंधार आणि ज्ञानस्वरूप परमेश्वराच्या मूर्तीजवळ, त्या मंदिरांत विजेच्या दिव्यांचा झगमगाट. इकडे श्रमणाऱ्यांना खायला नाहीं तर देवासमोर अन्नकोट रचले जातात !

हा सारा अज्ञानाचा परिणाम आहे. समाजांत सर्वांचा विकास सारखा होतो असें नाहीं. कुणाची कशी वाढ, तर कुणाची कशी. कुणाच्या या वृत्तीचा विकास, तर कुणाच्या त्या. नांवें कुणीं कुणाला ठेवावीं? मंदीर बांधणाराला वाटत असेल, कीं इथें हजारों लोक येतील; क्षणभर प्रभूसमोर उभे राहतील.

विनम्र होतील. थोडा प्रकाश आणि आनंद जीवनांत घेऊन जातील. चाळी बांधणारांना वाटतें, चाळी बांधून जीवनांत थोडें तरी सुख आणतां येईल. परंतु थोर, नैतिक, विश्वव्यापी सहानुभूतीची भावना त्यांत कुठून येणार ? कुठून मिळणार ती ? ती केवळ पोटभर भाकर देऊन, अंगभर कपडा देऊन, सिनेमा दाखवून येईल का ? केवळ सुखाची रास मिळावी म्हणूनही मानव 'मानव' या अर्थानें सुधारेल असें नाहीं. परंतु सुखांत अष्टौप्रहर लोळणारांना मात्र हें म्हणणें शोभत नाहीं. पैसा म्हणजे माया, हें वाक्य पैसेवाल्या भांडवलदारांच्या तोंडीं शोभत नाहीं. सर्वांच्या जीवनाच्या गरजा तर भागायलाच हव्यात. बुद्धदेव म्हणतात कीं उपाशी मनुष्याला अन्नाच्या भाषेंत, अन्नाच्या प्रत्यक्ष चवीच्या मार्गानेंच धर्म शिकवायला हवा. आपले आजचे बुद्धदेव महात्माजीही म्हणतात कीं जोंवर पोटभर अन्न मला सर्वांना देतां येत नाहीं तोंवर त्यांना रामनाम तरी कोणत्या तोंडानें शिकवूं मी ? जगाला अशा या धडपडींतून पुढें जायचें आहे. ● ● ●

## कसोटीची वेळ : : : १७

सुनंदानें रंगाला तें सारें वृत्त कळविलें. तिनें त्यांत त्याला आणखी ता. क. लिहिलें: "तूं इथें आलास तर किती छान होईल ! मुंबईच्या कोंदट हवेंत तुला राहावें लागतें. ती दुसऱ्यांची ताबेदारीची नोकरी. रंगा ! तूं इकडेच ये. आपण एकत्र राहूं. तुझी प्रकृति बरी नसते असें ताई म्हणाली. प्रकृति बरी तर सारें बरें. तुला त्यांचीं स्वप्नें पूर्ण करायचीं आहेत. भारताचें नांव दिगंत करायचें आहे. यासाठीं तूं प्रकृतीची काळजी घेतली पाहिजेस. इथें तें सारें नीट जमेल."

रंगाला तें पत्र मिळालें. त्याला अलीकडे जरा बरें वाटत नसे ही गोष्ट खरी. तो खिन्न व सचिंतही असे. सुनंदाआईजवळ राहायला त्याला मिळालें असतें. परंतु ताईचा प्रश्न होता. तो तिच्यापासून दूर होता म्हणून सारें ठीक होतें. तरी तिचीं तीं पागल पत्रें येतच असत. असें असतां दुधगांवला कसें व्हायचें ?

'परंतु मला तिची ही भावना जिंकून घेतलीच पाहिजे. माझी भावना निर्मल आणि प्रभावी असेल, तर मी तिला माझी आई करीन. माझी बहीण करीन. तिची भ्रांत मनोवृत्ति निवळेल. मोहापाशीं राहून मोहरपासून अलिप्त राहणें यांतच खरा पुरुषार्थ असतो.' तो मनाशीं निर्धारी भाषेंत होता.

अखेर त्यानें जायचें ठरविलें. मुंबईचा गाशा गुंडाळला. अनेक मित्रांना तो म्हणाला, " उद्योग करीन. तिथें माझ्या लहानग्या घरांत महान् संस्था सुरू करीन. माझी खोली म्हणजे माझ्या ध्येयाचें मंदीर. 'भारत–चित्रकला–धाम' अशी संस्था मला निर्मायची आहे. ती माझ्या मनांत आहे. दुधगांवला ती स्थापीन. घरावर पाटी लावीन. तुम्ही या मधून मधून दुधगांवला. तुमच्या नवनवीन शहरी कल्पना घेऊन या मला भेटायला. दुधगांवचा धबधबा, तेथील राममंदीर, मंदिरांतील मी आतां काढीन तीं चित्रें–सारें बघायला एकदां या. रंगाला विसरूं नका."

रंगा भेटून सर्वांचा निरोप घेऊन निघाला. तो घरीं आला. सुनंदाला किती आनंद झाला!

" रंगा! आपण एके ठिकाणीं राहूं. आतां कुठें जाऊं नकोस. इथेंच शांतिनिकेतन. इथेंच विश्वभारती. इथेंच अजिंठा. इथेंच घारापुरी. भारतांतील सारी कला आतां इथें येईल. तूं नको कुठें जाऊंस." सुनंदा म्हणाली.

" जशी आई! तुझी इच्छा. तुझा आनंद तो माझा आनंद." रंगा म्हणाला.

मग रंगा राममंदिरांत गेला. ते श्रीमंत गृहस्थ तिथेंच होते. दोघांचें संभाषण झालें. रंग, कुंचले सारें सामान तिथें होतें. कशाची उणीव नव्हती.

" जें लागेल तें मागा. पण या भिंती सजीव करा, भारताचीं ध्येयें पुकारणाऱ्या करा. तुमच्या बोटांत ती जादु आहे. माझ्या स्वप्नांत रामचंद्रप्रभु आले. म्हणाले, दुधगांवला जा. तिथें मंदीर बांध. काय असेल तें असो. मी इथें आलों. हें लहानसें मंदीर बांधलें. इथेंच प्राण जावोत." ते श्रीमंत गृहस्थ म्हणाले.

ठरलें. कामाला आरंभ झाला. तें मंदीरच रंगाचें घर झालें. तो घरीं फारसा जातच नसे. तिथेंच नदींत स्नान करी. ताई त्याचें जेवण घेऊन येत असे. कधीं सायंकाळीं सुनंदा त्याचीं चित्रें बघायला येई. गांवांतील मुलें येत, कामगार येत, इतर मंडळीही येई. रंगा कामांत रंगलेला असे.

एके दिवशीं सायंकाळीं थकून रंगा नदीतटाकीं बसला होता. सायंकाळ संपून रात्र पसरली. त्याला भान नव्हतें. त्या अंधारांतच तो होता. जणूं ध्येयाची देदीप्यमान सृष्टि बघत होता.

कुणीं तरी तेवढ्यांत हांक मारली, " रंगा!"

" कोण आहे?" त्यानें भानावर येऊन विचारलें.

“मी.”

“ताई! इथें अंधारांत कशाला आलीस?”

“प्रकाश मिळवायला.” असें म्हणून ताईनें त्याच्या खांद्यावर मान ठेवली. कढत श्वास, कढत अश्रु. तो स्तब्ध होता.

जराशानें तो म्हणाला, “ताई! अशक्य तें मला सांगूं नकोस.”

“तर मग या नदीच्या डोहांत मला लोट!”

“लोटणारा मी कोण? कां उगीच तूं मला दुःख देतेस?”

“आणि तूं नाहीं ना मला दुःख देत? मग रात्रंदिवस माझ्या जीवनांत घुसून कोण मला सतावीत आहे रे?”

“तूं तुझ्या मनाचें दार बंद कर. तिथून मला घालव.”

“ती शक्ति मला नाहीं रे! माझ्या मनाला दारें नाहींत. सगळीकडे तूंच भरून उरला आहेस. नको रे असा कठोर होऊं!”

तोंच देवळांत आरती सुरू झाली.

तो उठला. ती तिथेंच होती. तो मंदिरांत जाऊन प्रभूच्या मूर्तीसमोर सद्गदित होऊन उभा राहिला. उघड्या डोळ्यांनीं बघतां बघतां शेवटीं डोळे मिटून उभा राहिला. आरती संपली. तीर्थप्रसाद झाला. लोक गेले.

“रंगा! जेवतोस ना?” ताईनें विचारलें.

“तूं आरतीला नाहीं आलीस?”

“मी माझ्या देवाची आरती बाहेर करीत होतें. माझा देव तूं, तुझा देव प्रभु रामचंद्र. ज्यानें त्यानें आपल्या देवाची पूजा करावी. जेव, मी वाढतें.”

“तूं आतां घरीं जा. आई वाट बघत असेल.”

“मी नाहीं घरीं जात. जिथें तूं तिथें मी. मी इथेंच राहीन.”

“ताई! नको ग त्रास देऊं. हें राममंदीर विलासमंदीर का करायचें आहे? काय बोलतेस? घरीं जा.”

ती रडूं लागली. तो उठला. त्यानें आपले कुंचले घेतले. तो चित्र रंगवूं लागला. तें सूरदासाचें चित्र होतें. सूरदासासमोर वेश्या उभी आहे. सूरदासाच्या हातांत त्यानें काढून घेतलेले स्वतःचे डोळे आहेत. डोळ्यांतून रक्त त्या नेत्रकमलावर पडत

आहे.' ज्या माझ्या डोळ्यांनीं तुला मोह पाडला, रामाची आठवण द्यायच्या ऐवजीं कामाची आठवण दिली, ते डोळे कशाला ठेवूं?' असें सूरदास विचारीत आहे.

"रंगा! हा कोणता प्रसंग?" ताईनें विचारलें. सूरदासाचे डोळे पाहून भाळलेल्या त्या वेश्येची कथा त्यानें सांगितली. डोळे काढून सूरदास तिच्याकडे जातो व सांगतो कीं 'माझ्या हातांनीं हे भुलवणारे डोळे दूर केले. आतां तूं रामाकडे वळ.' ताई ऐकत होती.

इतक्यांत सुनंदा तेथें आली.

"अग घरीं नाहीं का यायचें? मीं म्हटलें आली नाहींस तें रंगाला बरें नाहीं कीं काय?"

"यांना जेवा जेवा म्हणतें आहें. परंतु ऐकतील तर!"

"काय रे रंगा! जेवायचें नाहीं का? रात्रंदिवस काम करून तुलाही मरायचें आहे! काय ही प्रकृति!"

"रामनवमीपर्यंत पुरें व्हायला हवें सारें आई!"

"होईल पुरें."

सुनंदा नि ताई गेल्या. रंगानें जेवण केलें. मग मध्यरात्रीपर्यंत तो रंगवीत होता. नंतर बाहेर पडला. थंडगार वारा वाहात होता. आकाश किती फुललें होतें. सृष्टींतील विश्वसंगीत तो ऐकत होता. त्या विराट् मूकसंगीतांतील तोही एक तान बनून गेला. तिथेंच नदीतटाकीं एका शिलाखंडावर तो झोंपला.

तो जागा झाला तों त्याच्या चरणाशीं त्याला फुलें आढळलीं. जवळच फुलांचा एक हार होता. ताई का येऊन गेली? तो उठला. तो मंदिरांत गेला. तेथें ताई प्रभूसमोर उभी होती. तोही शेजारीं उभा राहिला. दोघांनीं डोळे उघडले.

"ताई! तूं देवाजवळ काय मागितलेंस?"

"मागितलें कीं रंगा मला दे. तूं काय मागितलेंस?"

"मागितलें कीं ताईला माझी बहीण कर."

ती न बोलतां निघून गेली.

• • •

रंगा मंदिरांत चित्रसृष्टींत रंगला होता. आज घरीं एक मोठें पत्र आलें होतें. तें मुंबईहून इकडे परत पाठवण्यांत आलेलें होतें. पत्र युरोपांतून आलें होतें. ताईच्या तें हातीं पडलें. कुणाचें तें पत्र? तिला शंका आली. तिनें तें पत्र फोडलें, वाचलें.

"प्रिय रंगा!

तुला मी परत भेटलें नाहीं. मी साधी सामान्य मुलगी. मी दुरून तुझी प्रेमपूजा करीत असतें. मी बाबांबरोबर युरोपच्या प्रख्यात चित्रशाळा बघत हिंडत आहें. तूं बरोबर असतास तर? परंतु तुला मिंधेपणा वाटला. तुम्ही पुरुष मोठे स्वाभिमानी असतां. स्त्रिया प्रेमाला सर्वस्व देतात. आज एका सरोवराच्या तीरावर मी आहें. अद्भुत दृश्य. परंतु मी तुझ्या प्रेमसरावरांत विहरत आहें. इथलीं सुंदर फुलें तोडून मी पाण्यांत सोडीत बसतें. तुझें नांव घेतें नि फूल पाण्यांत सोडतें.

युद्धाचें वातावरण सर्वत्र आहे. केव्हां भडका उडेल नेम नाहीं. बाबा परत फिरायचें म्हणत आहेत. मीही यायला उतावीळ आहें. तुला बघायला भेटायला येऊं? पुन्हा दहींभात जेवूं घालशील? परंतु त्यावर किती दिवस समाधान मानूं? तूं माझ्या हातचा दहींभात खाणारा नाहीं का होणार?

बाबांजवळ मी अजून बोललें नाहीं. परंतु माझी जीवनगंगा तुझ्या जीवन-सागरांत विलीन व्हायला अधीर झाली आहे. बाबा तिला रोखूं शकणार नाहींत. त्यांचें प्रेम, त्यांची संपत्ति, सारें सोडून नयना तुझ्याकडे येणार. 'मी आवडत असेन तर गरीब होऊन ये. मला श्रीमंत करण्यापेक्षां तूंच कां नाहीं दारिद्र्याला वरीत?' असें तूं म्हणाला होतास. येतें आतां. दारिद्र्याला वरून मग तुला वरायला येतें.

रंगा! माझें जीवनचित्र रंगवणारा तूंच हो.

तुझी
नयना"

ताईच्या हातांत तें पत्र होतें. शेवटीं तिनें त्या पत्राचे तुकडे तुकडे केले. त्या पत्रांत एक फोटो होता. तो तिनें फाडला. तुकडे करून ती रडत बसली. नंतर पुन्हा ते जुळवून बघत होती!

रंगाचीं चित्रें संपत आलीं होतीं. रंगपंचमीच्या दिवशीं रात्रीं तें शेवटचें चित्र तो रात्रभर रंगवीत होता. कुंचल्याचा शेवटचा स्पर्श करून तो उठला. प्रभूच्या समोर त्यानें लोटांगण घातलें.

परंतु इतक्यांत दुष्ट वार्ता कानीं आली कीं शेठजींची हृदयक्रिया बंद होऊन ते अकस्मात् देवाघरीं गेले. रात्रीं निजले ते निजले. सकाळीं नोकर उठवायला गेला तों सारा खेळ खलास. डॉक्टरांनीं हृदय थांबलें म्हणून निर्णय दिला. रंगानें जाऊन त्यांना अखेरचा प्रणाम केला.

मुंबईहून शेटजींची कौटुंबिक मंडळी आली. सारे विधि झाले. शेठजींनीं मृत्युपत्र केलें होतें कीं नाहीं कोणाला ठाऊक ! त्यांच्या मुलानें मंदिराची कांहीं व्यवस्था केली. रंगा त्यांना भेटला. त्यांनींच त्याला बोलाविलें होतें.

" तुमचें कांहीं देणें आहे का ! तुम्हींच काढलींत तीं चित्रें ? "

" मींच काढलीं."

" तुम्ही मुंबईस याल चित्रें काढायला ? "

" नाहीं. मी धंदेवाईक नाहीं."

" ठीक. तुमचें कांहीं देणें ? "

" सारें चुकतें झालेलें आहे. मी येतों. बसा आपण."

रंगा निघून गेला. त्या धनपूजकांचा वारा त्याला सहन होईना. शेठजी शेवटीं प्रेमाची देणगी देणार होते. परंतु रंगाच्या तोंडून शब्दही बाहेर पडला नाहीं.

अपरंपार श्रमानें रंगा आजारी पडला. सुनंदा त्याच्याजवळ बसे. कांहीं दिवसांनीं त्याला बरें वाटलें. त्यानें घरावर 'भारत–चित्रकला–धाम' म्हणून स्वतःच्या हातानें रंगवून लिहून पाटी लावली. एका खोलींत भिंतीवर त्यानें स्वतःचीं व इतर कांहीं चित्रें लावलीं. कांहीं बोधवाक्येंही लावलीं.

अमेरिकेंत चित्रांचें एक जागतिक प्रदर्शन भरणार आहे असें त्यानें वाचलें. आपणही त्यासाठीं चित्रें तयार करावीं असें त्याच्या मनानें घेतलें. चित्रासाठीं भारतदर्शन म्हणून एक योजना तयार केली. भारतांतील रम्य ग्रामीण जीवन, भारतांतील निसर्ग, भारतांतील ध्येयें, भारतांतील दारिद्य, नवभारताचीं समाज-वादी स्वप्नें अशा अनेक कल्पना त्यानें मनासमोर मांडल्या. नवभारताच्या

निर्मात्यांचीं कांहीं चित्रेंही त्यांत होतीं. अशी ती महान् योजना होती. तो त्या योजनेवर रात्रंदिवस खपूं लागला.

परंतु ते कष्ट त्याला झेपेनात. त्यानें पुन्हा आंथरूण धरलें.

आई म्हणायची, "रंगा! किती रे श्रमायचें? हळूहळू काम नाहीं का करतां येणार?"

तो त्यावर म्हणायचा, "आई! जगांत हळूहळू करून कसें चालेल? मृत्यु तर झपाट्यानें पुढें येत असतो. त्याची भेट व्हायच्या आंत आपलें कार्य पुरें व्हायला हवें."

"अशानें आपणच मृत्यूला जवळ ओढून आणतों. नाहीं का?"

अलीकडे ताई रंगाजवळ बोलत नसे. ती दूर असे. दूर बसे. ती गंभीर झाली होती. रंगाला त्यामुळें बरें वाटे. परंतु तिनें बोलावें, आनंदी असावें, असें त्याच्या मनांत येई. मनांत प्रसन्नता फुलण्यापूर्वीची ती वेदना असेल असा तो तर्क करी. पहाटेपूर्वीचा तो अंधार असेल असें मनांत म्हणे.

तोंच जगांतील महायुद्ध पेटलें. नयना कुठें होती? रंगा मनांत म्हणे, ती परत आली असेल का?

रंगाला अलीकडे फारच थकवा आला होता. तो वेळ जात नसे म्हणून थोडें काम करी इतकेंच. परंतु लगेच थके. पुन्हा पडून राही. ● ● ●

## अंतरींची ओढ : : : १९

एके दिवशीं अकस्मात् पंढरी आला. तो रुबाबदार लष्करी पोषाखांत होता.

"काय रे, मरत पडलास वाटतें?" रंगाला पाहून त्यानें विनोदानें विचारलें.

"तूंही मरायला चाललास ना?"

"मरायला नि मारायला. जगांत दुसरें आहे काय?"

"पंढरी! तुला कुठें पाठवणार आहेत?"

"अरे तें का आम्हांला सांगतात? कुणी म्हणतात इराणांत, कुणी म्हणतात आफ्रिकेंत. हरि जाणे. तुला शेवटची मिठी मारायला आलों आहें. रंगा! हें तूं दिलेलें भारतमातेचें चित्र. हें खिशांत असतांना मरण येऊं दे. कुठेंही मेलों तरी भारतमाता जवळ आहे. पण या कोण?"

" ही ताई. तुला पुरणपोळी केली होती ना, तेव्हां यांच्याकडचाच पाटावरवंटा आणला होता."

" त्यांची ती छोटी लिली. मोठी गोड मुलगी, नाहीं?"

" ती मुलगी गेली रे! ताईंचे यजमानही गेले. ती आतां इथेंच असते. भावाजवळ बहीण आहे. दुर्दैवी बहीण."

" रंगा! जगांत कोण सुदैवी आहे? अरे तुला मीं गालिचा आणला आहे. त्या अफगाणानें दिलेला. तो तुझ्याकडे ठेव. तुला सर्व जगाचें प्रेम हवें असतें. होय ना? मी साऱ्या वस्तु तुझ्याकडे घेऊन आलों आहें. सुंदर सुंदर कलात्मक वस्तु. मला जगांत तूंच एक आहेस. तुझें घर तेंच माझें. जिवंत कधीं आलों परत तर भेटूं."

पंढरी रंगाचा हात हातांत घेऊन बसला.

" बरें आतां उतर तुझें खोगीर." रंगा म्हणाला.

पंढरी उठला. त्यानें लष्करी पोशाख उतरला. धोतर शर्टमध्यें तो किती सुरेख दिसत होता.

सायंकाळीं ताईबरोबर पंढरी राममंदीर, धबधबा सारें बघायला गेला. रंगाचीं मंदिरांतील चित्रें पाहून तो तन्मय झाला.

" रंगा जादुगार आहे." तो म्हणाला.

" तुमच्या मित्राची तुम्ही करालच स्तुति." ताई म्हणाली.

" तुम्हीही त्याची स्तुति कराल. बहिणीला भावाची स्तुति का आवडत नाहीं?"

" भाऊ आजारी आहे. त्याला पत्र पाठवा."

" आम्हांला कशीं पत्रें पाठवतां येणार?"

" ते तुमची आठवण काढीत. नयनाचीही आठवण काढीत. ते आतां फारच थकले आहेत."

" आणि नयना कुठें आहे?"

" ती यूरोपांतून आली कीं नाहीं कळलें नाहीं."

" तिचें रंगावर प्रेम आहे."

" असें! आणि तुमचें कुणावर आहे?"

" शिपाई मी. शिपायाचें प्रेम मरणावर."

" शिपाई वाटेल तिथें प्रेम करतो."

" इतका प्रेमवेडा नाहीं मी."

ती दोघें बोलत बोलत घरीं आलीं.

रात्रीच्या गाडीनें पंढरी निघाला. तो सुनंदाआईच्या पायां पडला. त्याचे डोळे भरून आले. सर्वांचेच भरून झाले.

टांगा आला. ताई, पंढरी टांग्यांत बसलीं. सुनंदा रंगा दारांत उभी होतीं. गेला टांगा. रंगाला एकदम घेरी आली. सुनंदानें कसातरी आधार देऊन त्याला आंथरुणावर निजविलें. ती त्याच्याजवळ बसून राहिली. थोड्या वेळानें त्यानें डोळे उघडले.

" बरें वाटतें आतां आई." तो म्हणाला.

" तूं थकलास हो रंगा ! "

तोंच तिकडे गाडी स्टेशनांत आली. दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत पंढरी बसला. ताई बाहेरून पंढरीशीं कुशलसमाचाराच्या गोष्टी बोलत होती.

डब्यांत डोकावून पाहून ती म्हणाली, " हा दुसऱ्या वर्गाचा डबा वाटतें. मीं कधीं पाहिला नव्हता. आंत पंखाही आहे वाटतें."

" साहेबाच्या डब्याला सारें कांही असतें." असें म्हणत त्यानें पंखा सुरू केला.

" का हो पंढरी ! तुमचा फोटो नाहीं एखादा ?"

" आहे. द्यायलाच विसरलों." असें म्हणत त्यानें ब्यागेंतून तीन चार फोटो काढून दिले. नंतर त्यानें खिशांतून एक फोटो हळूच काढला. तो हातांत लपवीत म्हणाला, " यांत कोण असेल ओळखा पाहूं ! "

" असेल एखादी सुंदर काश्मिरी नारी."

त्यानें मुकाट्यानें हंसत हंसत हात पुढें केला. त्या फोटोंत रंगा आणि तो दोघे होते. तो त्यांचा लहापणाचा फोटो होता.

" हा आणि भारतमातेचा असे दोनच फोटो नेहमीं माझ्या अगदीं जवळ असतात. रंगा आणि भारतामाता. दोनच माझीं नातेवाईक."

तोंच गाडीची शिटी झाली.

" जिवाला जपा, सुखरूप परत या." ताई म्हणाली. गाडी चालूं लागली.

• • •

कांहीं दिवस गेले. दुधगांवच्या स्टेशनवर एक मुलगी उतरली.

"इथें भारत–चित्रकला–धाम कुठें आहे?" तिनें स्टेशनाबाहेर टांगेवाल्याला विचारलें.

"आहे माहीत. बसा. तो रंगारी ना? राममंदिरांत चित्रें काढणारा. फार छान चित्रें बघा. जो येतो तो बघायला जातो. फार चांगला माणूस. बसा."

ती टांग्यांत बसली. टांगेवाल्यानें घराशीं टांगा आणला.

"कोण पाहिजे?" ताईनें पुढें होऊन विचारलें.

"रंगा इथें राहतात?"

"होय. या."

सामान आंत आणण्यांत आलें. टांगा गेला. रंगा पडून होता. ती आलेली व्यक्ति एकदम रंगाजवळ जाऊन बसली नि त्याची अवस्था पाहून स्फुंदूं लागली.

"कोण, नयना? तूं आलीस?" असें विचारीत तो उठूं लागला. तो थरथरत होता. तिनें त्याला झोंपविलें. तो पुन्हा डोळे मिटून पडला. ती त्याच्या केंसावरून हात फिरवीत होती. त्याला थोपटीत होती. मध्येंच ती वांकली. तिनें आपलें डोकें त्याच्या डोक्यावर ठेवलें.

अमळशानें ताईला पाहून नयना उठून घरांत गेली. जणूं तिचेंच घर. दुपारचीं जेवणें झालीं. मग युरोपांतून आणलेलीं चित्रें ती रंगाला दाखवीत होती. तिकडच्या हकीगती सांगत होती. रंगा ऐकत होता. सुनंदाही खालीं चटईवर बसून एकीकडे चरखा कांतीत ऐकत होती.

मग ताईनें सर्वांना चहा करून आणला. चहा घेऊन झाल्यावर ताई, सुनंदा मंदिरांत गेलीं. रंगा आणि नयना तिथें होतीं. परंतु कुणीच बोलत नव्हतें. अखेरीला नयनाच म्हणाली, "रंगा! शेवटीं मी आलें आहें. नदी सागराकडे आली आहे."

"तुझे वडील काय म्हणाले!"

"मी अजिंठा पाहून येत्यें म्हणून सांगून आल्यें. त्यांना आतां मी पत्र लिहीन कीं नयना आतां तुमची नाहीं."

"तूं वेडेपणा करीत आहेस. नयना! मी आतां फार दिवस वांचणार नाहीं. मरणोन्मुखाशीं कशाला लग्न लावतेस बरें?"

"रंगा! नको असें बोलूंस. कांहीं असलें तरी मी परत जाण्यासाठीं आलें नाहीं."

"किती तुला समजावूं नयना! माझी घटका भरत आली आहे."

" तूं कसा जाशील ? मी तुला बरा करीन. तुला थंड हवेवर घेऊन जाईन. महाबळेश्वर, माथेरान, उटी, कुठें नेऊं सांग. बाबा मला पैसे देतील. तें रागावणार नाहींत. प्रथम क्षणभर रागावतील; पण पुन्हा पोटच्या गोळ्याला जवळ करतील. तें उदार पितृ–हृदय कठोर कसें बरें होईल ? शेवटीं माझ्या कृतार्थतेंतच त्यांची कृतार्थता आहे. तें कांहीं नाहीं. रंगा ! मी आतां इथून जाणार नाहीं. जाण्यासाठीं आल्येंच नाहीं मी. मला तुझी होऊं दे."

" पण मी मृत्युपंथाचा यात्रेकरू आहें ना ? मी तुला साथ काय देणार !".

" आपण सारींच मृत्युपंथाचे यात्रेकरू आहों."

" होय. पण माझी यात्रा आतां संपत आली आहे. तुला अजून पुष्कळ यात्रा करायची आहे. उमेद आहे तुझ्या अंगांत, ताकद आहे. तूं जग. माझीं ध्येयें पुरीं कर. अमेरिकेंत चित्रांचें जागतिक प्रदर्शन भरणार होतें. त्या प्रदर्शनासाठीं मीं कांहीं सुंदर चित्रें तयारही केलीं आहेत. अजून तीं सारीं पुरीं नाहींत झालीं. थकवा येतो मला. माझ्या हातून तीं पुरीं होतीलसें दिसत नाहीं आतां. तूं कर तीं पुरीं."

" अरे, तुला कळलें नाहीं ? तें प्रदर्शन तहकूब झालें आहे. हें महायुद्ध आलें ना मध्यें !"

" युद्ध केव्हांतरी संपेल. त्यावेळीं कुणीतरी पुन्हा जीवनाकडे वळतील. मी कांहीं त्या वेळीं नसेन. पुन्हा प्रदर्शन भरेल तेव्हां तूं हीं चित्रें पाठव."

रंगा काय बोलतो इकडे नयनाचें लक्ष नव्हतें.

" हीच लग्नघटका आपण समजूं! रंगा, या जगांत तुझी म्हणून मला जगूं दे म्हणजे पुरे. तुझा देह जाणारच असेल तर त्याला काय उपाय ? परंतु मी तुझ्या देहाशीं केवळ लग्न लावीत नसून तुझ्या थोर आत्म्याशीं लावीत आहें. तो आत्मा अमर आहे. तो कोण हिरावून नेईल ? रंगा ! हे तुझे हात माझे होऊं देत. सातजन्मांचे माझे." तिनें त्याचे हात हृदयाशीं धरले.

थोड्या वेळानें नयना उठून वरती गच्चींत जाऊन बसली. राममंदिराचा कळस दुरून दिसत होता. कितीतरी वेळ ती तशी बसली होती. सुनंदाआई आली तरी तिला कळलें नाहीं.

" नयना ! चल खालीं. गार वारा सुटला आहे. पाऊसही येईल." सुनंदाआई म्हणाली.

नयनाचा निश्चय अढळ होता. ती सुनंदाला म्हणाली, "ताई, मी थोडे दिवस घरीं जाऊन येतें. बाबांना सांगून येतें. ते वळले, तर प्रभूची कृपा. आमच्या लग्नाला ते आशीर्वाद देतील. मग मी रंगाला घेऊन कुठें तरी चांगल्या हवेच्या ठिकाणीं जाईन. चांगल्या हवेवर तो बरा होईल. तो इतक्यांत तुम्हां-आम्हांला नाहीं सोडून जाणार. त्याच्या कलेची गुलाबकळी नुक्ती उमलते आहे. ती पुरी फुलून तिचा सुगंध सगळीकडे दरवळेपावेतों तो जाईल तरी कसा ? मग काय, येऊं ना जाऊन घरीं ?"

ताई गहिवरून म्हणाली, "ये बाळ ! तुझें प्रेम पाहून मला सावित्रीची आठवण झाली. सत्यवान् हें जग सोडून जाणार असें उघड दिसतांना तिनें त्याला माळ घातली. तुझी प्रीति आणि निष्ठा सावित्रीच्या तोलाची आहे. ये जाऊन. तुझे वडील तुला दूर लोटणार नाहींत. थोडा वेळ रागावतील, रुसतील, पण पुन्हा तुला जवळ घेतील. ये जाऊन तूं."

● ● ●

## दिवा विझतांना : : : २०

**नयना** आज सायंकाळच्या गाडीनें माघारी जाणार होती. हल्लीं घरांत तीच स्वयंपाक करी. कधीं संध्याकाळीं ताई करी. ताई आतां विरक्ताप्रमाणें वागे.

"नयना, लौकर ये परत. रंगाची मला काळजी वाटते. भाऊ वरून आनंदी दिसला, हंसला खेळला, तरी त्याचें जविन पोखरलें गेलें आहे."

"मी त्याला कुठेंतरी नेईन ताई !"

"परंतु वडील नाहीं प्रसन्न झाले तर ?"

"तर मी कुठेंतरी नोकरी करीन; आणि तुम्ही भाऊला घेऊन कुठें तरी हवेच्या ठिकाणीं राहा. मी मुंबईला मुलींचा चित्रकला वर्ग चालवीन. रंगाला मी मरूं देणार नाहीं. तुम्ही त्याची घ्याल ना काळजी ? मी लागतील तितके पैसे पाठवीन." नयना म्हणाली.

ताईला कांहींतरी बोलायचें होतें. पण बोलवेना.

"नयना, कशाला हीं फुकट बोलणीं ?" ताई म्हणाली,"माझीं दुःखें, माझ्या निराशा, माझा चंचलपणा, सारें मला भोगूंदे. अनुभवूंदे. माझ्या जीवताची असारता आणि भेसूरता मला अनुभवूंदे. तूं घरीं जाऊन ये. कांहींही करून रंगाला

वांचवा. तांतडी करायला हवी. या दहाबारा दिवसांत तर तो अधिकच थकला आहे, तरी देखील चित्रें काढीत बसतो."

"तेंच त्याचें अमृत रसायन ग ताई! तोच त्याचा प्राण."

"पण मला सांग, ज्याचें मरण बहुत करून लौकर ओढवणार असें स्पष्ट दिसतें आहे, अशाशीं लग्न करायला तूं तरी कशी तयार झालीस?"

"अग, मला त्याचें मरण दिसतच नाहीं मुळीं. मला त्याची अमर, अज, अजित अशी घवघवीत मूर्ति दिसते. विश्वाच्या रंगानें नखशिखान्त आंत बाहेर रंगलेला रंग दिसतो मला."

"तूं काय बोलतेस तें समजत नाहीं बाई मला. तुझी ताई म्हणजे एक अडाणी स्त्री आहे बघ."

"बरें. चल आतां रंगाला कांहीं खायला द्यायला हवें ना?"

लगेच दोघीजणी आंत गेल्या. रंगासाठीं त्यांनीं थोडा सांजा केला. नयनानें त्याला भरवला. तो पडूनच होता.

गाडीची वेळ झाली. नयना निघण्यापूर्वी रंगापाशीं डोळे मिटून त्याच्या अंगावर हात ठेवून उभी होती. शेवटीं सद्गदित होऊन म्हणाली, "रंगा! तुला सोडून जातांना वेदना होतात रे! आंतडें दूर करावें तसें वाटतें. रंगा! जाऊन येतें हां! मग आपण दूर दूर जाऊं."

"कुठें जाऊं? आकाशांत? स्वर्गांत?"

"आपला स्वर्ग जिथें आपण असूं तिथें. तो दूर नाहीं. ही इथें मी उभी आहें ना? इथें मी स्वर्गसुखच अनुभवीत आहें."

"नयना! तूं मूर्तिमंत काव्यदेवता आहेस."

"पण तूं माझी स्फूर्तिदेवता आहेस. तूं रंगदेवता आहेस. ध्येयमूर्ति आहेस. माझ्या जीवता! मी येईपर्यंत नीट राहा."

"पण लौकर ये तूं. माझा ग काय भरंवसा?"

"असें बोलूं नको रे!"

"अग! तुझें माझ्या आत्म्यावर ना प्रेम आहे? मग भय कसलें त्यांत? माझें मरण मी तर समोर पाहत आहे."

सुनंदाताईला तें ऐकवेना. ती शेवटीं नयनाला म्हणाली, "नयना! तुझी गाडी चुकेल ना! ऊठ आतां. असलीं बोलणींही बोलायला नकोत आणि ऐकायला नकोत."

नयना निघाली. जातांना ती म्हणाली, "येत्यें मीं रंगा. सारीं रंगाच्या जिवाला जपा."

सुनंदाताई नयनाला पोंचवायला गेली होती. गाडींत बायकांच्या डब्यांत कोणीच नव्हतें. डबा रिकामा होता. त्यांतच नयना जाऊन बसली. ती निर्भय स्त्री होती. मूळचीच धीट. तशांत युरोपांतून जाऊन आलेली; तो मोकळा धीटपणा तिच्या अंगीं बाणला होता.

"ताई, मी येईपावेतों रंगाला जपा बरें! सांभाळा." ती पुन्हा म्हणाली.

"तूं कांहीं चिंता करूं नकोस." सुनंदाताई म्हणाली.

"मघाचें त्याचें बोलणें ऐकून काळीज चरचरतें ग!" डोळ्यांना पदर लावून नयना म्हणाली.

"प्रभू सांभाळणारा आहे. निश्चिंतपणें जा तूं." नयना म्हणाली.

नयनाची गाडी गेली. नयना जड मनानें घरीं वडिलांच्या हृदयाला पाझर फोडायला जात होती.

नयना गेल्यापासून रंगा अधिकच अशक्त झाला. तो विशेष बोलत नसे. कांहीं दिवस गेले.

"ताई, नयनाचें पत्र आलें का? कधीं येणार ती?" रंगानें विचारलें.

"तुझ्या हवापालटाची सारी व्यवस्था करून येईल."

"कसली हवापालट? मी आतां एकदम थेट जाणार आहें वासुकाकांच्या जवळ, आई–बाबांजवळ, देवाच्या घरीं."

"असें नको रे बोलूं रंगा. तुझे जरा पाय चेपूं?"

"नको. तुम्हां सर्वांना माझ्यासाठीं किती त्रास! असें पाहा, मी कुठला कोण? जन्मल्यापासून मी सर्वांना राबवीत आहें. पुरें हें जीवन. निरुपयोगी, निःसार जीवन. मी कोण भारताची कीर्ति दिगंतांत नेणार? व्यास-वाल्मीकींनीं, राम–कृष्ण–बुद्धांनीं, महात्माजी, गुरुदेव, पंडितजी यांनीं ती दिगंत नेली आहे. उगीच मला मूर्खाला कांहींतरी वाटे. बुडबुड्यानें क्षणभर सूर्याच्या प्रकाशानें रंगून मिरवावें तसा मी. वासुकाका म्हणायचे, आणि मला बावळटाला तें खरेंच वाटायचें. ते प्रेमानें म्हणत. पण मी वेडा. कांहीं तरीच मला वाटे. पण आज मी कोण हें मला कळलें. झाडाचें मी एक पान. पावसाचा मी एक थेंब. गवताची मी एक काडी. वाळूचा मी एक कण."

" रंगा ! पुरे रे ! बोलूं नकोस फार." सुनंदाताई म्हणाली, " तुला त्यांचें स्वप्न खरें करायचें आहे ना ?"

" माझी ती पात्रता नाहीं ग ! माझ्यांतून सारी शक्ति निघून जात आहे असें वाटतें." रंगा कष्टानें बोलत होता.

## दिवा विझला ! : २१

रंगा कमालीचा अशक्त झाला होता. त्याला बोलवेना. पण जरा वेळ गेल्यावर त्याच्या मनांत काय विचार आले कोण जाणे. एकदम तो कांत झटकून टाकल्यासारखें करून ताईला म्हणाला, " ताई ! ऊठ ऊठ लौकर. मला दे माझे रंग. दे माझे कुंचले. मी अमर चित्र रंगवतों. मरणाऱ्या चित्रकाराचें अमर चित्र. आणा सारें सामान. मला स्फूर्ति आली आहे. हीं बघ बोटें थरथरत आहेत."

" आतां इतक्या रात्रीं ?" ताई दचकून म्हणाली.

" रात्रीलाच गंमत असते ताई ! मला वर गच्चींत न्या. पंढरीचा तो गालिचा आंथरा. काबुली गालिच्यावर बसून शेवटचें चित्र रंगवतों. त्या गालिच्यावर आमचें लग्न लागलें. माझा हात आतां एकट्याचा नाहीं. तो बळकट आहे. नयनाची आणि माझी संयुक्त शक्ति त्यांत आहे. आतां आमची संयुक्त कला आज या बोटांतून प्रगटेल. पूर्व–पश्चिमेनें कधीं न पाहिलेलें असें सौंदर्य आजच्या चित्रांत येईल. मी आज विश्वाचा झालों आहें. साऱ्या दिशा भेदून पलीकडे गेलों आहें मी. जणूं विश्वाच्या मुळाला मीं हात घातला आहें आज. माझ्यासमोर सारें विश्वब्रह्मांड या क्षणीं पुंजीभूत होऊन उभें आहे. हें बघ–हें बघ अनंत आकार, असीम आकृति. प्रभु आज माझ्यासमोर सारें भांडार उघडें करीत आहे. माझ्याभोंवतीं रंगसिंधु धों धों उसळत आहे. अनंत आकार नाचत आहेत. आण माझे रंग, माझे कुंचले. हें जें डोळ्यांसमोर दिसत आहे, हें जें क्षणभर समोर चकाकत आहे, तें मला अमर करून ठेवूं दे. मी या छायाप्रकाशांना ब्रशानें पकडून, कुंचल्यांनीं रंगवून अमर करतों. चित्रकाराचें हें विश्वरूपदर्शन."

" रंगा ! हें काय बोलतोस तूं ?" सुनंदानें विचारलें.

" आज मी सांगतों तसें करा. आई नवबाळाला जन्म देऊं पाहणाऱ्या

नवमातेच्या वेदना मी आज अनुभवीत आहें. मला वर न्या. तिथें रंग, कुंचले, सारें ठेवा. तो मंगल गालिचा आंथरा. सृष्टीशीं समरस होऊन आज मी चित्र रंगवीन, विश्वजननीच्या मांडीवर लोळत खेळत. तुम्ही कुणीही तिथें बसायचें नाहीं. चिंता करायची नाहीं. रंगा आज अमर चित्र रंगविणार आहे. त्याची करा सारी तयारी."

सारीं मप्प होतीं.

रंगा हंसला. म्हणाला, "तुम्हांला तें कळायचें नाहीं. एवढें देखील अखेरीला माझ्या मनाजोगें करणार नाहीं ना तुम्ही?"

तेव्हां मात्र नाइलाज झाला. ताईनें तो गालीचा गच्चींत नेऊन आंथरला. टेकायला लागली तर गादी ठेवली. स्वच्छ तांब्या भांडें आणि चित्रकलेचें सारें साहित्य तिथें नेऊन ठेवलें. आणि मग रंगाला वर नेलें.

"भाऊ! दिवा हवा ना?" तिनें विचारलें. कारण वेळ रात्रीची होती.

"लहानसा दिवा ठेव इथें लावून." रंगा म्हणाला.

मध्यरात्र झाली. तरीही त्या मंद प्रकाशांत रंगा रंगवीत होता. त्याची सारी कला उचंबळून आली होती. तो तन्मय झाला होता.

मधूनमधून ताई, सुनंदा येऊन पाहून जात. परंतु रंगाची भावसमाधि कोणाला मोडवत नसे.

पहांट झाली. वारा थंडगार येत होता. कोंबडाही आरवला. आणि तो मिलचा भेसूर भोंगा झाला. 'कामाला चला, उठा' असें तो सर्वांना सांगत होता. रंगाचें काम समाप्त होत होतें.

• • •

स्टेशनांत पहांटेची गाडी आली. नयना लगबगीनें खालीं उतरली. ती थेट घरीं आली. ताई, सुनंदा झोंपलेलीं होतीं. दार उघडें होतें. तें नयनानें लोटलें तों उघडलें. नयना आंत आली. सारें शान्त होतें. पण रंगा कुठें आहे? त्याची खाट रिकामी! तिचें हृदय चरकलें, मन थरकलें. ती वर गेली. गच्चींत जाऊन उभी राहिली. तों तिथें लोडाकार गादीवर डोकें ठेवून रंगा शान्त पडून होता. त्याचे हातांत रंगानें रंगलेला कुंचला होता. आणि समोर तें चित्रकाराचें विश्वरूपदर्शन चित्र होतें.

तिथें हालचाल नव्हती. छातीचें खालीं–वर होणें नव्हतें. सारें समाप्त झालें होतें. नयना जवळ बसली. तिनें रंगाचें मस्तक आपल्या मांडीवर घेतलें. "रंगा" ती केविलवाणें बोलली. गंभीर झाली. तिनें त्याच्या मुखावर मुख ठेवलें. तिचे अश्रू त्या प्रसन्न, शान्त परंतु चैतन्यहीन मुखकमलावर घळघळले.

ताई नि सुनंदा उठून वर आल्या. तों तें गंभीर, हृदय विरघळवणारें दृश्य त्यांना आढळलें. • • •

## स्वातंत्र्य–युद्धाचा नगारा : : : २२

नयना मग मुंबईला आली. रंगाची कौटुंबिक जबाबदारी आतां तिच्यावर पडली होती. तिला नोकरी करणें प्राप्त होतें. ती जबाबदारी तिनें स्वतांच कर्तव्य म्हणून रंगावरील प्रेमाखातर शिरावर घेतली होती.

मुंबईला जाण्यापूर्वी तिनें बापूसाहेबांना पत्र लिहिले. त्यांत मनमोकळेपणानें सर्व खुलासा केला होता.

ती. बापूंच्या चरणीं कृ. सादर प्रणाम. मी रंगाकडून तुमच्याविषयीं ऐकत असें. त्याच्या जीवनांत अनेकांनीं अनेक रंग भरले. तुम्ही त्यांपैकीं एक आहां. रंगाचें रमणीय जीवन एकाएकीं संपलें. मी रंगाची पत्नी. माझें नांव नयना. रंगाची मानलेली आई आणि मानलेली बहीण यांचा सांभाळ आतां मीं केला पाहिजे. मी मुंबइला येत आहें. प्रथम तुमच्याकडे उतरायला येऊं इच्छितें. मग कुठें तरी जागा मिळेल. मुंबईला मुलींचा चित्रकलेचा वर्ग काढूं इच्छितें. तुमचा आधार द्या. सर्वांना प्रणाम

आपली,

**नयना**

बापूसाहेबांनीं 'दुधगांवच्या रंगा चित्रकाराचा मृत्यु' अशी बातमी वर्तमानपत्रांत वाचली होती. बरेच दिवसांत त्यांना रंगाचें कांहींच कळलें नव्हतें. दुधगांवला कोणाकडे पत्र पाठवायचें, त्यांना कांहीं सुचेना. तों आज नयनाचें पत्र त्यांना मिळालें. त्यांनीं सहृदयतेनें पत्र लिहून तिला बोलावलें. 'विनासंकोच या, आमच्याकडे रहा' असें लिहिलें.

नयना निघून गेली. मागें ती वडिलांकडे गेली तेव्हां डब्यांत एकटीच होती.

आजही एकटी. ती शून्य मनानें बसली होती. परंतु गाडींत माणसाला कुणी ना कुणी सोबत सांपडतेच. आपोआप जुळते. नयनाच्या डब्यांत पुढच्या स्टेशनवर कांहीं स्त्रिया चढल्या. त्यांत एक पारशी स्त्री आणि तिची लहान मुलगी होती. तेव्हां नयना आपल्या बॅगेंतून चित्रकलेचें सामान काढून निसर्गचित्र काढीत बसली होती. लहानगी पारशी मुलगी त्या चित्राकडे कुतूहलानें टक लावून पाहात होती. मणिबेन त्या मुलीचें नांव.

थोड्याच वेळांत त्यांची मैत्री जुळली. नयना बॅगेंतून रंगाचीं सुंदर सुंदर चित्रें काढून तिला दाखवूं लागली. त्या पारशी मायलेकींना तीं चित्रें फार आवडलीं.

"तुम्ही मुंबईत आमच्याकडे या बरें का!" पारशी बाई उतरण्याची वेळ जवळ आली तशी नयनाला सांगूं लागली.

नयनाला मणीच्या आईनें स्वतःचा पत्ता दिला. मणीला तर तिचें वेडच लागलें. तिनें विचारलें, "तुमच्या बॅगेंत काय आहे पाहूं? आणखी चित्रें आहेत?"

नयना म्हणाली, "बघ आहेत का."

मणीनें बॅग उघडली. सारें पाहिलें. तिनें नयनाला फळें सोलून दिलीं. नयनाचे डोळे एकदम भरून आले.

"आंखमां पाणी शा माटे?"

"आंख दुखे छे."

मणीनें नयनाचे डोळे पाहिले. विचारलें, "फुंकर घालूं?"

असा तिथें प्रेमरसाचा झरा वाहत होता. पण मणी कांहीं केल्या बोलायची थांबेना. अखेर नयना तिला म्हणाली, "मणी! मने सुवादे जरा."

नयना कांहीं निजली नाहीं. बोलतां बोलतां मणि मात्र झोपी गेली. नयना तिच्या केसांवरून हात फिरवीत होती, मनीची आई तिच्याशीं बोलत होती.

अशा गप्पागोष्टी होतां होतां घाट संपला. इगतपुरी गेलें, कसारा गेलें. कल्याण आलें. मणी उठली. तिनें हंसून नयनाकडे पाहिलें.

"स्टेशनपर हमारी मोटार आवशे. अमारे त्यांज चालो ना नयना!" मणीची आई म्हणाली.

"ना, एम केम चाले. हूं तमारे त्यां आवीज, पिछे आवीश."

"भूलना नहीं."

" केम भुलूं ? मणीनी लागणी छेज ना ! "

नयना दादरलाच उतरली. तिनें मणीच्या हाताचें चुंबन घेतलें. मणी तिच्या-कडे टक लावून पाहात होती.

गाडी गेल्यावर नयना बापूसाहेबांकडे गेली. ते घरीं तिची वाटच पाहात होते. सायंकाळ झाली होती. नयना थकली होती. ती तिथें भिंतीशीं बसली. तिचे डोळे भरून आले. तिला हुंदका आला. ती उठून स्वयंपाकघरांत गेली. बापूसाहेबांच्या प्रेमळ पत्नीनें तिला धीर दिला.

" नको रडूं नयना." ती नयनाला शांतवूं लागली.

" रडूं नको तर काय करूं ? आम्ही एकमेकांच्या जवळ आलों काय, नि क्षणांत कायमची ताटातूट होते काय ? विश्वशक्तीचे काय ग हे खेळ ! "

" नयना ! जो देतो तो नेतो. आपली कशावर आहे बरें सत्ता ? म्हणून नाशवंताचा शोक करूं नये. जें अविनाशी आहे तें कोण नेणार ? "

" तें अविनशी साकार पाहण्यांतच मनाला विरंगुळा वाटतो ग आई ! मीं लहान आहें अजून. आध्यात्मिक समाधान कुठून आणूं मी ? "

जराशानें नयनाचा शोकावेग ओसरला. मग सर्वांचीं जेवणें झालीं. एकदोन दिवस असेच गेले. नंतर नयना त्या पारशी बाईकडे गेली. तिची त्यांची जणूं शतजन्मांची ओळख. तिला तें घर आवडलें. तिथलें वातावरण आवडलें. मणीची आई तिला एक खोली देणार होती. मणीला शिकवावें, राहावें. काय घ्यायचें—घ्यायचें तेंही ठरलें.

"तुम्हांला घरीं पाठवायला लागेल तें मागत जा. पन्नास लागोत, दोनशें लागोत." मणीची आई म्हणाली.

नयना बापूसाहेबांकडे माघारी आली तेव्हां त्यांना तिनें सारी हकीगत सांगितली. आणि जाऊं का म्हणून विचारलें.

"कांहीं हरकत नाहीं. तिथें राहाणें नको वाटलें तर हें घर आहेच. केव्हांही या. पण ही मुंबई आहे. जपून राहा. नानाप्रकारचीं नाना माणसें. रंगाला सारे अनुभव आले होते. लहानशा वयांत त्यानें किती भोगलें, किती अनुभवलें." बापूसाहेब म्हणाले.

"म्हणूनच तो लौकर गेला." नयना उद्गारली.

नयना मणीकडे राहायला आली. मणी अक्षय तिच्या खोलींत असायची. नयना तिला सारें शिकवी. चित्रकला विशेष विषय म्हणून शिकवी. कधीं मणीबरोबर ती फिरायला जाई. असे त्यांचे दिवस आनंदांत जात होते.

जगांत तर युद्ध पसरत चाललें होतें. रशियावर जर्मनीनें अचानक हल्ला केला. इकडे जपाननें तेंच केलें. हिंदुस्थानवर संकट येणार असें वाटलें. हिंदुस्थाननें मुक्त झालेंच पाहिजे असें महात्माजींना वाटलें. तडजोडी निष्फळ झाल्या. अखेर तो महान् 'चले जाव' स्वातंत्र्यसंग्राम सुरू झाला. नयना आठ ऑगस्ट १९४२ च्या कॉंग्रेसच्या सभेला गेली होती. राष्ट्रपित्याचें तें अडीच तास चाललेलें भाषण तिनें ऐकलें. आणि ती घरीं निराळी होऊन आली.

"नयनाबेन! कुठं गेली होतीस?" मणीनें नयना येतांच जागीं होऊन विचारलें.

"कॉंग्रेसच्या सभेला गेल्यें होत्यें मी. मीं महात्माजींचें भाषण ऐकलें. देशासाठीं आपण मरावें असें मला वाटतें आहे ग मणि!"

"म्हणजे? काय करणार तूं?"

"आतां आजपासून आपण स्वतंत्र म्हणून वागूं लागायचें. इंग्रजी सत्ता संपली, ती कुणीं मानूं नका, असें पुकारीत जायचें. एथल्या गव्हर्नमेंट हाऊस-वर राष्ट्राचा झेंडा लावायचा. गोळीबार झाला तरी मागें हटायचें नाहीं. मरायचें. गुलाम म्हणून राहणें पाप आहे मणि!" ऐकतां ऐकतां मणि झोंपी गेली होती.

• • •

## समाधि ? : : २३

रात्रीं नयना निजली नाहीं. ती चित्रें रंगवीत बसली. पण तीं कसलीं? अन्यायाचीं चित्रें. सकाळ झाली. तों बातमी आली कीं सारे राष्ट्रपुरुष गिरफदार केले गेले. अशा ज्वलंत बातम्या येऊं लागल्या. सारा देश उठला. पेटला. ब्रिटिश सत्ता हादरली. भारतमातेचीं मुलें बेफाम झालीं. मरणाचा डर उडाला. तो पाहा बिंदुनारायण, तो शंकर, तो नारायण, तो शिरीष, ती तरुलता, तो युसूफ, तो हेमू, तो वसंत, तो विष्णु असे लहान लहान भारतमातेचे चिमणे बाळ मृत्यूला वरीत होते. नयना त्या वार्ता ऐके आणि गंभीर बने. अष्टी–चिमूरच्या

कथा तिनें ऐकल्या, तेव्हां ती नागिणीप्रमाणें चवताळली. त्या रात्रीं तिनें 'पाशवी अत्याचार' म्हणून चित्र रंगविलें. लिथोवर गुप्तपणें तिनें त्याच्या हजारों प्रती करून घेतल्या. पहांटे उठली. आणि तीं चित्रें घेऊन गाणें म्हणत निघाली. ती चित्रें वांटीत होती. गाणें म्हणत होती. तों पोलीस आले. तिच्या हातांतील चित्रें हिसकून घेण्यांत आलीं. लोकांवर लाठीहल्ला झाला. नयनाला तुरुंगांत स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें. तिनें बापूसाहेबांना, सुनंदाआईला, मणीला पत्रें लिहिलीं. ती तुरुंगांत आनंदानें होती. तिथेंही तिनें चित्रकलेचा वर्ग सुरू केला. रंगाच्या ठरलेल्या कल्पना ती तिथें रंगवूं लागली.

रंगानें आयुष्याच्या अखेरच्या घटकेला चितारून पुरें केलेलें चित्र आणि त्याचीं इतर निवडक चित्रें प्रदर्शनांसाठीं पाठवावीं असें रंगाच्या सर्व चित्रकार मित्रमैत्रिणींच्या मतानें ठरलें. त्याप्रमाणें चित्रें निवडून रवाना करण्याचें महत्त्वाचें काम आजकाल नयनानें आवडीनें आपल्या मागें लावून घेतलें होतें. तें सुदैवानें पूर्वींच पूर्ण झालें होतें. प्रदर्शनही आतां मोठें भव्य भरणार होतें.

नयनाच्या उत्साही नि प्रामाणिक चळवळीचा तिच्या कल्पनेप्रमाणें व्हायचा तोच परिणाम झाला. ती खवळलेल्या जनसमूहांतून प्रचारदीप घेऊन जात असतां लाठीमारापावेतों प्रसंग आला. तिला लाठी लागली नाहीं. परंतु ती कैद झाली.

तिच्या वडिलांना हें कळलें. त्याबरोबर ते तिला भेटायला तुरुंगांत गेले. त्यांनीं सोपा उपाय लेकीला सुचवला.

"नयना! तूं माफी मागून मोकळी हो कशी!"

"मला माफी मागायला काय सांगतां बाबा?"

"मग काय, तूं तुझ्या बापाला म्हातारपणीं दुःखी करून एकटें सोडणार? यासाठीं का तुला मीं आजवर प्रेमानें वागवलें नयना?"

"बाबा! पर्वत नदीला जन्म देतो. परंतु नदी सागराकडे जाते. म्हणून पर्वताला नदीचा राग येतो का? मुली ह्या नाहीं तरी शेवटीं दुसऱ्याकडेच जायच्या असतात. आणि तशांत हें राष्ट्राचें काम. अशा पवित्र राष्ट्रकार्यासाठीं तर सर्वांनीं धावून जायला हवें. मी म्हणत्यें तुम्हीही तुरुंगांत या."

"हें तूं नको शिकवायला. माझें तूं ऐकत नाहींस, त्याअर्थीं मी माझी मुलगी मेली म्हणून समजतों."

असें संतापून बोलत पिता उठला. नयनानें पुढें होऊन पित्याच्या चरणांना प्रणाम केला.

" हें ढोंग कशाला ?" तो संतापून म्हणाला.

" माझें हृदय देवाला माहीत."

पिता संतापानें फुत्कारत गेला. नयना माघारी तुरुंगांतील आपल्या कोठडींत येऊन कातीत बसली. ती आतां अस्वस्थ झाली होती. इतक्यांत इंदू, विजया, लता, तिच्या तुरुंगांतील मैत्रिणी तिच्या खोलींत आल्या. तुरुंगांतील तिच्या चित्रकलेच्या वर्गांतील त्या विद्यार्थिनी.

" चला आतां वर्ग घ्यायला." इंदू म्हणाली.

" नयनाताई ! मीं काढलेलें चित्र तुम्हांला दाखवूं ? हंसूं नका हं !" लता म्हणाली.

" वा ग ! हंसायसारखें चित्र काढायचें आणि हंसूं नका म्हणायचें." विजयानें तिला डिवचलें.

" लताला अशी चिडवूं नका ग !" नयना साऱ्या जणींना म्हणाली.

" तुम्ही नेहमीं तिची बाजू घेतां." इंदू म्हणाली.

" अग ! लतेला कुणाचा तरी आधार लागतोच."

" होय ! पण तुमचा आधार तिला तुरुंगापावेतोंच. पुढचा आधार तिचा तिला बघायला हवा. कारण सत्याग्रही मुलगी. राजनिष्ठ सेवानिवृत्त पोलिस अधिकारी बापाच्या राजनिष्ठेला आपलें चळवळें गालबोट लावून आलेली. बाप थोडाच तिला हवा तसा पुढचा आधार ती तुरुंगांतून सुटल्यावर देणार आहे !" विजया हंसत मैत्रिणींकडे पाहत म्हणाली.

परंतु लतेचे तें गोड मुकें जीवनरहस्य आतां त्या साऱ्या मैत्रिणींना ओझरतें माहीत झालें होतें. त्यावर लक्ष केंद्रित करून साऱ्याजणी बोलत होत्या.

" आतां बघ हं विजया !" असें म्हणून लता जरा फुरंगटली.

अशी त्या सत्याग्रही मुलींनीं जराशी गंमत नेहमींच करावी.

पुन्हा वर्गाची गोष्ट निघाली. नयना म्हणाली, " आज नको ग वर्ग. मला जरा बरें वाटत नाहीं. तुम्ही जा. वाचा. वादविवाद करा."

" नाहीं तर लिहा." विजया पुन्हा लताकडे पाहून मिस्किलपणें म्हणाली.

लतानें तिच्यावर घागरी एवढा एकेक डोळा करून पाहिलें. आणि मस्करीची कुस्करी होऊं नये यासाठीं साऱ्याजणींनीं तो थट्टा विनोद तिथेंच आवरता घेतला.

सर्व मुली गेल्या. लता तिथेंच बसली.

" कोण आले होते भेटायला नयनाताई ?"

" वडील आले होते."

" काय म्हणाले ?"

" माफी मागून सुटून ये म्हणाले."

" त्यांना घरीं दुसरें कोणी नाहीं ?"

" नाहीं. ते एकटेच आहेत. माझ्यावर त्यांचा सारा जीव. पण म्हणून मीं माफी का मागायची ! त्यांचें म्हातारपण आहे. मी त्यांच्या इच्छेविरुद्ध सारेंच करीत आहे खरें. परंतु मी वाईट कांहींच केलें नाहीं आणि करीतही नाहीं. प्रभूला तरी माझें करणें कां आवडलें नाहीं ग ? त्यानें रंगाला कां ग न्यावें ? कांहा झालें तरी माझें हृदय शुद्ध आहे. देवाला न आवडणारें मीं कांहींही केलें नाहीं. पण लता ! इथून सुटल्यावर तूं पुढें काय करणार ?"

" मी तुमच्या भारत-चित्रकला-धामांत येईन. तिथें मी शिकेन."

" लता ! सारीं स्वप्नें हीं. मला वाटे, माझे वडील मुलीसाठीं सारें देतील. त्यांतून आपण संस्था काढूं. रंगाला आनंद वाटेल. त्याचा आत्मा फुलेल. त्याच्या देहालाही बरें वाटेल. परंतु माझीं सारीं स्वप्नें भंगलीं ग लता ! रंगा गेला. आतां त्याचीं ध्येयें मी कशीं प्रत्यक्षांत आणूं ? मी एक अगदीं सामान्य स्त्री आहे. लता ! कुठें आहे तें आपल्या संकल्पांतलें भारत-चित्रकला-धाम ? रंगाच्या खोलीवर त्याची पाटी होती. त्या लहानशा जागेंत तो आपलें ध्येय फुलवीत होता. त्या साऱ्यावर पाणी पडलें."

" पण पुढें कधीं तरी ती संस्था सुरू झाली कीं मी तिथें येईनच."

" ये. मी तुझी वाट पाहीन."

नयना उठून आपल्या खोलींत गेली.

त्या दिवशीं रात्रीं नयनाला तुरुंगांत अद्भुत अनुभव आला. ती आपल्या कोठडींत एकटीच होती. रंगानें योजिलेल्या चित्रांपैकीं एक ती तयार करीत होती. एकाएकीं तिला आपल्यामध्यें कोणी तरी शिरत आहे, आपल्या बोटांत

कोणी तरी घुसत आहे असें वाटलें. ती जरा बावरली, घाबरली. परंतु ओरडली नाहीं. तों काय आश्चर्य ? समोर तिला रंगा दिसला. ती बघत राहिली. ती त्याला भेटायला धावली. पण कुठें आहे तो ? तो छायामय होता, स्वप्नमय होता. तो कसा भेटणार ? ती पुन्हा आपल्या आसनावर बसली. तिची जणूं समाधि लागली. तिला स्वतःचें भान जणूं नव्हतें. रात्रभर ती जागी होती. त्या अनुभवाचें अपूर्व चित्र तिनें तयार केलें. ● ● ●

## ' चले जाव ! : : २४

' चले जाव ' आंदोलनाची प्रखरता सरकार आणि जनता या उभयपक्षीं जरा सौम्य होऊं लागली. स्थानबद्ध सुटूं लागले. नयनाच्याही सुटकेचा दिवस उजाडला.

सुटका होतांच नयना साताराकडे गेली. ती गाडींत विचारमग्न होती. पित्याचें शेवटचें दर्शन तरी होईल कीं नाहीं ? किती प्रेमानें त्यांनीं वाढवलें. अशा साऱ्या आठवणी येत होत्या. ती घरीं आली. तों त्या मोठ्या वाड्यांत शान्तता होती. हलकेंच ती घरांत शिरली. सकाळची वेळ होती. घरांत दूरची एक आजीबाई होती.

" आजी ! बाबांचें कसें आहे ? " नयनानें विचारलें.

" आलीस तूं ? तुझ्यासाठीं कंठीं प्राण धरून आहेत."

नयना तशीच वडिलांच्या शयनागारांत गेली. तो वृद्ध पिता तिथें नयनाची नि मृत्यूची वाट पाहात पडून होता. ती पित्याजवळ जाऊन बसली. तिनें हळूच हांक मारली, " बाबा, मी आलें आहें. मी सुटलें."

"आलीस ? मलाही आतां सुटूं दे." डोळे उघडून ते म्हणाले.

"मी तुमच्यासाठीं काय करूं ?"

"आतां कांहीं करायचें राहिलें नाहीं. वर्तमानपत्रांत तुझा पति गेल्याचें वाचलें. मला किती दुःख झालें असेल ? नयना ! जाणूनबुजून तूं दुःखाच्या डोहांत उडी घेतलीस. आणि मींही तुला वेळेवर मदत दिली नाहीं. मीही अपराधी आहें. माझें मन मला खातें. क्षमा कर मला." असें बोलतां बोलतां ते उठूं लागले.

"उठूं नका बाबा, पडून राहा. मुळींच खेद करून घेऊं नका. माझ्या मनांत तें कांहींही आतां राहिलें नाहीं." असें म्हणत तिनें पित्याला मांडी दिली.

"नयना! माझी सारी दौलत तुझ्या ध्येयपूर्तीच्या सत्कारणीं लाव. हें सारें मींच कमावलेलें. तुझ्या संस्थेला सारें दिलें आहे. वाटलें तर या वाड्यांतच संस्था आणा. इथें सुंदर चित्रसंग्रह आहे. सातारा हें महाराष्ट्राचें हृदय. शौर्य नि वैराग्य यांचें आजुबाजूचें वातावरण. जवळ माहुली. संगम. तुला वाटलें तर इकडे संस्था आणा. नाहीं तर हा वाडा विकून टाका. योग्य तें करा. रंगाला मीं वांचवूं शकलों नाहीं. परंतु त्याचें ध्येयबाळ मरूं नये म्हणून मीं शक्य तें सारें केलें आहे. त्या ध्येयबाळाला वाढव. सुखी समाधानी राहा. तुझें जीवन ध्येयपूजेनें कृतार्थ होवो. पित्याचें प्रेम, पित्याचे आशीर्वाद मागावे नाहीं लागत. ते सदैव मिळतच असतात बाळ! ये, जवळ ये."

तिनें डोकें खालीं केलें. त्यांनीं आपले वरदहस्त, ते वत्सल हात तिच्या डोक्यावर ठेवले.

"कृतार्थ हो." ते म्हणाले. आणि त्यांनीं राम म्हटला.

नंतर नयना त्या वाड्यांत एकटी फिरे. लहानपणाच्या आठवणी आठवी. आईच्या वडिलांच्या तैलचित्रांसमोर उभी राही नि रडे. तिला एकाकी वाटे. "सारे बंध तुटले. असें कसें माझें जीवन? पण कां? बंध आहेत. सुनंदा आहे, ताई आहे, मणि आहे, आणि तो पंढरी? तो असेल का जिवंत? का जपान्यांच्या ताब्यांत गेला, मारला गेला?"

एकदम असा स्वातंत्र्याचा सारा लढा तिच्या डोळ्यांसमोर आला. माय माउली कस्तुरबांचें मरण, महात्माजींचा उपवास, आचार्य भन्साळींचें दिव्य, मुलाबाळांचीं बलिदानें, केवढा विराट तो लढा!

वडिलांचें सुतक आटोपल्यावर नयना दुधगांवला आली. सुनंदाआईनें तिला पोटाशीं धरून तिच्यावर मायेची पांखर घातली.

"आई, जगांत मला कोणी नाहीं ग! जन्म देणारी आई लहानपणींच गेली. जीवनाचा अर्थ देणारा रंगा लगेच गेला. ज्यांनीं वाढवलें ते बाबाही गेले." ती म्हणाली.

"पण मी आहें ना तुला! ताई आहे; सर्वांच्या प्रेमळ स्मृति आहेत. रंगाचीं

चित्रें आहेत. ध्येयें आहेत. सभोंवतालचा समाज आहे. नयना, आपण कधींच एकटीं नसतों. मनांत डोकावून बघ. तिथें रंगा आहे. खरें ना ? मनुष्याचा हाच मोठेपणा आहे कीं तो एकटा असूनही अनेकांचा होतो. अनंताचा होतो. विश्वाचा होतो."

"आई ! तुम्ही कुठच्या शाळेंत असें बोलायला शिकला हो ?"

"रंगाच्या, वासुकाकांच्या. नयना ! मला तरी कोण आहे ? परंतु मी तुम्हां सर्वांची आहें. तूं कलावान् ना ? कलावंतानें नुसता चित्रांतच रंग भरून चालायचें नाहीं. अनेकांच्या जीवनांतही रंग भरायचे असतात त्याला. हें चित्र कशासाठीं ? दुसऱ्यांना आनंद देण्यासाटीं. त्यांच्या हृदयाला संवेदना पोंचवण्यासाठीं. खरं ना ? तुझीं चित्रें विश्वाच्या जीवनांत रंग भरतील. रंगा म्हणे, 'माझें चित्र एखादा अमेरिकन घेईल. तेथील बंधुभगिनी माझें चित्र पाहतील. त्यांचा आत्मा भारताशीं बोलेल. माझें चित्र जगाला एकत्र आणील. पूर्वेकडचीं आणि पश्चिमेकडचीं हृदयें एकत्र जोडील. केवळ पश्चिम, असें नाहीं. आणि असूंही नये. मानवी हृदय, मानवी आत्मा जिकडे तिकडे एकच आहे.' असें रंगा बोलायचा."

आई बोलायची थांबली.

"आई ! बोला" नयना म्हणाली.

"त्यांच्यासारखें का मला सांगतां येणार आहे ? ते गच्चींत बसत. रंगाला भारतीय प्रसंग सांगत. या प्रसंगांवर चित्र काढ म्हणत. ती अमृतवाणी होती. मी त्या वाणीचा वेडावांकडा प्रतिध्वनि उमटविणारी फोनोची तबकडी."

"आई ! वेडीवांकडी हरीची मुरली; परंतु ती विश्वाला रमवते."

त्या मायेच्या पांखरछायेखालीं नयना दुःख विसरली. पुढील योजना करूं लागली. परंतु ताई म्हणाली, "रंगाला हें गांव आवडे. इथें नदीतीरीं अपूर्व शोभा. पलीकडे तो नेहमीं हिरवागार असणारा डोंगर. तो धबधबा. तें रामरायाचें मंदीर. रंगाचीं तिथलीं अद्वितीय चित्रें ! आपण इथें नदीतटाकीं भारत-चित्र-कलाधाम बांधूं. तें मंदीर आपल्या संस्थेच्या आवारांत आणतां आलें तर पाहूं. आपणच मंदिराची पुजारी होऊं. हल्लीं तिथें व्यवस्थाही नीट नसते. संस्था व्यवस्था ठेवील. नयनाताई, तो सातारचा वाडा विका. वाईंट नका वाटून घेऊं. शेवटीं

ध्येयासाठीं जगायचें ना ? तुमच्या वडिलांचा तो कलावस्तूंचा संग्रह येथें आणूं. आणि आपण नवीन भव्य संस्था उभारूं."

" कदाचित् भारतमाता तुमच्या तोंडानें बोलत असेल ताई !" नयना म्हणाली.

दुधगांवलाच रंगाचें स्मारक म्हणून ती भारत–चित्र–कलाधाम संस्था सुरू करायचें ठरलें. नयना रंगाच्या भारतदर्शनांतील उरलेलीं चित्रें काढीत बसे.

तिकडे आजीबाई होती. नयना एकदां गेली आणि तिला घेऊन आली. वाड्याची देखरेख भय्या करी. एका खोलींत तो राही. बागेला पाणी घाली. वाडा विकण्याचा विचार वडिलांच्या मित्रांच्या कानांवर घालून नयना माघारी आली.

' चले जाव ' आंदोलनानें नेटाला लागलेला हिंदी स्वातंत्र्याचा लढा आतां मंदावला होता. परंतु तिकडे आझाद सेनेचा रोमांचकारी लढा ब्रह्मदेशाच्या सीमेवर सुरू होता. तोहि भारताच्या स्वातंत्र्याचाच लढा.

नयना स्वातंत्र्याची पूजक होती. स्वातंत्र्य–संगराचीं चित्रें रंगवतांना तिच्या कुंचल्यास जशा कांहीं स्वातंत्र्य–गीत गाण्यासाठीं सहस्र जिभा फुटत. तिनें ठरविलें, कीं नेताजींच्या आझाद हिंद सेनेनें केलेला स्वातंत्र्याचा यज्ञ चित्ररूपानें अमर करायचा.

झालें. लगेच तिनें त्या लढ्याचें स्मरणपूर्वक टिपण करून नजरेपुढें ठेवलें.

' नेताजी सुभाषबाबूंनीं शून्यांतून विश्व निर्माण केलें. कैद झालेल्या हिंदी शिपायांना मुक्त करून त्यांची मुक्ति–सेना त्यांनीं उभी केली. आझाद हिंद सरकारची घोषणा केली. आपलें स्वतंत्र नाणें पाडलें. अंदमान निकोबार बेटांना शहीद बेटें असें नवें नांव दिलें. हिंदु–मुसलमान–शीख सारे सारे एकत्र आणले. त्यांना संग्रामी प्रवासगीतें दिलीं. 'जय हिंद' मंत्र दिला. ' चलो दिल्ली ' ध्येय दिलें. नेताजींचें आझाद हिंद सरकार नीट चालावें, वाढावें, यासाठीं लाखांनीं काय पण कोटींनीं संपत्तीची मुक्त खैरात धनिक भांडवलदार हिंदी व्यापाऱ्यांनीं केली. नेताजींच्या स्पर्शानें दिव्य झालेले फुलांचे हार लाखों रुपये किंमतीला विकले जात. नेताजींपासून स्फुरण घेऊन लहान परकऱ्या मुलीदेखील बंदुका घेऊन बाणेदारपणानें चालूं लागल्या. मरणाचा डर गेला.

‘नेताजी मग रंगूनला आले. रंगून जपानी फासिस्टांच्या मगरमिठींतून मुक्त झालें. नेताजींनीं शेवटचा मोगल बादशहा बहादुरशहा याच्या तेथील कबरेचें दर्शन घेतलें. ते हिंदु–मुस्लीम ऐक्याची मूर्ति बनले. ते जेव्हां बोलत, तेव्हां नवीन पैगंबरच बोलत आहे असें मुसलमान तरुणांना वाटे. भारताच्या मुक्ति–ध्यासाचें नेताजी हें एक तेजोवलय होतें.

‘थोड्याच दिवसांत महायुद्धाचे रंग पालटले. जर्मनी हरला. हिटलर आत्महत्या करून जाळून घेऊन मेला. आणि एके दिवशीं जपानवर अमेरिकेनें अणुबॉंब टाकला. अडीच लाख वस्तीचें हिरोशिमा नगर एका क्षणांत मातींत गेलें. जपानला शरण येण्याखेरीज गत्यंतर उरलें नाहीं. आतां नेताजींचें काय होणार ?

‘काय होणार ? हें पाहा आझाद लष्कर. खायला अन्न नाहीं, प्यायला पाणी नाहीं, तरीही लढत आहे. बैलगाड्यांतून, रणगाड्याबरोबर झुंजत आहे. अन्न नाहीं तर गवत खाऊन तग धरून लढत आहे. नेताजी त्यांना धीर देऊन सांगत आहेत, ‘दिल्लीकडे चला. माझ्या प्रिय आझाद सैनिकांनो ! दिल्लीच्या रस्त्यानें चला. भारतमातेकडे जाणाऱ्या रस्त्याचें चुंबन घेत घेत मरूं. ते डोंगर, त्या नद्या आपणाला हांका मारीत आहेत. प्रिय भारतमातेला पाठीशीं घालून आम्ही उभे आहों; आम्हांला ओलांडून प्रिय भारतमातेकडे चला असें ते सांगत आहेत.’

‘तोंच आशा संपली. अखेरचा क्षण आला. नेताजींनीं आपल्या प्रिय सैनिकांना सोडून जपानकडे प्रयाण करण्यासाठीं विमानांत पाय ठेवतां ठेवतां सांगितलें, ‘तुम्ही महात्माजींकडे जा—ते राष्ट्रपिते आहेत. ते तुम्हांला वांचवतील.’

‘निरोप घेतांना त्यांच्या डोळ्यांत पाणी आलें. ते जे विमानांतून गेले ते गेले !’

याप्रमाणें प्रसंगांचें टिपण तयार करून नयना त्यांतील रोमहर्षक प्रसंगांवर क्रमशः सुंदर चित्रें रंगविण्याचें ठरवून पहिलें चित्र रंगवूं लागली देखील.

ताईचें लक्ष मात्र त्यांत कशांतच नव्हतें. ती पंढरीला पाहात होती. मनांत, स्वप्नांत, पंढरी. ती मध्यरात्र होती. ताई एकटी गच्चींत उभी राहून आकाशांतील

ताऱ्यांकडे बघत होती. विचारमग्न होती. मध्येंच बसे. मध्येंच फिरे. रात्र संपली. पहांटेचा गार वारा आला. बागेंतील फुलांचा मधुर सुगंध सुटला होता. दंवबिंदु टपटप पडूं लागले. तिकडे आगगाडीही आली.

" पंढरी का आला ? " ताई बोलली.

गच्चीच्या टोकाजवळ येऊन कोणाची तरी मार्गप्रतीक्षा करीत ती उभी होती, अंधारांतून कुणी येतें का बघत. तों एक टांगा येतांना दिसला. ताई गहिं-वरली. ती हळूच परंतु लगबगीनें खालीं आली. तिनें हलकेच दार उघडलें. आणि अंगणाच्या फाटकांत उभी राहिली. टांगा थांबला. एक मूर्ति खालीं उतरली.

" पंढरी ! " तिनें हांक मारली.

" ओ ताई ! " तो म्हणाला.

टांगा गेला. तीं दोघें आंत गेलीं.

" मी कशाला वांचलों ताई ? " पंढरी आंत जातां जातां एकदम म्हणाला.

" माझ्यासाठीं. माहीत नाहीं तुला ? रणांगणाच्या आगींतून तूं सुखरूप आलास." ती त्याला बोलत बोलत गच्चीवर घेऊन गेली.

" तूं मागें आलास आणि माझें हृदय घेऊन गेलास. तूं गाडींत बसून गेलास तेव्हांपासून मी तुला विसरल्यें नाहीं. रंगा आपल्या साऱ्या भारताच्या जीवनांत भरलेला आहे. त्याच्यासाठीं आतां खेद कां करावा ? रंगा आणि नयना यांच्या प्रेमाला तुळा नव्हती. याच गच्चींत, इथेंच, तूं दिलेल्या गालिच्यावर—याच गालिच्या-वर रंगा आणि नयना यांचें लग्न लागलें. रंगा तेव्हां मरणाच्या दारीं पडला होता. तरी त्याच्या नांवानें नयनानें कपाळाला कुंकूं लावलें. तसेंच या पहांटेला आपण आपलें लग्न करूं. एकमेकांचें जीवन एकमेकांत ओतूं. शरीरें कांहीं का म्हणेनात, आत्मा आत्म्याशीं लग्न लावूं दे. संलग्न होऊं दे."

त्या पहांटेच्या प्रशांत मंगल वेळीं ताई पंढरीच्या जीवनांत असा अपूर्व आनंद ओतीत होती.

• • •

पंढरीमुळें ताईंचेच नव्हे तर सर्वांचे दिवस आनंदांत जात होते. तो युद्धावरच्या एकेक कथा सांगून सर्वांना रंजवी. तो सुभाषबाबूंच्या आझाद सेनेंतील सेनानी होता. जपान्यांचा भयंकर हल्ला आपल्या सैन्याच्या तुकडीवर झालेला तो वर्णन करूं लागला, तेव्हां सर्वांच्या अंगावर भीतीनें कांटा उभा राहिला.

" तूं अशा आगीच्या वर्षावांत क्रूर जपानी हल्लेखोरांच्या हातून जिवंत तरी कसा सुटलास रे पंढरी ?" आईनें विचारलें.

" आई, भारतमातेचें हें चित्र जवळ होतें म्हणून मी वांचलों. जपानी मारणार होते मला. त्यांनीं माझी झडती घेतली. झडतींत हें चित्र सांपडलें. 'देशावर प्रेम करतोस ?' त्यांनीं मला प्रश्न केला. मीं 'हो' म्हटलें. 'तें चित्र माझ्याजवळ असूं दे, मग गोळी घाला' असें मीं म्हटलें. पण त्यांनीं मला गोळी नाहीं घातली. कैदी केलें. पुढें मी आझाद सेनेंत गेलों. नेताजींची वाणी ऐकली. आई ! आम्हीं गवत खाल्लें, उपाशीं लढलों. असें युद्ध जगांत झालें नसेल." पंढरी म्हणाला.

" परंतु उपयोग काय ? स्वातंत्र्य कुठें आहे ?"

" येत आहे स्वातंत्र्य आई ! वाट चालत आहे."

" स्वातंत्र्यासाठीं आपणाला पुन्हा युद्ध करावें लागणार का ?"

" कॉंग्रेस कांहीं तसें म्हणत नाहीं. कॉंग्रेसला वाटाघाटींतून गोडीनें, समजुतीनें स्वातंत्र्य हवें आहे. अर्थात् त्यामुळें भारताची फाळणी ओघानें आलीच."

" परंतु फाळणीनें तरी प्रश्न सुटतील का रे ?"

" आई ! नौखालीला, कलकत्त्याला काय झालें ? बिहारमध्यें काय झालें ? महात्माजी संकटग्रस्तांना धीर देत अनवाणी हिंडत आहेत. दुःखितांचे अश्रू पुशीत आहेत. या हिंदु-मुसलमानांच्या दंगली केव्हां थांबणार न+ळे."

" थांबतील का ? शांततेनें आम्हांला हायसें जगतां येईल का ?"

" आई ! आशेनें मनुष्य काम करतो. असें पाहा, यांत नांवें तरी कुणाला ठेवायचीं ? आपल्या संकुचित धर्मामुळेंच पाकिस्तान निर्माण होत आहे. आपण आपल्याच कोट्यावधी बांधवांना कमी लेखलें. त्यांना परधर्मांत लोटलें. आम्हीं अब्रह्मण्यं म्हटलें. अस्पृश्य बांधव मुसलमान अथवा ख्रिस्ती होऊन आला तर

आमच्या विहिरीवर पाणी भरतो. ओटीवर बसतो. आणि हरिजन तेवढा मात्र दूर! कुठें फेडायचीं हीं पापें? तरीदेखील अजून आमचे डोळे उघडत नाहींत. अजून गोव्यांत हरिजनांना मंदिरें मोकळीं नाहींत. हॉटेलें मोकळीं नाहींत. आपलें पाप फार झालें. आपला धर्म, आपलें तत्त्वज्ञान अद्वैताचें. कृति मात्र भेदभावाची. भाऊबंदकीची. संकुचितपणाची. आतां इतका अनर्थ झाल्यावर तरी आमचे डोळे उघडूं देत आई!"

अशीं बोलणीं चालत. कधीं रंगाच्या आठवणी येत. तेव्हां सारी रंगत. कधीं पंढरी 'युद्धस्य रम्या वार्ता' सांगे. रडवी, उचंबळवी. देशाचें काय होतें इकडे सर्वांचे डोळे होते. शेवटीं १५ ऑगस्ट १९४७ रोजीं ब्रिटिश जाणार, सत्ता सोडणार असें घोषित झालें. जनता आनंदली.

ती १५ ऑगस्टची अमर तारीख आली. फाळणी होऊन तरी पण भारत मुक्त झाला. पण महात्माजी कुठें आहेत? ते दुःखी आहेत. भारताचे तुकडे झाले तर मी माझ्या प्राणांनीं सांधीन अशी महात्माजींची प्रतिज्ञा. दोन देह झाले, तरी त्यांत आत्मा एक असावा म्हणून ते उभे राहिले. परंतु लाखों लोक घरेंदारें सोडून निघाले. हिंदमधून पाकिस्तानांत, पाकिस्तानांतून इकडे! कत्तली, गोळीबार! लाखलाख पायीं येत आहेत. मरत आहेत. लढत आहेत! जगांत असें कधीं झालें नाहीं. पाऊण-पाऊण कोटि लोक जा–ये करीत आहे. काय हाल, काय विपत्ति! सारें सोडून निराधार यायचें. आकाशाचें छत, पृथ्वीची शय्या! पाला खायला. पाणी मिळालें तर! थंडीचा कडका. ना पांघरूण, ना निवारा! स्वातंत्र्य आलें; पण अशा या वाटेनें.

अशी आग पेटली कीं ती विझवायला महात्माजींखेरीज कोण धीरानें जाणार? त्यांच्याखेरीज कुणाला तें शक्य होतें? आतांही महात्माजी धीर देत होते.

तरी कलकत्त्यांत पुन्हां दंगल. हा महापुरुष शांतीचा अमृतकुंभ घेऊन साह्याला धावला तर त्याच्यावरही दगडफेंक! ही दगडफेंक महात्माजींवर नव्हती. भारताच्या–विश्वाच्या हृदयावर ती दगडफेंक होती.

महात्माजी कलकत्त्याला गेले, आणि दंग्याची आग विझली. कलकत्ता शांत झालें. तों दिल्लीला भडका उडाला. ते दिल्ली शांत करायला धावून आले. ते म्हणाले, "इथें शांतता करा. मी पाकिस्तानांत शांत करायला जातों."

पण महात्माजींचें मनापासून कुणी ऐकेना. त्यांनीं उपवास आरंभिला. तों त्यांच्यावर बॉंब फेकण्यांत आला. त्यांतून वांचले. ते लोकांना सांगूं लागले, "अरे नकोरे मारामारी करूं? हें का स्वराज्य? पाकिस्तान कसेंही वागो. तुम्ही तरी थोर भूमिकेवरून वागा."

पण महात्माजी एकटे! त्यांना आतां कोण जुमानतो!

आणि ती काळ–वेळ आली. शुक्रवारचा दिवस. मुसलमानांचा प्रार्थनेचा दिवस. महात्माजी दिल्लींत होते. प्रार्थनेला चालले. जरा रोजच्याहून उशीर झाला होता. ते सहज म्हणाले, "उशीर करणाराला शिक्षा होते."

उशीर झाला, म्हणून ते प्रसन्न मुखानें प्रभुमय वृत्तीनें जलदीनें आले. तोंच तो पहा काळपुरुष. त्यानें चार गोळ्या झाडल्या. गोळ्या झाडणाराला बापूंनीं प्रणाम केला. त्याला त्यांनीं देवदूत मानलें. हेरे राम म्हटलें.

जगभर आंधार! आंधार झाला. जगाचें हृदय तुटलें. भारताचें नशीब फुटलें. अरेरे! राष्ट्रपित्याचा वध! देशांतील अनंत आपत्तींनीं वेडा झालेला राष्ट्रपित्यावरच संतापला. परंतु हें वेडें होणें होतें का? का ती योजना होती अनेकांच्या हत्त्यांची. प्रभु जाणें. अंतर्यामी तो.

आई तें ऐकून खिन्न मनानें म्हणाली, "पंढरी! भारताची मान खालीं झाली रे!"

"असें कांहीं तरीच झालें खरें. पण आई! त्या महान् यज्ञांतून महान् वैभव उफाळून येईल. पूर्वीं मोठा पूल बांधतांना माणसाचा बळी देत; देवाच्या नांवानें. म्हणजे तो पूल पडत नसे म्हणतात. आपणही भारताच्या स्वातंत्र्याची इमारत बांधीत आहों. भारत आणि पाकिस्तान या दोघांत ऐक्याचा पूल राहावा, तो मोडूं नये, म्हणून का महात्माजींचें बलिदान झालें? महात्माजींच्या त्रिभुवन-मोलाच्या रक्तावर स्वातंत्र्य उभारलें जाईल आई, भारताचें. ऐक्य उभारलें जाईल. पूल बांधला जाईल. अभंग पूल. आई, रडूं नकोस." असें सांगून पंढरीनें आईची समजूत केली.

घरच्या आजीबाई आजारी आहेत असें नयनाला कळलें होतें. आजी तशी आजारी नव्हती. परंतु फार थकली होती. एक्याण्णव वर्षांचें वय. तरी देखील आजारी म्हातारी रोजच्याप्रमाणें पहांटेला उठून तुळशीला नमस्कार करून यायला चुकली नाहीं.

तरीपण आज आपला भरंवसा नाहीं असें म्हातारीला वाटूं लागलें.

नयनाला हाक मारून तिनें सांगितलें, " नयना ! बाळ ! गीता म्हण ग माझ्या उशाशीं बसून."

नयना आजीच्या उशाशीं बसून गीता पाठ करूं लागली. म्हातारीनें आपली जपमाळ आपल्या गळ्यांतून काढून ती नयनाच्या गळ्यांत घातली. आणि राम म्हटला.

× × ×

चार दिवस गेले. माणसें चार दिशांना पांगूं लागलीं. पंढरीला चांगली नोकरी मिळाली. तो आतां संसारीही झाला होता. नयनानें त्यांच्या संसाराची घडी बसवून द्यायला मनापासून मदत केली.

पंढरी आणि ताई सर्वांचा निरोप घेऊन आपल्या नव्या संसारांत रमायला गेलीं.

नयनानें निरोप देतांना ताईला सांगितलें, " ताई ! पंढरीसारखें रत्न तुला लाभलें आहे. सुखी व्हा."

एके दिवशीं वार्ता आली: हिंदी चित्रकाराला एक लाखाचें पहिलें बक्षीस ! रंगा, रंगा सर्वत्र झालें ! कोण हा रंगा ? विश्वभारतीनें जाहीर केलें, आमचा विद्यार्थी. मुंबईचें कलाभवन म्हणालें, आमचा. जो तो त्याच्यावर हक्क सांगूं लागला. महाराष्ट्राची मान उंच झाली. परंतु नयना भारताला बघत होती. भारताच्या पोटांत तुम्ही आम्ही सारीं. आधीं आपण हिन्दी, भारतीय, मग प्रान्तीय, आपापल्या गांवचे, वगैरे. तिनें रंगाचें सारें चरित्र लिहून काढलें. तें वर्तमानपत्रांना धाडलें. त्याची धडपड, त्याचा त्याग, दारिद्र्य, ध्येयवादित्व, तिनें रेखाटलें.

हें सारें करतांना नयनाला त्रिभुवनांत न मावणारा आनंद होत होता. कारण, परदेशांत रंगाच्या कलाकृतींची मंगल ध्वजा फडकविण्याचें सारें श्रेय तिचें होतें.

रंगाचा परिचय अनेक भारतीय वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाला. 'स्वतंत्र पार्लमेंट रंगवीन' ही रंगाची बाणेदार प्रतिज्ञा वाचून पंडितजींचें काव्यमय अंतःकरण उचंबळलें. त्यांची नयनाला अभिनंदनपर तार आली. त्यांनीं तिला प्रेमानें भेटायला बोलावलें.

नयनाला आनंद झाला. ती आईला म्हणाली, " आई ! भारताच्या त्या पुण्यपुरुषाला–महात्माजींच्या त्या वारसदाराला, उदात्त भूमिकेवरून जाणाऱ्या त्या महान् नेत्याला नमस्कार करून येतें."

• • •

नयना दिल्लीला गेली. पंडित नेहरूंना भेटली. त्यांनीं तिच्यापाशीं रंगाची मुक्तकंठानें प्रशंसा केली. म्हणाले, " नयना ! आतां स्वतंत्र हिंदुस्थानांत दारिद्य कुणाच्या विकासाच्या आड येणार नाहीं. किती शास्त्रीय बुद्धि, कलात्मक बुद्धि शेंदोनशें वर्षांत मातींत गेली असेल. तुम्ही त्या महान् कलावंताच्या पत्नी, तुम्हांला प्रणाम."

" प्रणाम ! पंडितजी ! भारतभाग्यविधात्याच्या या लाडक्या मानसपुत्राला प्रणाम !" नयना अभिवादनपूर्वक म्हणाली.

तशीच मग नयना राजघाटावर गेली. पवित्र यमुनेच्या तीरावरील महापुरुषाची ती दहनभूमि तिनें पाहिली. तिचे अश्रू थांबत ना.

" बापू! दधीचीचीं हाडें देवांचा सांभाळ करतीं झालीं. तुमची रक्षा सर्व नद्यांत, कैलासांत, मानससरोवरांत, समुद्रांत सर्वत्र सोडली गेली. तात ! ती रक्षा, तें मांगल्याचे कण भारताला सांभाळोत. आम्हांला प्रेमानें राहायला शिकवोत !"

तिनें मस्तक नमविलें. मग उठली. त्या बिर्लाभवनांत गेली. जिथें त्या महापुरुषाचें रक्त सांडलें तिथें डोळे मिटून उभी राहिली. तिनें बापूंचा चष्मा, त्या खडावा, ती माळ, जेवण्याचा कटोरा, सारें पाहिलें आणि सजल नयनांनीं ती परतली.

" आई, कृतार्थ होऊन आलें." ती आईला म्हणाली.

" तूं पुण्यवती सती आहेस नयना !"

कांहीं दिवस गेले. अमेरिकेंतील कोट्याधीशानें तो चित्रसंग्रह दहा लाखांना मागितला. परंतु नयनानें कळविलें, " तो भारताचा वारसा आहे."

तिची ती तार वाचून पंडितजी उत्तरले, " महामना स्त्री."

" तुमच्या संस्थेला हिंद सरकारची पांच लाखांची देणगी. पुढें वार्षिक देणगी मिळत राहिलच." पंडितजींची तार आली. नयनानें देवासमोर मस्तक नमविलें.

× × ×

आतां दुधगांवला राममंदिराजवळ भव्य इमारत होत आहे. मोठें आवार घेतलें आहे. तें राममंदिर मध्यवर्ती होणार. समोर नदी. तो तिकडे डोंगर. तो धबधबा. निसर्गरम्य स्थान.

मग हैदराबादचाही प्रश्न संपला. हिंदसरकारनें फौजा पाठवल्या. मुक्तिफौजा. दुरावलेली जनता हिंदी जनतेला मिळाली. ग्रहण सुटलें. भारताचें तोंड फुलूं लागलें. पंडितजी म्हणाले, "ठेंचाळायचे दिवस संपले. आतां महात्माजींची शिकवण आपल्याला तारील."

नयना आनंदली होती. दुधगांवची भव्य इमारत पुरी झाली. अमेरिकेंतून चित्रसंग्रह परत आला. लाख रुपयांचा चेक आला. मणीच्या आईच्या मित्रानें एक लाखाची देणगी दिली. हिंदसरकारचे पांच लाख. प्रांतिक सरकारनें एक लाख दिले. महाराष्ट्रांतील जनतेनेंही दोन लाख लहानमोठ्या रकमांनीं गोळा केले. दहा लाखांची विश्वस्त योजना झाली. नयनाच तिथें प्रमुख. इमारतींत चित्रें लावण्यांत आलीं. इमारत सजली. वर तिरंगी झेंडा फडकत होता.

रामनवमीच्या दिवशीं इमारतीचें उद्घाटन व्हायचें आहे. पंडितजी येणार आहेत. अपूर्व सोहळा होईल. लाखों लोक जमतील. मणी आली आहे. पंढरी, ताई आलीं आहेत.

सारीं म्हणालीं, "नयना! आणखी काय हवें?"

"ही परंपरा वाढो. या संस्थेंतून नवनिर्मिती होवो. कला सर्वांची होवो. कला-विकासांत सारी जनता भाग घेवो. इथें गरीब–श्रीमंत येतील. मी त्यांची सेवा करणारी. इथें सारीं भारताचीं लेंकरें–सारीं एकत्र राहतील, रंग भरतील. भारताचें जीवन कसें रंगवायचें तें जनतेला चित्रद्वारां दाखवतील. आम्हीं चित्रें काढूं, स्लाइडस् करूं. गांवोगांव जाऊं. कलेचा प्रचार करूं. कला हृदयें जोडील, नव-भारत निर्मायला हातभार लावील." नयना रंगाला मनांत आठवीत म्हणाली.

"नयना, आज रंगा असता तर?" कुणीसें म्हटलें.

"अरे तो का दूर आहे? इथल्या अणूरेणूंत तो आहे. नयना कधींच मेली. नयनाच्या रूपानें तोच आहे. हीं त्याचीं बोटें, हे त्याचे डोळे." असें म्हणून हात दाखवीत नयनानें डोळे मिटले. पंढरी, ताई गंभीरपणें तेथून उठून गेलीं.

सायंकाळीं आज नयनानें रामरायाची पूजा केली, आरती केली. सुनंदा, ताई, पंढरी, आणि इतर मंडळी आरतीला होतीं. नयनाचें तोंड दिव्य तेजानें फुललें होतें. तिच्या अंतःकरणांत विराजमान असणाऱ्या रंगाच्या स्मृतिसूर्याचें तें दिव्य तेज होतें.

ती भावोन्मत्त झाली. प्रभुमय, ध्येयमय, भारतमय झाली. ती नदीतटाकीं जाऊन बसली. तोंच कुणींतरी पाठीमागून येऊन तिचे डोळे धरले.

" रंगा तूं. सोड डोळे. तूं कां निराळा आहेस ? " ती म्हणाली. तसे डोळे सुटले. पण कोण होतें तिथें ? रंगा नव्हे, लता.

" लता ! केव्हां आलीस तूं ? "

" आरतीच्या वेळींच आलें नयना ! तुझ्या संस्थेतली पाहिली विद्यार्थिनी म्हणून आल्यें आहें मी. "

" आणि मी दुसरी. " लताच्या मागोमाग आलेली मणी पुढें येऊन म्हणाली.

" आणि आयेषादेखील येणार आहे हॅरीससाहेबांची. " लता म्हणाली.

" या, या साऱ्या जणी या. भारताचीं सारीं मुलें-मुली या. इथें आपण छोटीशी विश्वभारती उभी करूं. गुरुदेवांची महान् विश्वभारती, ही आपली छोटी. " नयना हंसून म्हणाली.

मग ताई, पंढरी, सुनंदा, आई, सारीं इकडेच आलीं. नदी वाहात होती. मंद वारा वाहात होता. आकाश फुललें होतें. सारीं बोलत होतीं. रंगा, वासुकाका, या सर्वांच्या आठवणी निघाल्या. जणूं काय तें सर्वांचें श्राद्ध केलें जात होतें. बोलतां बोलतां प्रत्येकाच्या डोळ्यांतून मधून मधून अश्रू गालावर ओघळत. तर्पण होई.

" ऊठ नयना ! " मणी म्हणाली.

" ऊठ रंगा ! " नयनाला ताई म्हणाली.

" ती का रंगा ? " लतेनें हंसून विचारलें.

" होय. अग या एका देहांत दोन आत्मे, दोन हृदयें, दोन मनें एकरूप होऊन आहेत. रंगा अमर आहे. " सुनंदाआई गंभीरपणें म्हणाली.

" होय. रंगा अमर आहे ! रंगा म्हणजे भारत. भारत अमर आहे ! " सारीं आनंदानें गर्जलीं.

# ● प्रथम श्रेणींतील उजळणी

१. रंगाच्या बाळपणावरून तो पुढें चित्रकार होणार असें सर्वांना केव्हां-पासून वाटलें ? कां ?

२. रंगाच्या आईला रंगाला घेऊन घर कां सोडावें लागलें ? तिनें रंगाचें पालनपोषण कसें केलें ?

३. वासूकाका हा रंगाला चांगला, थोर गुरु भेटला असें तुम्ही कां म्हणतां ? त्या गुरुशिष्यांची ताटातूट कोणीं केली ? कां ?

४. नयना आणि रंगा यांची मैत्री कां जमली ?

५. पंढरीसारखा रंगाचा मित्र प्रत्येकाला हवाहवासा कां वाटतो ? पठाणाशीं पंढरीची मैत्री कशी झाली ?

६. फैजपूरच्या काँग्रेस अधिवेशनाची सौंदर्यनगरी कुणीं कशी उभी केली ? रंगाला फैजपूरचा लाभ काय झाला ?

७. अमृतराव दुधाच्या लोटींत मिठाचा खडा होते असें कां वाटतें ? पंढरीनें रंगाला खरा परीस कोणता सांगितला ?

८. रंगाची आई राहतें घरही कां विकायला तयार झाली ? रंगा तें विकायचें नाहीं असें कां म्हणत होता ? आईनें रंगाची कशी समजूत घातली ?

९. पंढरीचा मित्र तो पठाण कैदी खरा परीससा तुम्हांला वाटतो का ? कां ?

१०. रंगा आणि नयना यांच्या मुंबईतील भेटीची आठवण करून सांगा. नयनानें रंगाला दिल्लीला जायला कां सांगितलें ? रंगा नाहीं कां म्हणाला ?

११. गोगलगाईसारखी गरीब स्वभावाची रंगाची ताई तेजस्वी ज्वाले-सारखी नवऱ्यावर केव्हां भडकली ? कां ?

१२. रंगानें अमृतरावाच्या अपकाराची फेड उपकारानें कशी केली ?

१३. रंगा आणि ताई यांच्या जीवनांत कोणतें वादळ निर्माण झालें होतें ? त्यांतून तीं कशीं बचावलीं ?

१४. दुधगांवचा श्रीमंत तुम्हांला जगांतील बाकीच्या श्रीमंतांपेक्षां निराळा वाटतो का ? कां व कसा ?

१५. नयनानें रंगाला पाठविलेल्या पत्रांतील विशेष काय ?

१६. रंगाच्या आजारीपणांत रंगाच्या शब्दांत त्याची ओळख ताईला कशी झाली ?

१७. नयनाला गाडींत अगदीं लहान बाळमैत्रीण कोण भेटली ? त्या मैत्रीचा नयनाच्या जीवनावर काय कल्पनातीत परिणाम झाला ?

१८. नयना आणि तिचे वडील यांचा खटका कां उडाला ? त्यांत चूक कुणाची होती ? कशी ?

१९. ' चले जाव ' आंदोलनाची थोडक्यांत ओळख करून द्या.

२०. त्या दिवशीं रात्रीं नयनाला तुरुंगांत कोणता अद्भुत अनुभव आला ? तो कसा होता ?

२१. नयना आणि तिचे वडील यांच्या अखेरच्या भेटीची ओळख करून द्या. नयनाला पश्चात्ताप कां झाला नाहीं ? तिच्या वडिलांनाच कां झाला ? नयनाच्या जागीं तुम्हीं असतां तर काय केलें असतें ?

२२. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेनें केलेला स्वातंत्र्याचा यज्ञ नयना चित्ररूपानें कसा अमर करणार होती ?

२३. पंढरी रणांगणावरून माघारा आल्यानंतरच्या पंढरी आणि ताई यांच्या भेटीची ओळख करून द्या.

२४. पंढरीला जपान्यांच्या हातून मरतांना भारतमातेच्या चित्रानें कसें वांचविलें ?

२५. गांधीजींच्या वधानें भारताची मान खालीं झाली असें आई दुःखानें म्हणाली, त्याचा अर्थ काय ?

२६. पंढरीनें आईची कशी समजूत केली ? गांधीजींच्या त्रिभुवन मोलाच्या रक्तांतही भारताचें कोणतें मंगल उदयाला येतांना पंढरीला दिसलें ?

२७. रंगाला अमेरिकेंतील जागतिक चित्रकला प्रदर्शनांत एक लाखाचें पहिलें बक्षिस मिळायला नयना कारण कशी झाली ?

२८. श्री जवाहरलाल नेहरूंची आणि नयनाची रंगाच्या कारणें दिल्लीला भेट होऊन ओळख कशी झाली ?

२९. राजघाटावर महात्माजींच्या समाधीचें दर्शन घेतांना नयनानें कोणती प्रार्थना केली ?

३०. नेहरूंना नयना ही ' महामना स्त्री 'शी कां वाटली ?

३१. नयना आणि तिच्या मैत्रिणी दुधगांवला छोटीशी ' विश्वभारती ' संस्था उभी करूं लागल्या, त्या संस्थेच्या पूर्वतयारीची ओळख करून द्या.

## ● द्वितीय श्रेणींतील उजळणी

१. रंगाच्या बाळपणांतील खेळकरपणांत मोठेपणींच्या चित्रकार रंगाच्या चित्रकलानिपुणतेचीं बीजें तुम्हांला आढळतात का ? कशीं ?

२. शाळेंतील अभ्यासांत रेंगाळणारा रंगा जगद्विख्यात कीर्तीचा चित्रकार झाला. हें ध्यानीं घेऊन शाळेंतील अभ्यासात मागासलेल्या परंतु दुसऱ्या कोणत्या तरी–उदाहरणार्थ गायनकला, नृत्यकला, शिल्पकला वगैरे– एखाद्या कलेंत अथवा उद्योगधंद्यांत चांगलें नांव काढणाऱ्या एका विद्यार्थी तरुणाची थोडक्यांत गोष्ट लिहून काढा.

३. दुधगांवच्या शेटजींचें आणि चित्रकार रंगाचें कां पटलें नाहीं असें तुम्हांला वाटतें ?

४. पंढरी नेताजी बोस यांच्या आझाद हिंद सैन्यांत हालअपेष्टा भोगूनही कां लढला ?

५. भारत स्वतंत्र होण्यापूर्वींचा लष्करी शिपाई आणि आझाद हिंद सैन्यांतील लष्करी शिपाई यांची तुलना करा. दोहोंतील अंतर स्पष्ट करा.

६. 'चलेजाव' आंदोलनांत नयनानें आपल्या चित्रकलानिपुणतेचा कसा उपयोग केला ?

७. चारित्र्यसंपन्न माणसें आपल्या चांगुलपणाच्या प्रभावानें वाईट प्रवृत्तीच्या माणसांनाही चांगलीं करूं शकतात, असा रंगाच्या आयुष्यांतील एक अतिशय महत्त्वाचा प्रसंग वर्णन करा.

८. साने गुरुजींच्या या कादंबरींतील 'भारत-चित्रकला-धाम' संस्था आज चांगल्या प्रकारें अस्तित्वांत आली आहे अशी कल्पना करून त्या संस्थेचें वर्णन करा.

९. समजा कीं तुम्हीहि कादंबरी-लेखक आहां. 'चित्रकार रंगा'-मधीलच मंडळी घेऊन त्या मंडळीचें आवडतें जीवनकार्य सांगणारी लहानशी कादंबरी अथवा कथा सांगा.

१०. 'साने गुरुजींची 'श्यामची आई' वाचा. 'श्यामची आई'-मधील श्याम आणि 'चित्रकार रंगा'मधील रंगा हे दोन्ही एकच आहेत–दोन्ही गुरुजींच्या उदात्त आदर्श जीवनाचीं वेगळीं वेगळीं प्रतिबिंबें आहेत' या विधानाचा विस्तार करा.